भा. इ. सं. मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला क्रमांक ३८

— असतो मा सद्गमय तमसो मा ज्योतिर्गमय —

# किल्ले विशाळगड

लेखक व प्रकाशक :
पं. बा. शिरवळकर

प्रस्तावना :—
प्रा. दत्तो वामन पोतदार

किं.
१ रुपाया ]

भा. इ. सं. मं.चे सभासदांस
[ १२ आणे

विक्रेते—
गोविंद वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
कोल्हापूर.

मुद्रक :
बा. ना. ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,
कोल्हापूर.



**श्रीमंत परशुरामराव माधवराव ऊर्फ भाऊसाहेब**

पंतअमात्य, हुकमत पनाह, अधिपति बावडा

जन्म—ता. १७-२-१९०७        अधिकार—ता. १६-१२-१९३१

# सादर समर्पण.

किल्ले विशाळगडचा इतिहास घडविण्यांत आणि मराठेशाहीचें
संस्थापन, संवर्धन व संरक्षण करण्यांत ज्या अद्वितीय
नरवीरांचे बुद्धिवैभव, पराक्रम आणि दीर्घ परिश्रम
कारणीभूत झाले त्या राज्यकार्यधुरंधर

पुण्यशील रामचंद्र नीळकंठ पंतअमात्य

यांचे वंशज

श्रीमंत

**परशुरामराव माधवराव** ऊर्फ **भाऊसाहेब**

पंतअमात्य, हुकमत-पनाह्, अधिपति बावडा.

**यांचे चरणीं**

—हा ग्रन्थ—

त्यांचे अंगीं असणाऱ्या विद्याभिरुचि, औदार्य
इत्यादि अनेक गुणावर लुब्ध होऊन

**नम्रतापूर्वक अर्पण.**

# भारत इतिहास संशोधक मंडळाचा

# पुरस्कार

मलकापुरचे रा. पं. बा. शिरवळकर यांनीं 'किल्ले विशाळगड' हें छोटेसें पुस्तक लिहून हस्तलिखित मंडळाकडे पाठविलें आणि तें पसंत पडल्यास ग्रंथ भा. इ. सं. मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत समाविष्ट करावा अशी विनंति केली. अशीं पुस्तकें इतिहासाभ्यासास अत्यंत उपयुक्त असतात. त्यामुळें रा. शिरवळकर यांचे हस्तलिखित साधारणपणें पसंत केल्यावर कारभारी मंडळानें त्यांस आपली अनुमति दिली. त्या अन्वयें हा 'पुरस्कार' लिहिला आहे.

रा. शिरवळकर यांची भूमिका संशोधकाची नाही तथापि मूळ संशोधन भरपूर झाल्याशिवाय पुढील रचना मनाजोगती होऊं शकत नाहीं. तथापि अपेक्षित संशोधन स्वाधीनचें नाहीं. तोंवर उपलब्ध माहितीचें यथाशास्त्र संकलन झालें तरी सामान्य वाचकांची मोठीच सोय होते. रा. शिरवळकर यांनी विशाळगडासंबंधीं उपलब्ध माहिती शक्य तितकी पाहिली आहे; आणि तिची सरळ मांडणी ग्रंथांत थोडक्यांत केली आहे. नवीन संशोधनाकडेहि त्यांनी लक्ष पुरविलें आहे. एक नकाशाहि दिला आहे. विशाळगड हा लढाऊ किल्ला असल्यामुळें युद्धशास्त्राच्या दृष्टीनेंही या किल्ल्याचें महत्त्व सविस्तर कोणी तज्ज्ञ दाखवितील तर त्याचा पुष्कळ उपयोग होईल.

आतां या ग्रंथानें शुभारंभ झाला आहे, मंडळाची अपेक्षित परिपूर्ति तेव्हांच होईल कीं जेव्हां प्रस्तावनेंत प्रो. पोतदार यांनीं सुचविल्याप्रमाणें

उत्खनन, दप्तरसंशोधन आणि शास्त्रीय संकलनाचा उद्योग विशाळगड संस्थानांत आणि आसपास अन्यत्र जोरानें चालू होईल. श्रीमंत विशाळगडकरांनीं या कामीं अवश्य तें प्रोत्साहन दिल्यास रा. शिरवळकर प्रभृतींच्या साहाय्यानें भा. इ. सं. मंडळहि शक्य ती मदत देण्यास तत्पर राहील.

चैत्र शु. ८।१८६३
पुणें.
भा. इ. सं. मंडळ मंदिर.

चिटणीस भा. इ. सं. मंडळ.



**श्रीमंत आबासाहेब पंतप्रतिनिधि**

अधिपति—विशाळगड.

जन्म—ता. ९-३-१८६८        अधिकार—ता. २६-११-१८९१

# किल्ले विशाळगड

## भाग पहिला.

## इतिहास

# निवेदन.

नोकरीसंबंधानें मला विशाळगडावर जाण्याचा योग पुष्कळ वेळां आला. प्रत्येक वेळीं गडाबद्दल वेगवेगळी माहिती स्थानिक लोकांकडून मिळे. अर्थात् त्याचे मुळाशीं सत्याचा अंश अगदीच अल्प असे, आणि इतिहासाच्या कसोटीला तर ती मुळींच लागण्यासारखी नसे. त्याच-प्रमाणे माझे स्नेही व गडावर जाणारे हौशी प्रवासीही गडासंबंधी माहिती विचारीत. अशाप्रसंगीं मी ऐकीव माहिती सांगून कशीतरी वेळ निभावून नेई; परंतु यामुळें माझी जिज्ञासा मात्र जागृत झाली आणि गडासंबंधीं विश्वसनीय माहिती मिळविण्याच्या प्रयत्नास मी लागलों. निरनिराळ्या इतिहासग्रंथांत गडासंबंधीं आढळणारी उज्ज्वल माहिती पाहून मला प्रथम आश्चर्य वाटलें. या सर्व माहितीला ऐतिहासिक आधाराची कसोटी लावून ती वाचकापुढें ठेवल्यास बरीच उपयुक्त ठरेल असें वाटल्यानें मिळालेल्या माहितीचें संकलन करून हा प्रबंधात्मक ग्रंथ मराठी वाचकांना सादर करतांना मला आनंद होत आहे. मलकापूरसारख्या आडवळणाच्या छोट्या गावांत ऐतिहासिक साधनग्रंथ कोठून मिळणार ? परंतु जिज्ञासा स्वस्थ बसूं देईना. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक सामुग्रीचे एकमेव केंद्र अस-लेल्या भारत इतिहास संशोधक मंडळांतील ग्रंथसंपत्तीचें निरीक्षण केलें. त्या कामीं सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रो. दत्तोपंत पोतदार यांनीं जरूर त्या सवलती व इतर साह्य केलें नसतें तर हा ग्रंथ प्रकाशित करण्याचें भाग्य मला क्वचितच लाभतें. मर्यादित वेळेंत मंडळातील ग्रंथांचे परि-शीलन करून केलेल्या संक्षिप्त टिपणावरून हा ग्रंथ पुरा करावा लागला. प्रत्यक्ष लेखनाचे वेळीं आधार-ग्रंथ समोर नसल्यानें त्यांत उणेपणा राहिला असणार याची मला पूर्ण जाणीव आहे. तथापि ही उणीव दूर होईपर्यंत वाट पहावे तर मिळालेली माहितीही स्मरणांतून नष्ट होण्याची भिती वाटली. यामुळें मिळालेल्या माहितीवरून हा ग्रंथ पुरा करून भारत इतिहास

संशोधक मंडळाकडे पाठविला व तो त्यांनींही पसंत करून मंडळाच्या पुरस्कृत मालेंत समाविष्ट करण्यास संमती दिली याबद्दल मी मंडळाचा ऋणी आहें.

जोंपर्यंत नवनवीन ऐतिहासिक सामुग्री उपलब्ध होत जाईल तोंपर्यंत कोणताही इतिहास अपुराच राहाणार ! इतिहासच काय परंतु कोणत्याही शास्त्रीय ग्रंथांची तीच स्थिति आहे. परंतु तेवढ्याच कारणानें पूर्ण माहिती मिळेपर्यंत कसलाही ग्रंथ लिहावयाचा नाहीं असा दंडक घातल्यास प्रत्येक शास्त्राची प्रगति खुंटलीच म्हणावी लागेल. परिश्रमानें मिळविलेली माहिती त्या शोधकाबरोबरच नष्ट होऊन जाईल आणि अभ्यासकांना पुनः श्रीगणेशापासून सुरवात करावी लागेल. केवळ याच हेतूनें मी हा निबंध प्रकाशित करीत आहे; नहून इतिहाससंशोधकाच्या भूमिकेवरून निर्देश करण्याचा अधिकार मला मुळींच पोंहोंचत नाहीं.

स्थल, काल, व्यक्ती आणि प्रसंग यांचा यथार्थ वृत्तांत म्हणजे इतिहास. या संमेलनांत चारी अंगें सारख्याच महत्त्वाचीं असतात असें नाहीं. कालाकडे बहुधा पार्श्वभूमीची भूमिका असते. त्याला स्वतंत्र असें प्रत्यक्ष महत्त्वाचें स्थान नसलें तरी प्रत्येक घटनेला काल हा कांहीं अंशीं तरी कारणीभूत असतोच. इ. स. १६३० किंवा १६८० या कालखंडाला स्वतंत्र अस्तित्व असलें तरी त्याला महत्त्व आहे तें शिवाजी महाराजांच्या आयुष्यांतील विवक्षित घटनेशीं त्यांचा संबंध आला म्हणूनच ! त्याचप्रमाणें यःकश्चित स्थलेंही इतिहासांत अजरामर झालेलीं आढळतात. आणि मोठ्या लोकांच्या सामान्य गोष्टीही आपण कुतुहलानें वाचतोंच ना ? हें सांगण्याचा उद्देश इतकाच कीं इतिहासांत स्थलाचेंही महत्त्व कमी नाहीं आणि इतिहासाची पूर्तता होण्यास त्या दृष्टीनेंही संशोधन होणें अवश्यक आहे. याच हेतूनें हा विशाळगडचा अल्प " अभ्यास " मी वाचकांना सादर करीत आहें.

ग्रंथलेखनांत आलेल्या विविध अडचणींचा निवेदनांत निर्देश करणें अप्रस्तुत असलें तरी ज्या स्नेह्यांच्या साह्यानें मी त्यांचे निवारण करूं शकलों आणि त्याचप्रमाणें ज्यांनीं निःस्वार्थ बुद्धीनें मला लेखनांत मदत

केली त्यांचे मनःपूर्वक आभार मानलें नाहींत तर मी कृतघ्न ठरेन. विशे-षतः बावड्याचे विद्वान् व इतिहासप्रेमी कारभारी आणि डिस्टिक्ट व सेशन जज रावसाहेब केशवराव सबनीस, भांडारकर ओरिएंटल रीसर्च इन्स्टिट्यूटचे प्रख्यात क्युरेटर प्रो. पी. के. गोडे, इतिहाससंशोधक प्रो. दत्तोपंत पोतदार, फर्ग्युसन कॉलेजमधील फारशीचें अध्यापक प्रो. बी. डी. वर्मा, रियासतकार रावबहादूर सरदेसाई, उस्मानिया युनिव्हर्सिटीचे प्रो. शेरवानी वगैरेंचें सहाय्य विशेष उल्लेखनीय आहे. परंतु या सर्वांचे अगो-दर विशाळगडचे आदर्श अधिपति श्रीमंत आबासाहेब पंतप्रतिनिधी आणि त्यांचे सेक्रेटरी रावसाहेब नारायण अनंत जोशी यांनीं मला वेळोवेळीं प्रोत्साहन देऊन सहानुभूति दर्शविल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें अवश्य आहे. बावड्याचे उदार व रसिक अधिपती श्रीमंत पंत अमात्यसाहेब हुकूमत्–पनाह् यांनीं ही माझी कृति त्यांचे सेवेशी अर्पण करण्यास अनुज्ञा दिली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

सिद्धेश्वर छापखान्याचे मालक श्री. ठकार यांनीं अल्पावधींत छपाईचें काम सुबक व वक्तशीर करून दिल्यामुळेंच पंचविसाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या मंगल प्रसंगीं ही माझी प्रथम साहित्यसेवा महाराष्ट्र रसिक जनापुढें मांडतां आली हें आभारपूर्वक नमूद करून हें निवेदन पुरें करतों.

वर्षप्रतिपदा शके १८६३
मलकापूर.

वाचकांचा नम्र सेवक.
पं. बा. शिरवळकर.

# प्रस्तावना

मलकापुरचे रावसाहेब शिरवळकर यांनीं ' किल्ले विशाळगड ' हें छोटेसें पुस्तक मुख्यतः साधारण वाचकांसाठीं लिहून प्रसिद्ध केलें आहे. विशाळगड किल्ला हा इतिहासांत अत्यंत नावाजलेल्यापैकीं एक आहे. मराठेशाहीचा तर हा कांही काल कलिजाच होऊन राहिला होता. महाराष्ट्राच्या इतिहासांतील अत्यंत थोर थोर व्यक्तींचा संबंध या किल्ल्याशीं आलेला आहे. अर्थात् मराठी साम्राज्य महाराष्ट्रांत तरी निर्भय झाल्यावर महाराष्ट्रांतील या गडांचें कार्य व महत्त्व तितकेसें राहिलें नाही. तथापि कोणाहि सहृदय मराठ्याचें अंतःकरण अशा स्थळांच्या दर्शनानें आणि स्मरणानें आज मितिलाहि उचंबळून जात असलें तर त्यांत आश्चर्य कांहीच नाहीं !

आम्ही महाराष्ट्रांतील बरेच किल्ले पाहिले आहेत. प्रत्येकांत कांहीना कांहीं वैशिष्ट्य आम्हांस दिसून आलें. तथापि ' तख्ताची जागा ' रायगड आणि तितकाच महत्त्वाचा हा विशाळगड यांची बरोबरी करतील असे दुसरे किल्ले क्वचित्‌च आढळले. रायगड पाहून तर कांहीं पाश्चात्य जिब्राल्टरची आठवण काढतात. विशाळगडहि कांहीं कमी नाहीं. तो गिरिदुर्गांत श्रेष्ठ पदवी सहज पटकावील असाच आहे.

या गडासंबंधीं आम्हांस विशेष प्रकारची आत्मीयता वाटण्याचें आणखी एक कारण आहे. अदिलशाहीपासून आमच्या पूर्वजांकडे या किल्ल्यावर पोतदारीं व कारखानिशीचा हुद्दा होता. १८४४ च्या बंडाईपावेतों आमचा घरटा व नांदणूक तेथें होती आणि अद्यापिहि आमच्या घरवंदाची निशाणी गडावर पहाण्यास मिळते.

असा हा आमचा प्रिय गड पहाण्याचा योग आम्हांस कांहीं वर्षांपूर्वी आला. आम्ही कोचरी गांवाकडून मोरखिंड चढून, डाळी टाकून माचाळचें विस्तीर्ण रान तुडवून चिरबेटाकडील काळ–दरवाद्याच्या बाजूनें किल्ल्यांत प्रवेश केला ! सारा किल्ला आज उजाड पडला आहे. जुजबी वस्ती आहे ! पावसाळ्यांत तर दोनदोन दिवस तोंड बाहेर काढवत नाहीं अशी विलक्षण स्थिति किल्ल्यावर असते.

गडकिल्ल्याचें जुनें वैभव सांप्रत नष्ट झालें असलें तरी त्याचें नैसर्गिक वैभव आणि ऐतिहासिक महत्त्व हीं केव्हांहि अभंगच राहणार ! एक गजापुराकडील दर्शनी बाजू सोडली कीं विशाळगड किल्ल्याच्या साऱ्या अंगांनीं भयंकर दऱ्या, सह्याद्रीचे प्रचंड दाढ आणि विक्राळ सोंडा यांचा गराडाच पडल्याचा भास होतो ! तो देखावा पहातांना डोळे फिरूं लागतात !

विशाळगडाला दोन दरवाजे–एक मागला म्हणजे वर सांगितलेला चिरबेटाकडील काळदरवाजा आणि दुसरा पुढला म्हणजे गजापुराकडचा. पुढल्या दरवाजानें गड उतरून गेल्यावर मोठा माळ चालून जावें तेव्हां एका अरुंद खिंडींत आपण कोंडले जातो. ही खिंडच गडाच्या या तोंडाचें नैसर्गिक प्रवेशद्वार समजण्यास हरकत नाहीं. एवढी खिंड जिंकली कीं आपण गडालाच बिलगतो पण मागील काळदरवाजाकडील परिस्थिति भिन्न आहे. माचाळचें विशाळ मैदान तुडवून यावें तों चिरबेटाची अरुंद फट आडवी येते. या फटीमुळें माचाळचा उंचसा डोंगर आणि त्याहून जरा खालवर असलेला विशाळगड यांचे दोन भाग स्पष्ट झालेले दिसतात. माचाळ—आणि गड यांमधील या फटीवरून एक निरुंद वाट आहे. तीवरून एका वेळीं एकच माणूस कसें बसें पुढें सरकूं शकते. असा हा किल्ला हा बेलाग झाला आहे.

काळदरवाजाजवळच एक पडकें देऊळ आहे. त्यांतील देव पाहतां आमचा तर्क असा वाहिला कीं हे दगड प्राचीन मूर्तीचे भग्नावशेष असावेत. तसेंच जेव्हां आम्ही मलिक रेहानच्या दर्ग्याचें निरीक्षण केलें त्या वेळीं समोरच्या मैदानांत एक शिळा पाहिली. तिला लोक जातें म्हणत, परंतु सूक्ष्म अवलोकनांनीं आमचें मत असें झालें कीं ही साधी शिळा नसून ती एखाद्या प्राचीन हिंदु देवळाच्या कळसाखालची शिळा आहे. या शिळेजवळ एक गधागाळ पडलेला आम्हांस आढळून आला. या कळस शिळेची छबी आम्ही उतरून आणली आहे ! असे प्राचीन काळचे अवशेष किल्ल्यावर आणखीहि पुष्कळ आढळावेत; परंतु त्याला उत्खनन केलें पाहिजे. वरची वस्ती उठण्याला आज सुमारें शंभर वर्षें होत आली त्यामुळें सर्वत्र मोकळें मैदान झालें आहे. भोजाचा तलाव आम्ही गेलों त्या वेळीं उन्हाळ्या-

मुळें कोरडा पडला होता. या तलावाच्या तालीचा तळ आम्हांस स्वच्छ दिसला आणि तें बांधकाम प्राचीन शिलाहारसमकालीन असावें असें आमच्या मनानें घेतलें. भोजाचें नांव या तलावास लागतें आणि गडाशेजारीं एक भोजेवाडी अद्यापिहि असल्याचें कळतें. तेव्हां अधिक शोध केल्यास याचा उलगडा होण्यास साहाय्य होईल.

रावसा. शिरवळकर यांनी आपल्या प्रस्तुत ग्रंथाचे दोन भाग केले आहेत. पहिल्या पन्नास पानांत त्यांनी गडाची ऐतिहासिक माहिती जुळवून लिहिली आहे आणि दुसऱ्यांत गडावरील स्थळांचें वर्णन आहे. शिवाय समजुतीसाठीं नकाशाहि दिला आहे.

या गडाविषयींची माहिती अस्सल पत्रांचे आधारानें जुळविण्याजोगीं अस्सल साधनें थोडीच उपलब्ध आहेत. त्यामुळें रावसा. शिरवळकर यांस जागजागीं बखरींचे आधार घ्यावे लागले आहेत. आमचे एक पूर्वज विठ्ठल आपाजी सबनीस ( पृ. १२ वर पोतनीस म्हटलें आहे तें दुरुस्त केलें पाहिजे ) हे मोठे साक्षेपी गृहस्थ होते. यांनीं लिहिलेली ' पंतप्रतिनिधि बखर ' या नांवानें प्रसिद्ध असलेली बखर पुष्कळच उपयुक्त माहिती देते. विठ्ठल आपाजी यांस कागदपत्रांचीहि माहिती बरीच होती आणि अंगीं चौकसपणा पुष्कळ होता. त्यामुळें माहितीच्या दृष्टीनें ही बखर सरस गणतां येते. परंतु आजकाल ज्या प्रकारें ऐतिहासिक सामग्री शोधली व अभ्यासली जाते तो प्रकार विठ्ठल आपाजीच्या काळीं आमच्याकडे अवगत नव्हता. त्यामुळें विशाळगडाचा समग्र व साधार इतिहास तयार करण्यासाठीं आमच्या मतें आसपासच्या घराण्यांतून व गांवांतून व रियासतींतून कसून शोध केला पाहिजे. रियासतकार सरदेसाई, भांडारकर प्रा. वि. चे ' पारिपत्यगार ' प्रो. गोडे इत्यादि विद्वान् संशोधकांचे घराण्यांचा या किल्ल्याशीं निकटचा संबंध येतो. पैकीं सरदेसाई घराण्याचे कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत; गोडेहि आपले घराण्याचे कागदपत्र जुळवीत व प्रसिद्ध करीत आहेत. आमचें घराणें तर ' विशाळ गडकरी ' असें अद्यापि कागदोपत्रीं म्हणवितें. आम्हीहि आमच्या घराण्याचे कागदपत्र जमविले असून पुढला उद्योग चालू आहे. जोत्याजी

केसरकर, इंगळे, सुर्वेप्रभृति त्या रहाळांतील मराठ्या सरदार शिलेदार घराण्यांचे कागदपत्र शोधून काढणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें खुद्द विशाळगड प्रतिनिधि दप्तरहि तपासलें पाहिजे. पेशवेदप्तर तर आहेच. कागदपत्रांबरोबरच पोथ्या पत्रेंहि पाहिलीं पाहिजेत. कोंकणांत दौरे केले तेव्हां आम्हांस आढळून आलें कीं अद्यापि पुष्कळ महत्त्वाचीं कागदपत्रें तिकडे मिळण्यासारखीं आहेत. प्रो. शेरवानी यांनी गवानाच्या पत्रांचा शोध केला तसें फारसी साहित्यहि विपुल आढळेल. आदिलशाही वगैरे फर्मानें पुष्कळ मिळण्यासारखीं आहेत. संस्कृत, इंग्रजी, फिरंगी वगैरे भाषांतहि साहित्य सांपडलें आहे आणि आणखी सांपडेल. हें सावकाशीचें काम आहे. रावसा. शिरवळकरांच्या ग्रंथामुळें चिकित्सक व अभ्यासी मंडळीचें तिकडे लक्ष्य जाईल अशी आम्हांस उमेद आहे; आणि बावडा दप्तर ज्याप्रमाणें आमचे स्नेही रावसा. सबनीस यांनीं हातीं घेतलें आहे त्याप्रमाणें प्रतिनिधि दप्तराचेंहि संशोधन होईल अशी आम्हांस मोठी आशा आहे.

इतकें सर्व संशोधन कधीं होईल तें होवो. सामान्य वाचकांना कांहीं तोंपर्यंत थांबून राहतां येत नाहीं आणि त्यांस खोळंबून ठेवणें इष्टहि नाहीं. रावसा. शिरवळकरांनीं जी माहिती व इतिहास विद्यमान ग्रंथांतून उपलब्ध आहे ती निवडून आणि जी ऐतिहासिक साधनसामग्रीहि प्रसिद्ध झालेली आहे तिचा यथामति अभ्यास करून विशाळगडासंबंधीं एक सुसंगत वृत्तांत तयार केला आहे. थोडी नवीन सामग्रीहि त्यांनीं मिळविली आहे. या सर्व परिश्रमाबद्दल त्यांचे आभार मानणें उचित होईल.

रावसा. शिरवळकरांचा पेशा संशोधकाचा नाहीं. 'किल्ले पुरंदर' या पुस्तकाचे कर्ते रा. कृष्णाजीपंत पुरंदरे हे खंदे संशोधक आहेत. त्यामुळें संशोधकी छाप "किल्ले पुरंदर" पुस्तकावर जसा स्पष्ट पडला आहे तसा या पुस्तकावर पडलेला नाहीं. त्यामुळें 'मशरुल अनाम' –ऐवजीं मशरुल अजाम किंवा जिलकाद ऐवजीं दिलकाद (पृ. १४) अशा चुका राहून गेल्या आहेत. तसेंच पृष्ठ ४४ वर 'उतराली यास' याऐवजीं उपरालियास (म्हणजे मदतीस) असें वाचन पाहिजे. त्याच पत्रांत करवासीयेही याजबद्दल 'करवीरवासी येही' आणि 'घरांवर घाट' ऐवजीं

घेरा वरघांट' असे शब्द लिहिले पाहिजेत. पृ. १५ वरील उधाजी अहिरराव आणि पृ. १४ वरील दुधाजी ब्रहिरव यांतला एक कोणीतरी खरा असला पाहिजे असें वाटतें. मूळ पाहण्यानें आणि परीक्षिण्यानेंच हा प्रश्न सुटेल.

विशाळगडावर अरबी व फार्सी शिलालेख कांहीं अद्यापि आहेत व कांहीं पूर्वी असून आज तेथें प्रत्यक्ष आढळत नसावेत. ते मूळ लेख पुस्तकांत द्यावयास पाहिजेत. या लेखांची स्वतंत्रच चिकित्सा व्हावयास पाहिजे. असल्या लेखांच्या मराठी भाषांतराचा आधार कधींच बळकट समजतां यावयाचा नाहीं. या सर्व म्हणण्याचें तात्पर्य एवढेंच कीं विशाळगडा-बाबत प्राचीन काळापासूनचे उल्लेख प्रथम एकत्र केले पाहिजेत. नंतर अव्वल, दुम–सीम अशी त्यांची प्रतवारी लावली पाहिजे. आणि त्यांचे आधारें वृत्तरचना केली पाहिजे.

रावसा. शिरवळकरांनी अगदीं तंतोतंत वर लिहिल्याप्रमाणें योजना तडीस नेली नसली तरी त्यांनीं शक्य ते सर्व परिश्रम घेतले आहेत. 'किल्लेविशाळगड' हें त्यांचें पुस्तक सामान्य वाचकांस गडाचा इतिहास, महत्त्व व अवशेष यांबद्दल बरीच माहिती सरळपणानें देईल. या ग्रंथाचे साहाय्यानें विशाळगड पाहणारांस खचित अधिक ज्ञान आणि अधिक आनंद लाभेल.

रावसा. शिरवळकर यांनीं या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली तिचा स्वीकार करतांना आनंद वाटला. आमचें घराणें विशाळ-गडचे, आम्ही आज तीनशें वर्षें तरी तेथील एक अधिकारी म्हणून नांदत आलों, अर्थात् रा. शिरवळकर यांनी आमचाच भार एकप्रकारें हलका केला असें म्हटलें पाहिजे. यासाठीं त्यांचे आभार मानून या ग्रंथाचे वाचनानें विशाळगडचा खराखुरा संपूर्ण इतिहास शोधण्याची प्रवृत्ति उत्पन्न होवो ही इच्छा प्रकट करून पुरें करतों.

चैत्र शु० ७।१८६३
पुणें.

**दत्तो वामन पोतदार.**

# आधार ग्रंथ


१ छत्रपती शिवाजी महाराजांची बखर—मल्हार रामराव चिटणीसकृत.
२ ,, संभाजी ,, ,, ,, ,,
३ ,, राजाराम ,, ,, ,, ,,
४ ,, शाहू ,, ,, ,, ,,
५ कोल्हापूर प्रांताचे इतिहास—बाळाजी प्रभाकर मोडक.
६ साताऱ्च्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास—भाग १ व २
७ शाहू महाराजांची रोजनिशी.
८ पंत प्रतिनिधी यांची बखर—भारतवर्ष
९ पंत अमात्य यांची बखर— ,,
१० बहामनी राज्याचा इतिहास— मोडक
११ अदिलशाहीचा इतिहास— ,,
१२ विजयनगर स्मारक ग्रंथ—भा. इ. सं. मंडळ.
१३ प्रतिनिधींचे चरित्र—रावबहादूर द. ब. पारसनीस.
१४ मराठ्यांची इतिहासाचीं साधनें—श्री. राजवाडे.
१५ पेशवे दप्तर—रावबहादूर गो. स. सरदेसाई.
१६ ऐतिहासिक लेखसंग्रह—श्री. खरे.
१७ मध्ययुगीन इतिहासाची साधनें—रावबहादूर चिं. वि. वैद्य.
१८ महाराष्ट्रांतील किल्ले.
१९ बावडा दप्तरखंड १ व २ संपादक श्री. के. गो. सबनीस.
२० प्रतिनिधींचे चरित्र—मेहेंदळे.
२१ शिवाजी व शिवकाल ( सर जदुनाथ सरकार )—श्री. वाकसकर
२२ आठल्ये घराण्याचा इतिहास—भा. इ. सं. मंडळ.
२३ काव्येतिहास संग्रह.
२४ मावळंगकर सरदेसाई घराण्याचा इतिहास—रावब. गो. स. सरदेसाई
२५ विजयनगरचा इतिहास—श्री. लेले.

२६ मुधोळ बखर
२७ मराठ्यांचा इतिहास--ग्रँट डफ
२८ मध्ययुगीन भारत—रा. ब. वैद्य.
1 Bombay Gazetteer—Kolhapur.
2 ,, ,, Ratnagiri & Sawantwadi.
3 ,, ,, Belgaum
4 History of Konkan—Nairn.
5 Statistical Report on Kolhapur Principality. By Major Graham.
6 Panhala—by Rao Bahadur D. B. Parasnis.
7 Sources of Vijayanagar history—Prof. Shastri.
8 Shivaji the Great—Volume 1 & 2 by Dr. Balkrishna.
9 Selections from State Papers—Bombay—Maratha series-Vol. I by Forest.
10 Journals of the Bombay University.
11 Early History of the Deccan by Dr.R.G.Bhandarkar.
१ शिवभारत--कविंद्रपरमानन्द— भा. इ. सं. मंडळ.
२ संभाजी चरितम्—कवि केशव पंडित कृत.

याखेरीज फेरिस्ता, मनूची, खाफीखान वगैरेंच्या ग्रंथांतील आधार घेतले आहेत.

# किल्ले विशाळगड

विशाळगडचा सुप्रसिद्ध किल्ला कोल्हापूरचे वायव्येस सुमारें पन्नास मैल अंतरावर सह्याद्रीच्या रांकेत १६·५५ आणि ७३·४७ अंशावर बसला आहे. सह्याद्रीपासून अलग असून पंधरा फूट रुंदीच्या एका पायवाटेनें पर्वताच्या मुख्य रांकेशी जोडला गेल्यानें त्याला चारी बाजूंनें तीन हजार फूट उंचीच्या कड्याची नैसर्गिक तटबंदी मिळाली आहे. गडाची उंची समुद्रसपाटीपासून ३३०० फूट आहे. गडाची लांबी ३२०० फूट व रुंदी १०४० फूट आहे. याचें प्राचीन नांव खिलगिला असून पुढें मुसलमानी अमदानींत 'खेळणा' अथवा 'खिळणा' असें ठेवण्यांत आलें. नंतर शिवाजी महाराजानीं तो काबीज केल्यावर त्याचे 'विशाळगड' असें नामकरण झालें. अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून गेलीं अडीचशें वर्षें तो करवीरच्या पंतप्रतिनिधींच्या ताब्यांत असून इ. स. १८४४ पर्यंत विशाळगड जहागिरीची राजधानी गडावरच होती. इ. स. १८४४ मध्यें गडकऱ्याच्या बंडांत गडाची तटबंदी ढासळून टाकण्यांत आल्यानंतर प्रतिनिधींचें ठाणें मलकापुरास आलें आणि त्यानंतर गडावरील इतर कुटुंबांनींही हळूंहळूं स्थलांतर करण्यास सुरुवात केली. हल्ली गड बहुतेक ओसाड असून केवळ १०।१५ घरांचे वास्तव्य तेथें आहे. सांप्रत गडापर्यंत जाण्यास गाडीमार्ग झाला असल्यानें इतिहासप्रेमी आणि हौशी प्रवासी बरेच येत असतात. गडावर मलिकरहाण नांवाच्या मुसलमान साधूचा एक दर्गा असून दरवर्षी चार पांच हजारपर्यंत हिंदू मुसलमान लोक उरुसाचे वेळीं तेथें जमतात. गेल्या हजार वर्षांत महाराष्ट्रांत झालेल्या प्रत्येक राजकीय घडामोडीची झळ या गडाला थोड्याफार अंशानें लागली असल्यानें त्याचा इतिहास बोधप्रद तसाच मनोरंजक आहे.

इ. स. पूर्वी सातशें वर्षेपर्यंत आर्यांचा प्रवेश महाराष्ट्रांत झाला नव्हता. त्यानंतर आर्य लोक प्रथम महाराष्ट्रांत आले. तथापि इ.

सनाच्या पहिल्या शतकापर्यंत एतद्देशीय रठ्ठ, महारठ्ठे वगैरे लोकांचा अंमल या प्रदेशावर म्हणजे करवीर प्रांतावर चालत होता. त्यापुढें इ. सनाच्या प्रारंभीं आंध्रभृत्य राजांचे प्रतिनिधि या प्रांतावर सत्ता गाजवीत होते असे उपलब्ध झालेले ताम्रपट आणि तांब्याचीं व शिशाचीं नाणीं यावरून आणि कोल्हापुरच्या आसपास असलेल्या लेण्यांवरून दिसून येतें. शातवाहन राजांच्या अंमलाखालीं हा प्रदेश इ. स. ५०० पर्यंत होता. नंतर तो बेळगांव येथील कदम्ब राजाचे ताब्यांत गेला. इ. स. ५५० पासून ७६० पर्यंत येथें पूर्व व उत्तर चालुक्य राजांचें अधिपत्य होतें. यानंतर इ. स. ९७३ पर्यंत राष्ट्रकूट राजांचा अंमल झाला. महाराष्ट्रांतील अस्सल मराठी राजवंश राष्ट्रकूटच होय. यापुढें दुसऱ्या चालुक्य राजांनीं राष्ट्रकूटांना जिंकून महाराष्ट्रावर आपली सत्ता पुन्हां प्रस्थापित केली. त्यांचा अंमल महाराष्ट्रावर इ. स. ११८९ पर्यंत होता.

इ. स. १००० च्या पूर्वींची गडासंबंधीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं. तरी त्या काळीं या प्रांताचे चार मुख्य विभाग होते. पूर्वेकडे रायबाग, मध्यभागीं बेरड, पश्चिमेस खेळणा आणि दक्षिणेस संकेश्वर असे ते विभाग असून तेथें स्वतंत्र हिंदु राजे राज्य करीत असल्याचा उल्लेख शिलालेखांत आढळतो.×

राष्ट्रकूटांच्या अधिराज्याखालीं मांडलीक म्हणून शिलाहार राजे कोल्हापूर प्रांतावर राज्य करीत होते. चालुक्यांची सत्ता नष्ट झाल्यावर शिलाहारांचे मांडलिकत्वहि संपलें आणि ते स्वतंत्रतेनें राज्य करूं लागले.

शिलाहारांचें राज्य करवीर प्रांतांत इ. स. ९०० ते १२०० पर्यंत होतें. त्यांच्या तीन शाखा असून त्या कोल्हापूर, दक्षिण कोंकण व उत्तर कोंकण या निरनिराळ्या प्रांतावर राज्य करीत होत्या.+ ते जैन धर्माचे अनुयायी असून एकेकाळीं त्यांचें अधिपत्याखालीं तुंगभद्रेपासून

---

( × Major Graham's Report on Kolhapur Principality page 336-37. )

+ परिशिष्ट १ शिलाहाराची वंशावळ.

गोदातीरपर्यंतचा प्रदेश कोंकणसुद्धां होता. या शिलाहारवंशांत मरसिंह नांवाचा राजा इ. स. १०५८ च्या सुमारास होऊन गेला. त्याचे नांवानें उपलब्ध असलेल्या एका शिलालेखांत त्यानें आपला चुलता गुहाल याचा उल्लेख ' खिलगिला या डोंगरी किल्ल्याचा अधिपती ' असा केला आहे. मरसिंह राजाचें मुख्य ठाणें खिलगिला येथेंच होतें.* हा खिलगिला म्हणजेच खेळणा अथवा विशाळगड होय.+ याच शिलाहार वंशांत पुढें इ. स. ११७८ ते १२०९ च्या दरम्यान दुसरा भोजराजा होऊन गेला. तो अत्यंत पराक्रमी होता. त्याचें अधिपत्याखालीं साताऱ्या उत्तरेकडील शंभूमहादेवाचे डोंगरापासून दक्षिणेस हिरण्यकेशी नदीपर्यंत सर्व प्रदेश कारवार पर्यंतच्या कोंकणपट्टीसुद्धां होता. त्यानें विशाळगड, पन्हाळा वगैरे १५ किल्ल्यांचा जीर्णोद्धार केल्याचे उपलब्ध शिलालेखावरून दिसून येतें. भोजराजाची राजधानी पन्हाळा ऊर्फ पद्मनाल दुर्ग या किल्ल्यावर व कांहीं काल कोल्हापूर येथें होती. हा शिलाहार वंशातील शेवटचा राजा होय. चालुक्यांच्या पश्चात् शिलाहारांनीं देवगिरीच्या यादवांचे अधिपत्य मान्य न केल्यानें त्यांचा पाडाव करण्याचा प्रयत्न यादवांनीं बराच काल केला. शेवटीं यादव वंशांतील राजा सिंघण (इ. स. १२१० ते १२४७) यानें या प्रांतावर स्वारी करून भोजराजास जिंकलें. इ. स. १२०९ च्या पुढील या प्रांतातील शिलालेख सिंघण राजाच्या नांवचे असून त्याचे नांवापुढें "पनाल-प्रबल-भोज-भूपाल-व्याल-विद्रवण-विहंगराज" अशी बिरुदावली आहे.§ हल्लीं विशाळगडावर भूपालतळें या नांवाचे एक ठिकाण आहे. हें गडावरील सर्वांत प्राचीन ठिकाण होय. तें या भोजराजानेंच बांधलें आहे.×

---

* Early History of Deccan—Dr. Bhandarkar P. 94

+ स. घ. इ. पान. ६१.

§ Bombay Gazetteer p. 223.

× भूपाल हे नांव फक्त जैन लोकांतच आढळतें. शीलाहारानंतर या प्रांतांत जैनांचा अंमल स्थापन झाल्याचें आढळून येत नाहीं. हें तळें भूपाल राजानें बांधलें

हा गड व भोंवतालचा प्रदेश यादवांचें साम्राज्यांत सामील झाला,* तरी त्यांचें आधिपत्य केवळ नांवापुरतेंच असून येथें प्रत्यक्ष सत्ता मराठा पाळेगार लोकांची होती. विशेषतः कोंकणपट्टी व सह्याद्रीचा घांटमाथा यांवर शिरके कुळांतील राजे राज्य करीत होते.§ आणि इ. स. १४६९ मध्यें विशाळगडावर महमद गवान यानें स्वारी करून तो बहामनी राज्यास जोडीपर्यंत हीच स्थिति चालू होती.

यादव राजांची राजधानी देवगिरी ही या ठिकाणाहून फारच अंतरावर असून त्याकाळीं प्रवासाचीं साधनें व मार्ग सुलभ नसल्यानें आणि यादवांचें राजकारणही मध्य हिंदुस्थानांत चालू असल्यानें त्यांच्या राजवटींत या गडाला राज्यकारभाराच्या दृष्टीनें फारसें महत्त्व नसणें संभवनीय आहे, यामुळें त्यांचे अमदानींत विशेष संस्मरणीय अशा घडामोडी या गडासंबधीं झाल्या नाहींत.

देवगिरीचें अधिपत्य सुमारें शंभर वर्षेपर्यंत टिकलें. इ. स. १२९४ मध्यें जलालुद्दीन खिलजी यानें आपला पुतण्या अल्लाउद्दीन यास सैन्य देऊन दक्षिणेंत रवाना केलें. देवगिरीजवळ लढाई होऊन रामदेवाचा पराभव झाला. त्यानें बरीच खंडणी देऊन आपलें राज्य राखलें परंतु त्यावेळेपासून यादवांचे वैभवास उतरती कळा लागली. यानंतर मुसलमानांच्या पुन्हां दोन तीन स्वाऱ्या होऊन इ. स. १३१८ मध्यें हरपाळ देवाचा वध झाल्यावर यादव घराण्यांत कोणीच शिल्लक राहिलें नसल्यानें हा सर्व प्रांत दिल्लीच्या बादशहाच्या साम्राज्यांत सामील झाला. दक्षिणेंतील प्रांताचा बंदोबस्त करण्याकरितां तेथूनच सुभेदाराची नेमणूक करण्यांत

---

असा उल्लेख ग्रँहॅमनें केला आहे. परंतु भूपाल नांवाचा राजा येथें झाल्याचें आढळून येत नाहीं. भोज भूपाल या नांवाचा संक्षेप होऊन भूपाल तळें असें नांव पडलें असावें.

* 'after defeat of Bhoj Kolhapur kingdom was annexed by the Yadavas to their dominions'—Early history of Deccan page 108

§ Bombay Gaz. Ratnagiri Vol. VI Part 2 page 31.

येई. त्याचें ठाणें देवगिरीस होतें. यावेळीं खेळण्यावरील किल्लेदाराची नेमणूक दिल्लीहूनच होत असे. ही सत्ता देखील जास्त काल टिकावयाची नव्हती. इ. स. १३४७ च्या सुमारास कतलघखान हा दिल्लीच्या बादशहाचा— महमद तघलगाचा—दक्षिणेंतील सुभेदार होता. त्याच्या हाताखालीं इस्माइलखान व हसनखान हे सरदार होते. महमद तघलग अत्यंत जुलमी असल्यानें सर्व सरदार त्याच्या अमलास कंटाळले होते. शेवटीं यांनीं बादशहाचे हुकूम अमान्य केल्यामुळें बादशहानें उमाद–उल्मुख याचेबरोबर मोठें सैन्य देऊन त्यास दक्षिणेंत रवाना केलें. स्वतः बादशहाही त्या स्वारींत हजर होता. परंतु या लढाईत त्याचा पराभव होऊन तो दक्षिण देशास कायमचा मुकला आणि या प्रांतांतील दिल्लीची सत्ता नष्ट झाली. या लढाईत हसनखान यानें मोठा पराक्रम गाजविल्यान दक्षिणेचे राजपद त्यालाच मिळालें. हाच बहामनी राज्याचा संस्थापक होय. बहामनी राज्याची स्थापना झाली तरी पूर्वीचा सर्व मुलूख त्यांच्या सत्तेखालीं आला नाहीं.

दिल्लीच्या रियासतींत उपरिनिर्दिष्ट यादवी सुरू झाली त्याचा फायदा विजयनगरच्या हिंदू राजानीं घेतला. इ. स. १३५० च्या सुमारास विजयनगरचे राजे बुक्कराय आणि हरिहर यांनीं कोल्हापूर प्रांतावर स्वारी करून कोंकणसुद्धां सर्व प्रदेशावर आपली सत्ता स्थापन केली. दक्षिणेंतील हिंदू राज्य आणि मध्य–हिंदुस्तानांतील बहामनीचें मुसलमानी राज्य या दोन्ही समकालीन राजसत्ता प्रचंड असून सारा दक्षिण हिंदुस्थान या दोनच साम्राज्याखालीं होता. त्यांच्या हद्दी एकमेकाला लागून असल्यानें परस्परांची सत्ता उलथून पाडण्याचा त्यांचा प्रयत्न सारखा चालू होता. कोंकणप्रांतामध्येंहि मुसलमानांच्या वेळोवेळीं स्वाऱ्या होत होत्या. हा मुलूख विजयनगरच्या साम्राज्याखालीं होता तरी तेथील स्थानिक सत्ता एतद्देशीय मराठा पाळेगार लोकांच्या हातांतच होती.

इ. स. १४५३ सालीं दुसरा अल्लाउद्दीन हा बहामनी राजा गादीवर असतां त्यानें आपला पराक्रमी सेनापती मलिकउत्तुजार याचेबरोबर मोठी फौज देऊन कोंकणप्रांतावर स्वारी करण्यास रवाना केले. या स्वारींत त्या

वेळीं कोकणांत राज्य करीत असलेल्या शिर्के घराण्यांतील एका राजाचा त्यानें पाडाव केला आणि आपली सत्ता दृढमूल करण्याकरितां त्याला इस्लामी धर्माची दीक्षा देण्याचा प्रयत्न सुरू केला. त्या प्रसंगीं शिर्के राजानें मलिकउत्तुजारास सांगितलें कीं " जवळच खेळणा किल्ल्यावर शंकरराव मोरे हा राज्य करीत आहे. त्याचें व माझें वैमनस्य आहे. मी इस्लामी झाल्यावर तुम्ही परत गेल्यानंतर तो माझा सूड उगवल्याखेरीज रहाणार नाहीं. तरी प्रथम त्याला जिंका म्हणजे मी इस्लामी धर्माची दीक्षा घेईन. "

मलिकउत्तुजारनें उत्तर दिलें कीं, " त्या राजाच्या मुलखांत जाण्याची वाट दाट जंगलांतून आहे व घाटही बिकट आहेत." यावर शिर्के राजानें लागेल तें साहाय्य करण्याचें अभिवचन दिल्यानें इ. स. १४५३ मध्यें मलिकउत्तुजार खेळण्यावर स्वारी करण्यास निघाला. आरंभीच कांहीं दक्षिणी व हबशी कामगारांनीं पहाडांत शिरण्याचें नाकबूल केलें आणि ते आपल्या फौजा घेऊन मागें राहिले. पहिले दोन दिवस शिर्के राजानें त्याला चांगल्या वाटेनें नेलें; परतु तिसऱ्या दिवशीं त्यानें घनदाट आणि अडचणीच्या जंगलांत उत्तुजारचें सैन्य नेऊन सोडलें. त्यातून मोठ्या कष्टानें ती फौज मार्ग आक्रमीत असतां ही बातमी शंकररायाकडे पोहोंचविण्यांत आली. तेव्हां तो मोठें सैन्य घेऊन चालून आला आणि मुसलमान सैन्य बेसावधपणें विश्रांति घेत असता त्यांचेवर अकस्मात हल्ला करून ७००० सैन्यास कापून काढलें. मदिना, कर्बला, नजफ येथील बड्या बड्या ५०० सय्यदासह बहामनी राजाचा प्रमुख सुभेदार मलिकउत्तुजार या कत्तलींत ठार झाला. त्याचप्रमाणें बरोबर असलेले दक्षिणी व हबशी कामगार २००० सैन्यानिशीं नाश पावले. उजाडण्यापूर्वीच हें रक्तपाताचें काम पुरें करून शंकरराय परत खेळण्यास गेला *

हा शंकरराय खेळणेकर मोठा प्रबल राजा होता. विशाळगडावर त्याची राजधानी होती तरी समुद्रापर्यंतचा मुलूख व पांच किल्ले त्याच्या

---

* Faristas History of Deccan by Scott. Vol. I page 124-25

ताब्यांत होते. तसेंच त्याचे जवळ तीनशें जहाजांचे आरमार नेहमीं सज्ज असून कोंकणालगतच्या समुद्रांतून प्रवास करणाऱ्या मुसलमान प्रवाशांना आणि मालाच्या जहाजांना लुटून त्यानें बेजार करून सोडले होते. §

मलिकउत्तुजारचा पाडाव बहामनी राजांना मोठा अपमानास्पद वाटला आणि प्रसंग येतांच त्याचा सूड उगविण्याचा त्यांनीं निश्चय केला. पुढें इ. स. १४६९ मध्यें महमदशहा बहामनी ( दुसरा ) हा राजपदावर असतांना त्यानें कोंकणदेश पादाक्रांत करण्याची इच्छा व्यक्त करतांच महमद गवानानें या स्वारीवर आपली नेमणूक झाल्यास कोंकणांत आपण बहामनी सत्ता प्रस्थापित करूं असें आश्वासन दिलें. बादशहाची आज्ञा घेऊन तो प्रथम कोल्हापुरास आला आणि सैन्याची जमवाजमव करूं लागला. जुन्नर व चाकण या भागांतील सैन्यासह असदखान आणि दाभोळ व कराड येथील सैन्यासह किश्वरखान हे त्याला येऊन मिळाले. याप्रमाणें जय्यत तयारी झाल्यावर त्यानें मोहिमेस सुरवात केली. परंतु शंकरराय व त्याचे सहाय्यक हे जंगलांत दडून गनिमी काव्यानें मुसलमानी फौजेस हैराण करूं लागले. तेव्हां वाटेतील जंगल तोडीत आणि जाळीत त्यानें गडापर्यंत आपला मार्ग काढला.*

गडाला वेढा देऊन पांच महिनेपर्यंत निकराचे हल्ले करूनही गड हस्तगत होईना. इतक्यांत पर्जन्यकालास सुरवात झाली. प्रचंड झंजावातापुढें कांहींच इलाज चालण्यासारखा नव्हता म्हणून त्यानें आपले दहा हजार सैन्य आणि इतर सरंजाम घेऊन कोल्हापूरचा आश्रय केला. वर्षाकाल संपल्यावर पुनः त्याचे सैन्य गडावर चालून आले. हा अजिंक्य किल्ला केवळ लढून हस्तगत करणें अशक्य आहे याची खात्री पटल्यानें

---

§ Prof. Sherwani.

* या स्वारीची हकीकत फरिस्तानें दिली आहे. परंतु अलीकडे खुद्द महमद गवाणाचीं पत्रें उपलब्ध झालीं असून त्या आधारें या स्वारीची हकीकत उस्मानिया युनिव्हर्सिटीचे विद्वान प्रो. शेरवानीं यानीं ऑल इंडिया मॉडर्न हिस्टरी कॉंग्रेसच्या १९३५ च्या पुणें येथील अधिवेशनांत एक निबंध वाचला त्यावरून ही हकिगत उधृत केली आहे.

दाम व भेद या उपायांचा त्यानें अवलंब केला आणि नऊ महिनेपर्यंत अविश्रांत खटपट करून इ. स. १४७०च्या डिसेंबर महिन्यांत किल्ला सर केला. हा महत्वाचा किल्ला सर झाल्यानंतर त्यानें कोकणप्रांत काबीज करून या प्रांतातील विजयनगरची सत्ता नष्ट करून मुसलमानी अंमल बसविला. परत जातेवेळीं या मुलुखावर खुश कदम याला सुभेदार नेमून तो बेदरास गेला. याचवेळीं मुसलमानांचे पाय या गडाला प्रथम लागले.*

या स्वारींत महाराष्ट्रांत अत्यंत पराक्रमी म्हणून विख्यात असलेल्या घोरपडे घराण्याचा पूर्वज कर्णसिंग यानें महमद गवानाला बिनमोल साह्य केलें. घोरपडीच्या साह्यानें गडावर प्रवेश करून गडाचा पाडाव केला. या कामगिरीमुळें संतुष्ट होऊन महमदशहा बहामनी यानें याला "राजा घोरपडे बहाद्दर" हा किताब बहाल केला. त्याच वेळेपासून हे घराणें 'घोरपडे' असे उपनांव धारण करूं लागले. §

खुश कदम याचा कारभार फार दिवस चालल्याचें दिसत नाहीं. इ. स. १४८६ च्या सुमारास महमदशहा बहामनी याचे कारकीर्दींत बहादुर गिलनी यानें गोवे बंदर बळकाऊन शिवाय दाभोळ, कोल्हापूर, पन्हाळा वगैरे परगणेही ताब्यांत घेतले. त्यावेळीं हा किल्लाही त्यानें आपल्या ताब्यांत घेतला. महमुदास ही हकीगत समजल्यानंतर इ. स. १४९८ च्या सुमारास तो मोठें सैन्य घेऊन या प्रांतांत आला आणि पन्हाळ्याजवळ घनघोर लढाई झाली. त्यांत गिलनीचा पराभव होऊन तो ठार झाला. बहादुर गिलनीची सर्व जहागिर मलिक–ऐन–उल्–मुल्क याचे हवालीं करून शहा परत निघून गेला. या सुमारास बहामनी राज्यास उतरती कळा लागली असून विजापुरचा सुभेदार युसफ आदिलखान याची सत्ता या प्रांतांत वाढत चालली होती. इ. स. १५०४ च्या सुमारास युसफ आदिलखानानें शहा हें पद धारण केलें आणि स्वतंत्रपणें आपला राज्य-

---

* Ferista by Scott. Vol. I P. 156

§ मुधोळ बखर पान १२०

कारभार सुरू केला. अशारीतीनें विशाळगड आदिलशाहीत सामील झाला.

आदिलशाहीच्या अमदानींत कोंकणप्रांतावर एक सुभेदार नेमून बंदोबस्त राखण्यांत येई. त्याचें मुख्य ठाणें कांहीं दिवस संगमेश्वर येथें व नंतर गडाखालीं प्रभावळी येथें होतें. गडावरील हवालदारांची नेमणूकही विजापुराहूनच होत असे. ही व्यवस्था विशाळगड सतराव्या शतकांत मराठी राज्यांत सामील होईपर्यंत चालू होती.

श्रीशिवछत्रपतीनीं मराठी राज्याची स्थापना आरंभली त्यावेळीं त्यांना किल्ल्यांची उपयुक्तता दिसून आली, म्हणून प्रथम महाराष्ट्रांतील किल्ले काबीज करण्याचा उद्योग त्यांनीं सुरू केला. त्यावेळीं हा गड विजापुरच्या बादशहाच्या ताब्यांत होता. या प्रांतावर रुस्तुम जमान नांवाचा सुभेदार असून अबदुल कादर सुरूरखान × हा गडावर हवालदार होता. पन्हाळा, रांगणा वगैरे किल्ले रुस्तुम जमान याला वश करून शिवाजी महाराजांनीं मिळविले आणि नंतर इ. स. १६५९ च्या डिसेंबरमध्यें विशाळगडही अल्प प्रयासानें हस्तगत केला; आणि गडाचें पूर्वीचें नांव खेळणा हे बदलून 'विशाळगड' असे नवीन नांव ठेवले. तेव्हांपासून तेच नांव प्रचारांत आहे.§ गडाची दुरुस्ती करून 'राज्याभिषेकाचेवेळीं म्हणजे इ. स. १६७४ मध्यें तो महाराजांनीं रामचंद्रपंत अमात्य यांचे ताबीन ठेवला; तेव्हां ३½ महाल मोडून किल्ल्याच्या खर्चास महाराजांच्या वराता घेऊन खर्चाचे काम चालूं लागलें.

× स. घ. ई. पान १२८

§ शिवाजी महाराजांनीं इ. स. १६६० मध्यें हा गड परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी याना दिला असे Bombay Gzateer-Kolhapur Volum. 24 page 323 वर नमूद आहे. परंतु ते चुकीचे आहे. परशुराम त्र्यंबक यांचा जन्मच मुळीं इ. स. १६६० मध्यें झाला. इ. स. १६७४ नंतर ते रामचंद्रपंत अमात्य यांकडे नोकरीस आले आणि इ. स. १६९१ मध्यें त्याना अमात्याकडून प्रथम मुजुमदारी मिळाली.

शिवाजी महाराजांनीं गड घेतल्यावेळीं किल्ल्याकडे मुलुख होता तो—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ तर्फ देवळें | महाल | दरोबस्त | देहे | ४५ |
| १ तर्फ हातखंबे | ,, | ,, | ,, | २६ |
| १ तर्फ हरचिरी | ,, | ,, | ,, | १६ |
| ·।।· तर्फ देवरुखपैकीं १ कसबा देवरुख, मौजे करळी, मौजे विघ्रवली, मौजे तुळसणी, मौजे कान्हे, मौजे देवघर, मौजे पुन्यें, मौजे आंबवली, एकूण देहे दरोबस्त. | | | | ८ |
| | | | | ९५ |

सदरहु साडेतीन महाल किल्ल्याकडे खर्चास प्रभावळीचे अंमलदार यांणीं नेमून दिल्हे. त्यावेळीं प्रभावळीखालीं मालवणपासून सुवर्णदुर्ग पावेतों मुलुख होता; आणि किल्ल्याचे नांव खिळणा असे ठेऊन जमेदार यांचेही वांटप करून खिळण्याचे जमेदार वेगळे केले होते.' + गडकरी लोकांना मात्र दिलेलीं इनामें इ. स. १८४४ पर्यंत चालत होती.

मुधोळचा बाजी घोरपडे यानें शहाजीचा विश्वासघात करून त्यास अटक केली होती. त्याचा सूड उगवण्याची पूर्व तयारी येथेच करून शिवाजीमहाराज अनुकूल संधीची वाट पहात होते आणि येथूनच मुधोळ वर हल्ला करून बाजी घोरपड्याचा पाडाव इ. स. १६६०–६१ मध्यें केला.

शिवाजी महाराजांनीं अफजुलखानाचा वध केल्यामुळें विजापुरच्या दरबारास मोठाच धक्का बसला. बादशहानें अफजलखानाचा मुलगा फाजलखान याचेबरोबर मोठी फौज देऊन इ. स. १६६१ मध्यें त्याची मराठ्यावर रवानगी केली. त्यासमयीं महाराजांचा मुक्काम पन्हाळगडावर होता. ८०००० फौज घेऊन फाजलखानानें पन्हाळा वेढला. मराठी सैन्याने किल्ला बहुत दिवस लढविला. परंतु मुसलमानी सैन्याचा पाडाव

+ सरदेसाई घराण्याचा इतिहास भाग १ पा. ६४

होईना. रसद बंद झाल्यानें वेढ्यांतील लोकांची उपासमार होऊं लागली. तसेंच महाराज वेढ्यांत अडकून पडल्यानें त्यांचा इतर मुलुखाशीं संबंध तुटला. किल्ल्यावर त्र्यंबकजी इंगळे हवालदार होता तोही महाराजास म्हणाला "साहेबानीं दुसरे किल्लेस जावें म्हणजे वेढा उठोन जाईल" तेव्हां महाराजानीं पांच हजार मावळे मराठे समागमे घेऊन विशाळगडास पायीं निघाले व ते किल्ल्याचे § वाटेवर एका खिंडीनजीक आले. त्यांचे मागून तशीच फौज पाठलागास आली. तेव्हां हिरडसचा बाजीप्रभू देशकुलकर्णी धारकरी होता तो महाराजांस म्हणाला 'तुम्ही लोक निमे घेऊन गडावर जावें व कांहीं माणसास आम्हांकडे द्यावे. निमे लोक घेऊन दोन प्रहरपर्यंत खिंड राखतो. साहेबाचे कामावर मेल्यास पुढें मुलें लेकरास अन्न द्यावे' असें बोलून बाजी प्रभुनें खिंडीत उभे राहून छत्रपतीस वाटेस लावले. गडावर पोहोचल्यानंतर महाराजानीं बाजीप्रभूस कुमक पाठवून दिली. बाजीनें मोठी शर्थ करून दोन हजार धारकरी घेऊन खानावर तुटोन गेले. त्याला प्राणांतिक जखमा झाल्या. इतक्यांत महाराज गडावर पोहोचल्याच्या खुणेचे तोफेचे आवाज ऐकूं आले. तेव्हां त्या स्वामिभक्त वीरानें कृतकार्य होऊन समाधानानें प्राण सोडला. मराठ्यांच्या इतिहासांतील तो एक उज्वल प्रसंग होता. ग्रीसच्या थर्मापिली खिंडींत, लिऑनिडासनें इराणी सैन्याला दाखविलेलें शौर्य या ठिकाणीं बाजीनेंही दाखविलें. यानंतर खानानें विशाळगडास वेढा घातला परंतु गड सर झाला नाहीं. पाण्याचा तुटवडा पडला. डोंगर रान व जंगल

---

§ शिवाजी महाराज या प्रसंगी विशाळगडास गेले अगर रांगण्यास गेले याबद्दल बराच मतभेद होता. परंतु महाराजांचा राजकवी परमानंद यांनें लिहिलेले शिवभारत या ग्रंथावरून आणि डॉ. बाळकृष्ण कृत Shivaji the Great या पुस्तकात डच रेकॉर्डमधील प्रसिद्ध केलेल्या एका पत्रावरून महाराजांचे प्रयाण विशाळगडास झाले यांत शंका नाहीं. या विषयावर प्रस्तुत लेखकानें चित्रमयजगतच्या डिसेंबर १९३८ च्या अंकांत 'रांगणा नव्हे, विशाळगडच' या लेखांत ही गोष्ट ऐतिहासिक आधारानें सिद्ध केली आहे.

यामुळें त्याचे फौजेचा इलाज चालेना. अन्नाच्या टंचाईमुळें मुसलमानी सैन्य हैराण झालें. फाजलखानानें फितुरी करण्याचाही यत्न केला. परंतु मराठे लोक मूळचेच इमानी. त्यांत प्रत्यक्ष महाराजांचे वास्तव्य गडावर असल्यानें तोहि इलाज चालेना. किल्ल्यानजीक सुरुंग खणून किल्ल्यावर जाणेचा इलाज चालविला. परंतु पुढे काळे खडक लागल्याने खणण्याचाही उपयोग होईना. मुसलमानी सैन्यानें गजापुरानजीक छावणी केली होती आणि विहीरी खणल्या होत्या त्या अद्याप आहेत. गोणीमठानजीक घोणसली म्हणून मोठा उंच डोंगर किल्यासमोर आहे. त्या डोंगरावर फौज नेऊन तोफांचा मारा सुरू केला परंतु किल्यास गोळा लागू झाला नाहीं. अशा रीतीनें सर्व बाजूनें पराभव झाल्यावर फाजलखान वेढा उठऊन परत निघून गेला. *

परंतु या पराजयानें विजापुरकरांना फारच वैषम्य वाटलें; आणि स्वतः बादशहा सैन्य घेऊन शिवाजी महाराजांच्या पारिपत्याला आला. त्यानें पन्हाळा, पावनगड वगैरे किल्ले जिंकले. परंतु विशाळगड व रांगणा मात्र त्याला हस्तगत झाले नाहींत. इतक्यांत पावसाळा सुरू झाल्यानें त्यानें चिमुलगे येथें छावणी केली. परंतु तोपर्यंत कर्नाटकांत बंड झाल्यानें इकडील मोहीम बाजी घोरपडे आणि वाडीकर सावंत यांचेवर सोपवून बादशहा परत गेला. यावेळीं पन्हाळा मराठ्यांच्या ताब्यांत नसल्यानें शिवाजी महाराजांनीं विशाळगडासच आपलें मुख्य ठाणें ठेवलें होतें. या योगानें

---

* पंतप्रतिनिधींची बखर पान ११, १२. ( हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. तो करवीरच्या पोलिटिकल एजंटच्या मागणीवरून विशाळगडचे कारभारी गणेश विठ्ठल तांबे यांनीं ता. १६ फेब्रुवारी १८४९ मध्यें विठ्ठल आप्पाजी पोतनीस सरपोतदार आणि विष्णू केशव कारकून यांचे मदतीनें लिहिला. ' Major Graham's statistical Report on Kolhapur Principality ' आणि ' Bombay Gazateer Kolhapur ' या ग्रंथांतील विशाळगडासंबंधीची माहिती मुख्यत्वें याचग्रंथावरून घेतली आहे. रा. ब. पारसनीस यानीं भारतवर्ष मासिकांत ही बखर संपूर्ण प्रकाशित केली आहे. )

देश व कोंकण या दोन्ही ठिकाणीं एकाचवेळीं त्यांना मोहिमा करतां आल्या. येथून शिवाजीमहाराजांनीं बाजी घोरपड्याच्या मुधोळवर झडप घालून गांव जाळून टाकले आणि वाडीकर सावंताचाहि पक्का बंदोबस्त करून कोंकणांत मराठी अंमल बसविला. यावेळीं महाराजांच्या ताब्यांत विशाळगड नसता तर हीं काम इतक्या सुलभतेनें त्यांना करतांच आली नसतीं.

इ. स. १६६२ मध्यें शिवाजी महाराजांनीं शहाजीराजांना आपण जिंकलेला मुलूख दाखविण्यास नेले होते, त्यावेळीं या गडावरही त्यांना आणले होते. ( इ. स. १६७३ मध्यें ) विशाळगडावर मोठें सैन्य जमा करून मार्च महिन्यांत पन्हाळगड मराठ्यांनीं पुनः हस्तगत केला.

शिवाजी महाराजांनीं सिंहासनारूढ होतेसमयीं गडाची कारखानिशी रंगो नारायण ओर्पे × यांस वतनी करून दिली. त्याना तैनात पूर्वी ६० होन मिळत होती ती शंभर होन केली आणि तसदार एक व दिवट्या आणि अब्दागिरी दोन दिल्या. हा सरंजाम इ. स. १८४४ पर्यंत त्यांचे वंशांत चालत होता. त्यासालीं गड उध्वस्त झाल्यावर ओर्पे घराणें राजघराण्याबरोबर मलकापुरांत आले. त्यांचे वंशज हल्ली मलकापुरांत नांदत आहेत.

मध्यंतरी इ. स. १६७० च्या सुमारास रंगो नारायण ओर्पे यांची पूर्वी जी तैनात होती ती हवालदारानीं बंद केल्यामुळें त्यांनीं महाराजांना विदित केल्यावर त्यांची तक्रार ऐकून घेऊन दुधोजी बहिरव हवालदार यास आज्ञापत्र पाठवून ती पुन: चालू करून दिली. हें पत्र इ. स. १६७० मधील आहे. = शिवाजी महाराजानीं गड हस्तगत केल्यानंतर त्यांचे गडासंबंधीं उपलब्ध झालेले हेच प्रथम पत्र असावें. इ. स. १६५९ च्या

× सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रो. दत्तो वामन पोतदार यांचे पूर्वज.

= ओर्पे यांचे वंशज श्री. अनंत नारायण सबनीस, वकील, मलकापूर, यांचे संग्रही हे अस्सल पत्र आहे.

पूर्वीचीं अदिलशाहीतील जी फर्मानें उपलब्ध आहेत त्या सर्वात गडाचा उल्लेख " खिलणा " असाच केलेला आढळतो. यावरून इ. स. १६६० ते १६७० च्या दरम्यान शिवाजी महाराजांनीं गडाचे " विशाळगड " असे नामकरण केल्याचे दिसून येते.

शिवाजी महाराजांचे विशाळगडच्या हवालदारास पत्र.

" मशरुल अजाम राजश्री दुधाजी बहिरव हवालदार व कारकून किले विशालगड प्रति राजश्री शिवाजी राजे सुरू सन. इहिदे सबेन अलफ रंगो नारायण कारखाननीस किले मजकूर याची सबनिसामहालची यारदी एक पहिलेपासून चालत होते. विठल नारायण चालवीत होता. यावरी त्यासी भेटी × × हवाला सांगितला. त्याचे मुबदला रंगो-नारायण रामजी कुरस ठेविला होता दूर करून बदली दरम्यान बालाजी येसदेऊ म्हणवून ठेविला आहे तरी रंगो-नारायणाची यारदी असतां दुसरा आणिक यारदी ठेवावयास काय गरज आहे तो यारदी दूर करून गणो रंग-नाथ याचे हाते घेत जाणे अगर रंगो नारायण जो यारदी देईल या पासून काम घेत जाणे या उपरी बालाजी येसदेऊ यारदी यास हक दिला म्हणजे तो पैका सबनिसाच्या मुशा-हिराखत धरणें आणि सबनिसास एक यारदी रंगो नारायण जो ठेवील त्याचे हाते काम घेत जाणे मु।। र पेशजी प्रमाणे जे मोइन आहे तेणे प्रमाणे जे तारखेसयापासून काम घ्याल ते तारखेपासून रवेसा वजावाट करून माहे दर माहे काम × × देत जाणे छ १२ जी काही वरकड यारदी आहेत त्यास हाली तनाती केलेली आहेत तेणेप्रमाणें यासही देत जाणे × गी पासून यारदीचे काम होत जाले ते पासून मु।। देणे छ दिलकाद मोर्तबसुद "

मध्यंतरी महाराजानीं कोकणांतील १८ महालापैकीं ५५ गांवे किल्लेकडे सरंजाम करुन दिली. ' त्या गांवावर शिक्का हवालदार यांनीं करावा.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


जमा मामलेदार यानीं करून महाल कारखानिशीचे किर्दीस जमा व्हावी. महाल सबनिशीचे किर्दीस खर्च अशी वहिवाट करणेचा हुकूम देऊन लोकांस हवालदार व हकीमदार हरकदार कारकून यास ऐवज पावत जावा अशी आज्ञा दिली '†

शिवाजी महाराजांचे कारकिर्दीत गडावर हवालदार झाले त्यांची नांवे—

| | | |
|---|---|---|
| उधोजी अहिरराव | ४ | वर्षे |
| राघोजी अहिरराव | ६ | ,, |
| वासुदेव बाबाजी परभु | ३ | ,, |
| उमाजी पालकर | ५ | ,, |
| जाखोजी भांडवलकर | ८ | ,, |

याखेरीज वासुदेव बाबाजी परभु यास सबनिशी दिली. उमाजी काटे यास सरनोबत नेमिले. फडणीस नेमले ते :—

(१) महाल सबनिशीकडे (२) महाल कारखानिशीकडे. येणेप्रमाणें हरकदार नेमून बंदोबस्त केला. खेरीज मराठे लोक खानविलकर, सुर्वे, शिर्के, वगैरे मोठमोठे मराठे यांना कोंकण प्रांतीं गांवें मोकासा चाकरीत नेमून दिली.§

शिवाजी महाराजांनीं किल्ल्यांचा बंदोबस्त कसा ठेवला होता याबद्दल चिटणिसांनीं आपल्या बखरींत माहिती दिली आहे ती अशी—

"किल्ले कोट ठाणीं घेतलीं त्यांचा बंदोबस्त सुभेदार एक व हवलदार एक व सरनोबत व तटसरनोबत, फडणीस, कारखानीस, यांच्या हस्तकीं देखरेखी अधिकारी करून दिले. त्यांत हवलदार, इतबारी, घरंदाज, कुलीन, मर्द, शहाणे असे पाहून मराठे ठेवले. सुभेदार सबनीस ब्राह्मण देशस्थ, कऱ्हाडे, कोकणस्थ, मध्यंदिन असे विश्वासुक, शहाणे, मर्द, स्वामिसेवातत्पर पाहून योजिले. कारखानीस प्रभु लोक बाळाजी आवजी

---

† पं. प्र. बखर .

§ पं. प्र. बखर.

चिटणीस यांचे निसबतीस धंदा देऊन त्यांचे तर्फेचे नेमून दिले. सरनोबत व तटसरनोबत हे मराठे केले. हवलदार यांनीं सदरेस कारभार करावा. परवानगी रसानगी दरवाज्यांची व किल्लया त्यांजकडे. किल्लयाचा तनखा दाणाबदला व दारुगोळा सामान आणवणें, बाह्यकारभार त्यांजकडेच. शिक्का त्यांचे नांवे. किल्लयाचे मुख्यत्व त्यांजकडे. सुभेदार यांनीं कारभार करावा तो त्यांचे विचारें अनुमतें करावा. सबनिसाकडे हजरी लोकांची व चौकशी. कारखानिसाकडे कोठीचा जिन्नस जमा व खर्च, दारुगोळा, इमारत, लोकांस रोजमुरा वाटणें, लिहिणें करणें त्याजकडे. याप्रमाणें करून दिले. चालण्याचें कानून जाबते करून दिले. याप्रमाणें एकाचे काम एकानें न करितां सर्वांनीं एक लक्ष करून चालावें याप्रमाणें केलें. किल्लयाचे काम नाजूक जाणून फार सावध, इतबारी, चांगलीं माणसें रीतीची योजून किल्लयांत ठेविलीं. अश्वारूढ व सभासद व गडकरी, मेठकरी, परवारी, रामोशी असे करून दिले. परवारी रामोशी यांनीं तटाखालील चौक्या कराव्या. कदाचित् एकांत एक विरुद्ध चालूं लागले तर हें वर्तमान कळतांच बदलून दुसरें ठेवावे आणि रोखापत्र करणें त्यांजवर शिक्का करणें व सरकारपत्र येणें ते सर्व हवलदार याचे नांवें यावें. संध्याकाळीं दरवाजा लावून कुलूप घालावें. आपण येऊन मागुती ओढून पहावें. हवलदार यांनीं आपलें अंगें किल्लया घेऊन जाणें. आपले जवळ उश्यास ठेवाव्या. प्रात:काळीं येऊन कुलूप काढून दरवाजा उघडावा. रोज घस्त सर्व दरखदार सुद्धां घालावीं. जागा जागा पहारे यांची चौकशी हवलदार यांनीं करावी. त्याजवर सरनोबतांनीं घस्तीची व लोकांची रात्रीची चौकशी करावी. तट सरनोबतांनीं किल्ला लहानथोर याचे पहारे दोन चार नाजूक जागा जागा असतील त्यांची चौकशी करावी. किल्ला कोट पाहून माणसांची भरती नेमणुकी त्यास अडिसरी व नगदी वगैरे बेगमी किल्ला पाहून जकीरा दहापांच वर्षांची बेगमी गल्ला लाकूडफाटा जिन्नस मात्र, दारुगोळा, चुना वाटून तयार, असे सुद्धां अमके किल्लयावर अमके सामान याप्रमाणें घोर बांधून दिले. किल्याचे तट जेथें सोपे होते ते तासून व सुरुंग लाऊन व इमारती करून बेलाग करविले. कोणतेही

किल्ल्यास इमारत नाहीं असें नाहीं. हवलदार यास दिवटी, भालदार, पालखी, योग्यतेनुरूप किल्ला पाहून नेमून दिले. वरकडास दिवटी, चाकर, पोरगे वगैरे नेमून दिले. हवलदार यांनीं रात्रंदिवस सदरेस सावध लोकसुद्धां हत्यारबंद असावे. किल्ल्याखालीं नाक्यास वाटेच्या जागा, मेठे, तेथेंही लोक चौक्या ठेवाव्या—किल्ले कोट हे आपल्या राज्याचा जीवप्राण; प्रांत घेतले त्यांचे संरक्षण; मोठीं मोठीं संकटें पडलीं असतां किल्ले कोट जंजिरे सावध तरी मोठेही शत्रूची हिशेब धरावयास नको म्हणून बंदोबस्त फार बारीकपणें करविला. "+

महाराजांचा राजकवी कविंद्र परमानन्द यानें आपल्या शिवभारत नामक काव्यात या गडाचा उल्लेख पुढील प्रमाणें केला आहे—

" अथ धरणिमणिर्विशालशैलं ।
निजमधिरुह्य विलोकनीयशालम् ॥ "

इ. स. १६७१–७२ मध्यें गडाच्या डागडुगीकरितां पांच हजार रुपये खर्च पडले आहेत. * शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत सरंजाम पद्धत अस्तित्वांत नसल्यानें हा गड कोणासही सरंजाम दिलेला नव्हता.

इ. स. १४७० मध्यें बहामनी बादशहाचा वजीर महमद गवान यानें विशाळगड जिंकल्यानंतर इ. स. १६६० पर्यंत या प्रांताला फारसे महत्त्व नव्हतें. आदिलशाहींत पन्हाळा व कोल्हापूर हीं दोनच केंद्रें या बाजूस होती. परंतु इ. स. १६६० मध्यें शिवाजीमहाराजानीं हा गड घेतल्यानंतर आणि विशेषतः बाजी प्रभूचा पराक्रम या गडाखालीं झाल्यानंतर गडाला हळू हळू महत्व येऊं लागले आणि त्या शतकाच्या अखेरीस या गडानें अद्भुत कामगिरी बजावल्यानें अत्यंत आणीबाणीच्यावेळीं अखिल मराठी साम्राज्याची यशस्वी राजधानी होण्याचा मान त्याला मिळाला.

इ. स. १६८० मध्यें शिवाजी महाराज कैलासवासी झाल्यानंतर संभाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला. त्यांच्या कारकिर्दीतील बहुतेक

---

+ चिटणीस बखर—शिवाजी महाराज पान ६४

* म. इ. सा. खंड ८ पत्र २२.

काळ पन्हाळा, विशाळगड व संगमेश्वर या भागांतच गेला. मोगल सैन्य संभाजीच्या मागें लागलें होतें. परंतु त्यांना विशाळगड हस्तगत झाला नाहीं. संभाजीमहाराजांचा बराचसा वेळ या किल्ल्यांतच गेला. किल्ल्याचे मजबुतीकरितां दोन दरवाजे व बुरुज त्यांनीं आपल्या कारकीर्दींत बांधले त्यांला पैसा मुबलक म्हणजे दहा लक्षपर्यंत लागला. त्या कामावर कृष्णाजी गोडे व रंगो नारायण असे दोन असामी ठेवले होते.* त्यांचे कारकीर्दींत गडावर नागोजी मोहिते हा हवालदार दहा वर्षेंपर्यंत होता.

इ. स. १६८४ सालीं बहादूरखान रणमस्त आणि औरंगजेबाचा मुलगा सुलतान मुआझिम ऊर्फ बहादूरशहा यांनीं कोंकणांत प्रचंड सैन्यांनिशीं स्वारी केली. कोंकण प्रांतावर अत्यंत प्रचंड अशा ज्या थोड्या स्वाऱ्या झाल्या त्यापैकींच ही एक होती. मुसलमानांनीं बहुतेक सारा कोंकण प्रांत जिंकला. औरंगजेबाचा दुसरा मुलगा सुलतान अकबर हा संभाजी महाराजांच्या पक्षाचा होता. त्याचेसह संभाजी महाराजांनीं या किल्ल्याचा आश्रय केला. त्या मोहिमेंत मोंगल सैन्य विशाळगडाच्या वाटेस गेलें नाहीं. §

संभाजी महाराजांचा औरंगजेबानें इ. स. १६८९ मध्यें तुळापुरीं वध केल्यानें स्वराज्यावर मोठेंच संकट प्राप्त झालें. शिवाजी महाराजांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा करून स्थापन केलेलें राज्य अल्प कालांतच बुडणार अशी धास्ती वाटू लागली. त्या आणीबाणीच्या प्रसंगीं सर्व महाराष्ट्र मोगलानीं व्यापला असल्यानें राजाराम महाराजांच्या राणीसाहेब व अल्पवयी पुत्र शिवाजी यांचे संरक्षण करण्याची कामगिरी या गडानेंच बजावली आहे. पन्हाळा किल्ला मोगलांच्या ताब्यांत गेला असल्यानें राजघराण्याला विशाळगडाशिवाय अन्य आधारस्थान नव्हतें; आणि गडानेंहि तितक्याच इमानीपणें त्यांचें संरक्षण केलें. या मुदतींत रामचंद्रपंत अमात्य व परशुरामपंत प्रतिनिधी यांनीं गडावर राहून निराधार बनलेल्या महाराष्ट्राचा राज्यकारभार मोठ्या नेकीनें व धैर्यानें हांकला; याचें प्रत्यंतर इतिहासच देतो.

---

* पंत प्रतिनिधी बखर

§ Bombay Gazetteer Ratnagiri; VI Part II Page 31

संभाजीराजांचा वध झाल्यावेळीं राजाराम महाराज, येसूबाईसाहेब, बालराजा शाहू वगैरे मंडळी रायगडावर होती. त्यांना ही अशुभ वार्ता समजली. त्याचप्रमाणें औरंगजेबाचें सैन्य रायगडाच्या रोखानें चाल करून येत असल्याचेंही समजलें. त्या समयीं येसूबाईनें सांगितलें कीं " या किल्ल्यावर सर्वत्र राहिल्यास सर्वांनाच एकदम अटकेंत जावें लागेल. पल्ला पोहोंचणार नाहीं. यास्तव राजारामसाहेब व त्यांचा कबिला ऐसें काढोन निघोन जावे. सर्वांनीं एकेठाई मोहास पडून राहिल्यास सारी मसलत येथेंच पडून सर्वांनीं सांपडावें ऐसें घडेल " × याप्रमाणें त्यांनीं निक्षून सांगितल्यावर रायगडावर येसूबाई आणि बालराजे शाहू यांना ठेवून राजाराम महाराज आपल्या कबिल्यासह निघून पन्हाळ्यास आले. पन्हाळ्यालाही मोंगलानीं वेढा घातला तेव्हां ' येथें रहाणें ठीक नाहीं, बिकट जागा सह्याद्रिपर्वतातील बांधारियाचे किल्ल्यास जाऊन रहावें ' असा बेत करून विशाळगडीं आले. त्यासमयीं विशाळगड हा सर्वांत बळकट किल्ला समजला जात होता. समकालीन कवि केशव पंडित यानें आपल्या ' राजारामचरितम् ' नामक काव्यांत या प्रसंगाचें वर्णन करताना

" विशाळगिरिदुर्गेहि सांप्रतं विद्यते तव ।
अत्रापि दुर्ग सामग्री परिपूर्णैव भाति मे ॥ "

( सर्ग २ श्लो. १९ )

असा गौरवपर उल्लेख केला आहे. राजाराममहाराजांचे बरोबर तिघी स्त्रिया ताराबाई, राजसबाई व अहिल्याबाई होत्या. झुल्पिकारखानानें रायगड सर करून येसूबाई व शाहूराजे यांना बादशहाकडे नेलें; आणि तो राजाराममहाराजांच्या पाठीं लागला. संभाजीराजांच्या कारकीर्दीत कर्त्या माणसांची व सैन्याची वाताहत झालेली. तशांत आतां मोंगली सैन्य सर्व प्रांतांत फिरूं लागलें. यामुळें राजाराममहाराजांनीं दक्षिणेंत निघून जाण्याचा बेत केला. आपले कबिले विशाळगडावर ठेवून इकडील प्रांताचा कारभार रामचंद्रपंत अमात्य यांचेवर सोंपविला. राजाराममहाराज दक्षिणेंत गेल्यावर मोंगलांनीं

× राजाराम बखर—चिटणीस–पान. २६

पन्हाळा घेतला, परंतु रामचंद्रपंतांनीं विशाळगड हातचा जाऊं दिला नाहीं. राजाराम महाराज गेल्यावेळीं ताराबाईराणीसाहेब गरोदर होत्या. त्या शके १६१३ (इ. स. १६९१) मध्यें विशाळगडावर प्रसूत होऊन कोल्हापूरचे पहिले छत्रपती शिवाजी यांचा जन्म झाला. × त्यावेळीं 'पंतानीं विशाळगडावर ठाणें ठेऊन जवामर्दीनें खालीं प्रांतात स्वाऱ्या मारून नेऊन बेजमी करावी कोकणप्रांतही राखावा' § असा प्रकार चालविला. त्यांचे बरोबर परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी व नारोशंकर हेही होते. त्यांनीं गडाच्या आश्रयानें मोगलांस शह देऊन कोल्हापुर प्रांतांत त्यांचा पाय शिरकूं न देण्याचा प्रयत्न केला. या मुदतींत रामचंद्रपंत अमात्य गडावर राहून मोंगलांच्या हालचालींचें निरीक्षण करून परशुरामपंत यांस निवडक सैन्यानिशीं त्यांचेवर स्वारीस पाठवीत. औरंगजेबाचा मुख्य हेतु विशाळ-गड घेऊन राजाराम महाराजांचें कबिले हस्तगत करण्याचा असल्यानें तो निरनिराळ्या सरदारांचे हाताखालीं नवीन नवीन सैन्य पाठवून वारंवार हल्ला करीत असे. *

रामचंद्रपंत अमात्य हे राजशक १५ पासूनच गडावर अमलदारी करीत होते.§ पुढें राजाममहाराज जिंजीस गेल्यावर त्यानीं अमात्यपद हणमंत्ये यास दिले म्हणून 'हुकमतपनाह्' असें नवीनपद करून त्याची वस्त्रें विशाळगडीं रामचंद्रपंताकडे पाठवून दिलीं.+ रामचंद्रपंताकडून जे हुकूम येतील ते छत्रपतीनेंही मोडू नयेत इतकी या नवीन किताबाची योग्यता

---

× करवीरप्रांताचा इतिहास–मोडक—उत्तरार्ध भाग १ पान १७.

§ राजाराम बखर–चिटणीस पान ३१.

* प्रतिनिधींचे चरित्र—पारसनीस—पान ९.

§ 'विशाळगडावर राजशक १५ यांत राजाराम छत्रपतीकडून रामचंद्र निलकंठ बहुतकर अमात्य जिल्हा करून आले आणि वरघाट कोकण अमलाचीं पैरवी राजाज्ञे-वरून करीत होते;—पं. प्रतिनिधी बखर पान ३१

+ भारतवर्ष—किरात पान २०.

होती. रामचंद्रपंतानीं गडावर असतांना श्रीरामचंद्राचें देवालय बांधलें व प्रतिनिधींचे वाड्याजवळ हौद आहे त्याचे वरील बांधकाम व अर्धचंद्री म्हणून विहीर आहे ती असे बांधले. प्रतिनिधींच्या वाड्याचें जोतें आहे तेंही त्यानींच बांधलें.*

इतकी व्यवस्था इ. स. १६९२ पर्यंत झाली. पन्हाळा वगैरे किल्ले औरंगजेबानें पूर्वीच घेतले होते. विशाळगड मात्र त्याला अद्याप मिळाला नव्हता. तो काबीज करण्याकरितां पन्हाळा येथें कांहीं फौज त्यानें कायमची ठेऊन दिली होती. विशाळगड त्यावेळीं महाराष्ट्रांतील राज्यव्यवस्थेचें केंद्र होतें. आसपासचा मुलुख मोंगलाच्या ताब्यांत गेला होता. त्यामुळें रामचंद्रपंत विशाळगडांत कोंडल्यासारखें झालें होते. म्हणून त्यांनीं परशुरामपंतांचे हाताखालीं सैन्य देऊन पन्हाळ्यावर रवानगी केली व त्यानींही मोठ्या शौर्यानें विजय संपादिला.

अशारीतीनें एकामागून एक प्रांत काबीज करीत ढासळलेल्या मराठी साम्राज्याचा पुनः उत्कर्ष होऊं लागल्याचे पाहून यासर्वांचें मूळ जो विशाळ-गड किल्ला आणि तेथील मंत्रिमंडळ यांचा समाचार घेण्याचा निश्चय करून औरंगजेबानें आपला मोर्चा तिकडे वळविला. गडावर त्यावेळीं राजाराममहाराजाच्या तिघी स्त्रिया होत्या. त्यांचा बचाव करणें हें अमात्यांचें पहिलें कर्तव्य होतें. कोकणांतील शिर्के हे महाराजांचे आप्त असल्यानें त्यानीं राणीसाहेबास राजापुरास नेलें व तेथून पुढें जिंजीकडे रवाना केलें. याप्रमाणें राजघराण्यांतील मंडळी गडावरून निघून गेल्यानें औरंगजेबानें विशाळगड काबीज करण्याची कल्पना सोडून दिली.

या समयीं म्हणजे इ. स. १६९२ मध्यें मोगल सैन्यानें विशाळगड घेतला व तो पुढें ४।५ वर्षें त्यांचे ताब्यांत होता; नंतर गडावरील अधिकाऱ्यांनीं किल्ला परशुरामपंतांना परत दिला. अशी माहिती साताऱ्च्या प्रतिनिधी घराण्याच्या इतिहासांत दिली आहे. ( पान ११३ ) याखेरीज १७०२ सालीं झालेल्या प्रचंड मोहिमेचाहि सविस्तर वृत्तांत त्यांत दिला

* पंत प्रतिनिधी बखर.

आहे. परंतु १६९२ मधील मोहिमेची हकीकत विश्वसनीय वाटत नाहीं. उपलब्ध असलेल्या साधनांत या मोहिमेचा कोठेंच उल्लेख नाहीं. सदर इतिहासांत ही हकीकत पंतप्रतिनिधी बखरीवरून दिली आहे. पंतप्रतिनिधी बखरींत औरंगजेबाच्या स्वारीची एकच मोहीम दिली असून ती राजाराममहाराज जिंजीस जाण्याच्या वेळची आहे. परंतु १७०२ सालीं झालेली मोहीम इतिहासप्रसिद्ध असून त्या कालच्या कोणत्याही इतिहासांत तिचा उल्लेख आढळून येतो. यामुळें पंतप्रतिनिधी बखरींत जी एकच मोहीम वर्णिलेली आहे त्यांत कालाचा थोडासा विपर्यास झाला असला तरी ती १७०२ सालचीच मोहीम होती असें म्हणणें क्रमप्राप्त आहे. त्याचप्रमाणें पहिल्या मोहिमेच्या हकीकतींत औरंगजेबाच्या अमलदारांनीं इ. स १६९७ च्या सुमारास गड परशुरामपंताना परत दिल्यावर पंतांनीं सरदेसाई यांना धामापूर व मोर्डे, शामजी रंगनाथ यांस वरवली आणि कृष्णाजी भास्कर पंडित यास कलबस्ते हीं गांवें इनाम दिल्याचा उल्लेख आहे. (पान १२६). परंतु मोर्डे व कलबस्ते या गांवच्या सनदा हल्लीं उपलब्ध झाल्या असून त्या मावळंगकर सरदेसाई घराण्याचे इतिहासांत ले. ८ व २६६ यांस प्रसिद्ध केल्या आहेत. त्या इ. स. १७०६ व १७१२ या सालच्या आहेत. यावरून हीं इनामें १६९६ मध्यें दिलीं असल्याचें दिसत नाहीं. याचे उलट १७०६ मध्यें विशाळगड परत मिळाल्यावर केवळ सरदेसाई, ओर्पे वगैरे घराण्याला दिलेलीं कितीतरी इनामपत्रे हल्लीं प्रसिद्ध आहेत; त्याप्रमाणें १६९६ चें एकही इनामपत्र पुढें येत नाहीं. तसेंच त्या कालचीं पत्रे वगैरे जी प्रसिद्ध झाली आहेत त्यांपैकीं एकांतहि या मोहीमेचा उल्लेख आढळून येत नसल्यानें १६९२ मध्यें औरंगजेबानें विशाळगड किल्ला काबीज केला नाहीं हें स्पष्ट दिसतें.

इ. स. १६९२–९३ मध्यें जंजिऱ्याच्या हबशी लोकांनीं विशाळगड काबीज करण्याचे हेतूनें वेढा देण्याचा प्रयत्न केला. परंतु तो साधला नाहीं. तेव्हां गजापुराचे बाजूनें गडावर हल्ला करावा या हेतूनें टवडे गांवाकडून गजापुराकडे माचीसारखी खडी वाट आहे त्या वाटेनें येऊन

गजापूरनजीक एका डोंगरावर त्यांनीं तळ दिला. परंतु गडावर हल्ला करण्याचा त्यांचा बेत सिद्धीस गेला नाहीं. त्या डोंगरास हल्लींदेखील 'हबशाची खडी' असें म्हणतात. यानंतर ढोरबयाचे पादेनें हबशी लोक परत कोंकणांत गेले.

यापुढील ४।५ वर्षें मोठ्या धामधुमीची गेली. महाराष्ट्राचा एक धनी बादशहाच्या अटकेंत आणि एक वनवासांत जिंजीला! अशा परिस्थितींत मराठी सैन्य आणि मोगल सैन्य दोघेही एकमेकावर प्रसंग सांपडेल तसे हल्ले करीत होते. मोगलानीं एखादाप्रांत जिंकावा, व दुसरीकडे वळावे तों मराठ्यानीं झडप घालून तो पुनः काबीज करावा असा प्रकार चालला होता. रामचंद्रपंत अमात्य आणि परशुरामपंत प्रतिनिधी यांनीं विशाळगडावर राहून मोठ्या धैर्यानें या आपत्तीला तोंड दिलें आणि स्वराज्याची ज्योत जागती ठेवली. मराठ्यांच्या गनिमी काव्यापुढें औरंगजेब त्रासून गेला. मराठी राज्य एकदम पूर्ण असें त्याला काबीज करतांच येईना. शेवटीं मराठ्यांचा धनी काबीज केल्याशिवाय त्यांचा प्रदेश आपणास हस्तगत होणार नाहीं अशी खात्री वाटून बादशहानें जिंजीवरील वेढा जास्त नेटानें लढविण्यास हुकूम दिला. ही हकीकत रामचंद्रपंत, परशुरामपंत वगैरे कार्यकर्त्यांना समजली. त्यावेळीं बराचसा मुलूख त्यांनीं हस्तगत केला होता. यामुळें राजाराम छत्रपतीनीं आतां इकडे येणें इष्ट आहे असें वाटल्यानें त्यांनीं राजाराम छत्रपतीस त्याप्रमाणें कळविलें. महाराज युक्तीनें वेढ्यांतून निसटले आणि देशीं येण्यास निघाले. ' येतेवेळीं त्यानीं दोन टोळ्या केल्या. धनसिंगराव जाधवराव सेनापति एका टोळींत, संताजीराव घोरपडे ममलकतमदार वगैरे मंडळी आपल्या टोळींत घेऊन निघाले. मोंगलाची फौज मागें लागली असता लढाई होत होत खासा स्वारी विशाळडास येऊन पोहोचली. ( जानेवारी १६९८ ) सेनापति यांच्या मागें मोगली फौज कांहीं लागली. त्यास लढाई देत धनगिरीचे आश्रयास येऊन, तेथें राहून मोगलाई फौजेचा पराभव करून तेही देशीं विशाळगडास आले. मागाहून शिर्के मोहिते यांनीं महाराजांचे कुटुंब, उभयता पुत्र व नाटकशाळा वगैरे विशाळगड

मुक्कामीं पोहोचते केले' ( राजाराम बखर–चिटणीस ) याप्रमाणें आठ वर्षें छत्रपतींनीं वनवासांत काढून परत विशाळगडीं येऊन राज्यसूत्रें हातीं घेतलीं. त्यानंतर १६९९ मध्यें राजारामहाराजांचे पूर्वींचे प्रतिनिधी तिमाजीपंत हनमंते मोंगलाच्या तडाक्यांतून मोठ्या युक्तीनें सुटून विशाळगडावर महाराजांचे भेटीस आले व तेथेंच त्यांना पुनः प्रतिनिधीपदाची प्राप्ती झाली.×

यानतर राजकारणाच्या सोयीकरितां राजाराममहाराज साताऱ्यांस गेले. परंतु त्यांनीं विशाळगडावरील ठाणें हालविलें नाहीं. ताराबाई-राणीसाहेब वगैरे मंडळी गडावरच रहात होती. राजाराम छत्रपतींनीं गडाची पुष्कळच दुरुस्ती केली. त्यानीं "तेथें कोठ्या व पागा बारा हजार घोडा रहाण्याजोगी बांधून छावणीही विशाळगडावर होत होती." §

राजाराममहाराजांचा काल सिंहगडावर राज्या. शके २६ प्रमाथिनाम संवत्सरे फाल्गुन व॥ ८ शके १६२१ रोजीं ( ता. २ मार्च सन १७०० ) झाला. त्यावेळीं अहिल्याबाई/अंबिकाबाई राणीसाहेब विशाळगडावर होत्या. त्यांना हें वर्तमान ता. ५।३।१७०० रोजीं समजतांच त्या गडावर सती गेल्या. त्या समयीं घडलेली एक विलक्षण गोष्ट मल्हार रामराव चिटणीस यानीं आपल्या बखरींत लिहीली आहे.

"हें वर्तमान विशाळगडी कळलें, त्या समयीं चार सहा घटका दिवस होता. अंबिकाबाईस समजल्याबरोबर त्या वाड्यांतून निघून सदरेस आल्या. हवालदार इत्यादिकांनीं मुजरा करून ते श्रमी झाले. तेव्हां बाई बोलल्या कीं, "हा मृत्युलोक आहे. श्रमीं कां होता ? आम्हीं सहगमन करणार. साहित्य करावें !!" यावरून सरनोबत बोलला कीं, "महाराज असतां वाड्याबाहेर निघता येत नव्हते. हल्ली या मिषें लोक पहावेत अशी इच्छा झाली."

हें ऐकतांच "ज्यांचे दैवीं माझे सतीचे जाणे पहाणें असेल ते पहा-

× प्रतिनिधींचें चरित्र–पारसनीस–पान १४.

§ पंतप्रतिनिधी बखर, Bombay Gazatteer–Kolhapur.



घोडखिंड.



श्रीमंत पंत प्रतिनिधी यांचा वाडा.



भूपाल तळे.

तील " अशीं अक्षरें निघताच यांचे डोळें अंध झाले. त्या काळीं सरनोबत घाबरा होऊन पायावर डोई ठेवली. " महाराज, मी चुकलो. मजवर क्षमा करावी. " असें म्हटल्यावरून हसून बोलल्या कीं " सती जाण्याचे पहावे " म्हणताच दिसूं लागले. हा चमत्कार सर्वांनीं पाहून विनंति केली कीं, " महाराजांचा काळ सिंहगडी झाला, आज तिसरा दिवस. तेव्हां सहगमन कशास करावे " ? तेव्हां उत्तर केले. " आपल्यास कळले तोच दिवस मुख्य. तुम्ही कोणी संशय न धरतां साहित्य लवकर करा, अनमान कराल तर तुम्हास महाराजांच्या पायाची शपथ. " तेव्हां हवालदार = यानीं विनंति केली, " दिवस थोडा राहिला, मलकापुराहून साहित्य येणे, रात्र होईल. गलबलीचे दिवस, किल्ल्याचे काम, येविशी आज्ञा व्हावी. " " स्वार पाठवून जलदीनें सामान आणवावे, मी सहगमन केल्यावांचून सूर्य अस्तास जाणार नाहीं " तेव्हां एकमेकाकडे पाहूं लागले. " तुम्ही खोटे मानूं नका " ( असें सांगून ) सदरेची सावली पडली होती, त्या सावलीजवळ किंचित् मातीचा ढीग करवून त्यावर पळसाचे पान रोविले; आणि " त्यास ओलांडून सावली जाणार नाहीं " असें म्हटल्यावरून हवालदारानें विनंति केली कीं " आज्ञेप्रमाणें स्वार रवाना करतो. अस्तमान झाल्यास दरवाजे लावीन. साहेबी राग भरूं नये " " नाहीं " असें उत्तर केल्यावर स्वारामागें स्वार ठेऊन स्वारांची डाक लावली. पळसाचे पानावरून सावली गेली नाहीं. मलकापुराहून साहित्य येऊन महाराजांच्या पागोट्याबरोबर बाईनीं सहागमन केले. स्नानविधी सर्वत्र करीत तोपर्यंत प्रकाश दिसतच होता. सर्वत्र सदरेस आल्यानंतर चार तास रात्र झाली. अंधःकार दिसूं लागला. हे पाहून सर्वत्रांस आश्चर्य वाटले. " सतीचा प्रताप " असे सर्वत्र म्हणूं लागले. पंतानीं विशाळगडीं दानधर्म बहुत करविला." पुढे सती गेल्याठिकाणीं बुवासाहेब महाराजानीं वृंदावन बांधून खर्चाची नेमणूक करून दिली.

हें वृंदावन नादुरुस्त होऊन पडले होतें त्याठिकाणीं इ. स. १९४० मध्यें कै. श्रीराजाराम छत्रपती करवीरकर यांनीं जीर्णोद्धार करून नवीन

= संताजी काटे

घुमदार छत्री बांधविली आहे. त्या पुण्यशील सतीच्या पतिभक्तीची साक्ष गडावरील समाधी सर्वांना देत आहे.

राजाराम महाराजांचे कारकिर्दीत शाहूराजापर्यंत गडावर हवालदार झाले त्यांचीं नांवे :—

१ त्रिंबकजी इंगळे—तीन वर्षे.
१ संताजी काटे—नऊ वर्षें.
१ खंडोजी करंजकर—तीन महिने.
१ उमाजी गायकवाड—सहा महिने.
१ शामाजी रंगनाथ ओर्पे—सहा वर्षें.
१ विठोजी निंबाळकर—सहा महिने.
१ मानजी दळवी—दोन महिने.

याप्रमाणें गडावर हवालदार झाले. ×

राजाममहाराजांच्या मृत्यूनंतर मोगल सैन्यानें साताऱ्यास वेढा घालून तो काबीज केला. यामुळें परशुरामपंत पन्हाळ्यास जाऊन नंतर विशाळगडास गेले. ताराबाई व राजसबाई पुत्रासह तेथें गेल्या होत्याच. शंकराजी नारायण, धनाजी जाधव ही मंडळीही मागाहून तेथें आली. सर्वांच्या वाटाघाटी होऊन राजारामाचे वडील पुत्र आणि करवीरचे पहिले अधिपति शिवछत्रपति ( दुसरे शिवाजी ) यांना शके १६२२ राजशक२७ ( इ. स. १७००–०१ ) मध्यें विशाळगडावर राज्याभिषेक करून महाराष्ट्रांत त्यांच्या नांवाची ग्वाही फिरविणेंत आली.*

नंतर लवकरच बूधकर घाटगे यांच्या कन्येशीं त्यांचा विवाहही करण्यांत आला. या सर्व गोष्टी विशाळगडावर परशुरामपंत प्रतिनिधी आणि

---

× पंत प्रतिनिधी बखर पान ४२.

* चिटणीस आपल्या बखरींत राज्याभिषेक पन्हाळ्यावर झाल्याचे लिहितात. परंतु पारसनीस आपल्या प्रतिनिधींच्या चरित्रांत राज्याभिषेक विशाळगडावर झाला असें लिहितात. सा. प्र. घ. इतिहासांत याच मताला दुजोरा देण्यांत आला आहे; आणि अमात्य बावडेकर—बखर भारतवर्ष पान ५ वरही हेंच नमूद केलेलें आहे.

शंकराजी नारायण यांच्या सल्ल्यानें ताराबाई राणीसाहेबानीं १७०१ पर्यंत उरकून घेतल्या. छत्रपती दुसरे शिवाजीचे त्यावेळीं १०।१२ वर्षांचें वय होतें.

मोगल सैन्यानें मराठ्यांचा पाठपुरावा सारखा चालू ठेवला होताच. अखेर विशाळगड काबीज करण्याचे हेतुनें १७०१ च्या पावसाळ्यापूर्वी पन्हाळा घेऊन पावसाळ्यांत पांचगांव येथें छावणी केली. वर्षाकाल संपताच औरंगजेब बादशहाची स्वारी बेदरबख्त, महमद अमीनखान, फत्तेउल्लाखान वगैरे मोठमोठ्या सरदारांसह आणि आपल्या प्रचंड फौजेसह विशाळगडावर मोहिम करण्याकरितां ता. १३ नोवेंबर सन १७०१ रोजीं निघाली. या स्वारीचे वर्णन इटालियन प्रवासी मनूची, खाफिखान, ग्रँटडफ वगैरे बहुतेक प्राचीन इतिहासकारांनीं आणि बखरकारांनीं मोठ्या बहारीनें दिलें आहे. त्यावरून औरंगजबाच्या सर्व स्वाऱ्यांत ही किती महत्वाची समजली जात होती याची खात्री होईल प्रवासी इतिहासकार मनूची हा स्वतःच औरंगजेबाच्या स्वारींत असल्यानें त्यानें दिलेली हकीकत बरीच विश्वसनीय मानणें भाग आहे.

मोगल सैन्य मोहिमेवर निघाल्यानंतर वळवाचें पावसानें मधून मधून झोड उठवून दिल्यामुळें रस्त्यानें त्याला अतिशय त्रास झाला. पन्हाळ्यास पोहोचल्यावर मराठ्यांना त्या रस्त्यानें विशाळगडाकडे जाता येऊं नये म्हणून राजपुत्र बेदरबख्त यास फौजेसुद्धां तेथें ठेवलें आणि आपण आंबाघाटाकडे कूच केलें. पन्हाळ्यापासून आंबाघाट दोन दिवसांच्या वाटेवर असून बादशहास तेथें पोहोंचण्यास बारा दिवस लागले यावरून बादशहाबरोबर केवढा प्रचंड सरंजाम होता याची कल्पना येईल. आंबाघाटावर पोहोंचल्यानंतर त्या रस्त्यानें गडावरील फौजेस कुमक मिळूं नये व त्यांचे दळणवळण तोडून टाकावें म्हणून त्यानें महमद अमीनखान या सरदाराला फौजेसह तेथें ठेवलें. मराठ्याचें दळणवळण बंद पाडून लमाण, वंजारी वगैरे लोकांकडून बादशाही फौजेंत रसद पोहोंचविण्याचीहि कामगिरी त्याचेवर सोपविली. हे दोन्ही मार्ग याप्रमाणें बंद करून बादशहाची स्वारी स्वतः मोठें सैन्य घेऊन विशाळ-

गडाखालीं दोन तीन मैलांवर ता. २७ डिसेंबर सन १७०१ रोजीं येऊन दाखल झाली आणि गजापूरनजीकच्या विस्तृत माळावर आपली छावणी उभारली. तें ठिकाण अद्यापही 'बादशहाचा माळ' या नांवानें वाखाणलें जातें. पांचगांवाहून निघाल्यापासून गडास पोहोंचण्यास औरंगजेबाच्या सैन्यास जवळ जवळ दीड महिना लागला. येथें येऊन पोहोंचल्यानंतर गडाला वेढा घालण्याचें काम त्यानें लागलीच सुरू केलें. इ. स. १७०२ च्या जानेवारी महिन्यापासून विशाळगडाच्या वेढ्याला आरंभ झाला. यावेळीं ताराबाई व बालराजा शिवाजी यांच्या स्वाऱ्या प्रतापगडावर होत्या. ऽ

गडाला वेढा पडणार याचा अगोदरच अंदाज होता यामुळें गड लढविण्याची कामगिरी परशुरामपंत प्रतिनिधी यांचेवर सोपविण्यांत आली होती§ तेथील फौजेचें सेनापतीत्वही त्यांचेकडेच होतें. त्यांनीं माऱ्याच्या सर्व जागा रोखून ठेऊन त्या ठिकाणीं चौकी पहाऱ्याचा उत्तम बंदोबस्त केला. किल्ल्यांतील लोकांना पुष्कळ दिवस पुरेल अशी धान्याची व दारू गोळ्याची बेगमी केली; आणि वेळोवेळीं आणखीही येऊन पोहोचावी अशी तजवीज करून ठेवली. गडावर येतांना वाटेंत पन्हाळा, मलकापूर, आंबा या ठिकाणीं ठाणीं बसवून बादशहानें नाकेबंदी केली होती. परंतु मराठी सैन्याच्या टोळ्या त्याना त्रास देऊन बेजार करीत. शत्रूची रसद परभारें लुटून गडावर पाठवीत. सातारा, कराड वगैरे प्रांतांतून देशावरून व राजापुराकडून अणस्कुराघाटानें गडावरील शिबंदीला सर्व तऱ्हेची मदत पोहोंचत असे. या कामीं तुको मल्हार, लिंगो माने, बाळा घाटगे, शहाजी निंबाळकर, प्रतापराव मोरे, संताजी पांढरे वगैरे सरदार मंडळीनीं चांगलीच मदत केली. दादाजीशेट वायकूळ यास या कामगिरीबद्दल इनामें देण्यांत आली. त्यापैकीं विशाळगड जहागिरींत मौजे तळवडे हें गांव त्यांचे वंशजाकडे अद्याप चालत आहे. यानें राजापुरच्या रस्त्यानें दारूगोळा आणि धान्य याचा पुरवठा केला.

ऽ ऐ. पत्रें, यादी वगैरे भारतवर्ष पान ५१.

§ म. इ. सा. खं. २ पा. २०

पन्हाळ्यावर बेदरबख्त फौजेसह होता. तेथें थोड्याच दिवसांनीं मराठ्यांनीं त्याचेवर जोराचा हल्ला केला. यावेळीं राजपुत्राबरोबर बारा-हजार फौज होती. पण त्या सर्वांचा त्यानीं पार धुव्वा उडवून दिला. या हल्ल्यांत त्याचे बावीस अमलदार ठार होऊन स्वत: राजपुत्र मोठ्या कष्टानें घोड्यावर बसून बादशहाच्या छावणींत येऊन पोहोचला. संताजी पांढरें यानें मलकापुरांत बसविलेलें ठाणें लुटून फस्त केलें. +

गडावरील हल्ल्यांत बादशहाचा वजीर असदखान यानें फार मेहनत घेतली. त्याचप्रमाणें फत्तेखान यानें चढाई करून जाण्यांत आणि किल्ल्या-वर वारंवार हल्ले करण्यांत मोठें शौर्य दाखविलें. तसेंच फत्तेउल्लाखानानेंही चढाई करून जाण्यांत मोठा उत्साह दर्शविला. रायपुत्र बेदरबख्तही वेढ्याचें कामांत सक्त मेहनत करीत होता. पन्हाळा व आंबाघाट यथील बादशहाच्या सरदारांनीं किल्ल्यांत पोहोचणारी रसद अजिबात बंद करून टाकली. इतकेंच नव्हे तर असपासचीं खेडींसुद्धां उध्वस्त केलीं. तथापि अमात्य आणि प्रतिनिधी यांच्या नेतृत्वाखालीं मराठी सैन्यानें त्याची मात्रा चालूं दिली नाहीं.

बादशहाचें पाउणलाख सैन्य चार साडेचार महिने वेढा घालून कांहीं फायदा होत नाहीं असें जेव्हां बादशहास दिसून आलें तेव्हां त्यानें भेद-नीतीचा अवलंब केला. शिसाच्या गोळयाऐवजीं सोन्याच्या गोळयाचा

---

+ यासंबंधी प्रतापराव मोरे यास छत्रपती शिवाजीनें ( ताराबाई ) उत्तेजनपर पत्र पाठविलें तें असें:—

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २८ वृषभनामसंवत्सरे भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाशिवछत्रपति यांनी रा. रा प्रतापराव मोरे यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही व रा. संताजी पांढरे फौजेनिशी मलकापुरानजीक औरंगजेबाची चौकी होती ती मारली. हें वर्तमान कळल्यावरी स्वामीनें तुम्हास आज्ञापत्रें पाठविली आहेत. ती पाहून वर्तमान कळलें. औरंगजेब विशाळगडास बिलगला याजकरितां त्याचे कबिलाबाड मारून हमेशा गोटावर हल्ले करावे तरीच तो बलकुबाल राहातो"—भारतवर्ष.

मारा सुरूं केला. आणि शेवटीं रखवालदारास फितुर करून गडांत प्रवेश मिळविला. शत्रूंनीं प्रवेश केल्यानंतर गडाचे संरक्षण करणें अशक्य झाल्यानें परशुरामपंतानें राजपुत्र बेदरबख्त याचे मार्फत समेटाचें बोलणें सुरूं केलें. अखेर तडजोड होऊन परशुरामपंतानें किल्ला बादशहाच्या स्वाधीन केल्यास ही मोहीम येथेंच थांबवून मराठे सरदार व सैनिक यांना कसलाही अपाय न करण्याचें त्यानें आश्वासन दिलें. या मोहिमेंत बादशहाचे सरदार इतक्या जिकीरीस आले होते कीं कोणत्याही उपायानें अल्पकाल कां होईना गड ताब्यांत मिळावा अशी त्याना उत्कंठा लागली होती.+ औरंगजेब बादशहानें याप्रसंगीं परशुरामपंतास लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे. तें पर्शियन भाषेंत असून त्याचे भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनीं मॉडर्न रिव्ह्यूच्या जानेवारी इ. स. १९०८ च्या अंकांत दिलें आहे. तें असें:—

A letter from Aurangzeb to Parasuram Trimbak.

Parasuram Trimbak, submissive to Islam, hope and know that although your great offences do not deserve pardon, yet in as much as the beloved Prince Muhammad Beder Bakht Bahadoor has reported to the Emperor, that you have repented of your past sins and offered with all humility and submission to surrender the fort of Khelna to the Imperialists on condition that—

1 The Imperial army does not march to the conquest of your forts, but returns to the former ( Moghal ) territory.

2 You are assured of the pardon of your faults and the sparing of your own and your companions' lives, by the issue of an Imperial Farman.

+ " At length, according to common rumour, the Prince and some of the Amirs sent him secretly a sum of money, and a promise of security for himself and family on condition of his surrendering. " Elliot vol. VII P. 371.

3. And you are honoured by the acceptance of your requests stated in writing to the Prince.

Therefore at the request of the Prince the Gracious Emperor issues this order that when you wait on the Prince and surrender the fort of Khelna your offences will be pardoned and you and your comrades will be spared your lives, and the Imperial army will not march towards you to conquer your forts and country, but will ( God willing ) march back to the Imperial dominion after taking possession of Khelna. You should soon deliver Khelna to the Imperial officers and leave the fort with your comrades in peace of mind. Remain firm and true to your promises and regard it as very necessary to avoid doing the contrary. Written on the 11th Muharram 46th year of the reign. ( 27th May 1702 A. D. )

याचा आशय असा :—

औरंगजेबाचें परशुराम त्रिंबक यांस पत्र.

इस्लामी धर्माचा अनुयायी परशुराम त्रिंबक यांस कळावें कीं जरी तुमचे अपराध अक्षम्य आहेत तरी आमचे परमप्रिय राजपुत्र महमद बेदरबख्त यानें तुम्हास आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप झाला असून खालील अटीवर खेळणा किल्ला आमचे हवालीं करण्यास तुम्ही तयार असल्याचें कळविलें आहे—

१ मोगल सैन्य यापुढे तुमच्या किल्ल्यावर स्वाऱ्या करणार नसून आपल्या मुलखास परत जाईल.

२ तुमचे अपराध माफ करण्यांत येतील असें तुम्हास आश्वासन देण्यांत येत आहे; त्याचप्रमाणें तुमच्या व मराठी सैन्याच्या जीवास अपाय होणार नाहीं असें बादशाही फर्मानानें जाहीर करण्यांत येईल आणि

३ राजपुत्राकडे तुम्ही कळविलेल्या अटींचा स्वीकार करण्यांत येत आहे.

सबब राजपुत्राचे विनंतीवरून बादशहा हुकूम करीत आहे कीं ज्यावेळीं तुम्ही राजपुत्राचे हवालीं गड कराल त्यावेळीं तुमचे अपराध माफ करण्यांत येऊन तुमच्या व तुमच्या अनुयायांच्या जीवास अपाय करण्यांत येणार नाहीं; आणि मोगल सैन्य खेळणा काबीज केल्यानंतर तुमच्या इतर किल्ल्यावर हल्ला न करतां परत जाईल तरी तुम्ही आमचे अधिकाऱ्यांचे स्वाधीन गड करून आपल्या सरंजामासह शांत चित्तानें गडावरून निघून जावें. तुम्हीं दिलेले वचन पाळा आणि त्याविरुद्ध वर्तन न करण्याची खबरदारी घ्या. ता. ११ मोहरम राज्यसन ४६ " (ता. २७ मे १७०२.)

यावरून हा गड कसातरी हस्तगत करण्याची बादशहास किती उत्कंठा लागली होती हें निदर्शनास येणार आहे. अखेर वाटाघाटी होतां होतां ता. १७ जून १७०२ रोजीं परशुरामपंतांनीं बादशहाचें निशाण विशाळगडावर लावलें आणि रात्रीं ते मुलांमाणसांसह गडावरून निघून गेले. दुसरें दिवशीं मराठीं सैन्यानेंही गडाचा त्याग केला. गड ताब्यांत आला ही बातमी समजली त्यावेळीं बादशहा कुराण वाचीत होता. त्यांत त्याला एक शुभ वाक्य दिसलें आणि तो

" अह—मदुल्लीला—ही—अज्ञा—सखरलाना—हाजी "

असें बोलला. त्यावरून त्यानें आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ' सक्करलाना ' असें गडाचें नांव ठेवलें. §

औरंगजेब बादशहाचें धर्मवेड सर्वांस परिचित आहेच. गड घेतल्यावर आपलें नांव राहण्यासाठीं त्यानें असेंच एक कृत्य करून ठेवलें असें म्हणतात. गडावर मलिकरैहान याचा एक दर्गा आहे. तेथें मशिदीस पांच पायऱ्या होत्या, त्यांतून दोन पायऱ्या खणून काढून तीन पायऱ्या कायम ठेवल्या. त्याचें कारण दिल्लीस पांच पायऱ्या आहेत. तेव्हां या जाग्यास पांच असूं नयेत असें समजून दोन कमी केल्या.* मुख्य वजीर असदखान यानें या मोहिमेंत फारच मेहनत केली म्हणून बादशहा त्याचेवर

§ Ratnagiri Gazeteer; Nairn History of Konkan.

* पं. प्र. बखर

इतका खूष झाला कीं त्यानें त्याला दरबारांत न्यायाचें वगैरे काम चाललें असतां आपल्या उजव्या हाताकडे बसण्याची परवानगी दिली. हा एवढा मान दुसऱ्या कोणालाही त्याचे कारकीर्दीत मिळाला नाहीं.

अशा दीर्घ प्रयासानें गड हस्तगत झाल्यावर उदितसिंग याला गडावर बंदोबस्ताकरितां नेमून बादशहा परत फिरला. यावेळीं पर्जन्य सुरू असल्यानें वाटेंत त्याच्या सैन्याचे अनन्वित हाल झाले; आणि मोठ्या कष्टानें तो बहादुरगडास पोंचला.×

या प्रसंगानंतर सुमारें पांच वर्षें विशाळगड मोंगलांचे अमलाखालीं होता. औरंगजेब बादशहा या भागांतून परत फिरल्यानंतर रामचंद्रपंत अमात्य व परशुरामपंत प्रतिनिधि यांनीं गेलेला मुलूख परत घेण्याचा सपाटा चालविला. इ. स. १७०६ पर्यंत बाकीचे किल्ले व मुलूख परत घेतला; परंतु विशाळगड मात्र हस्तगत होणेचा राहिला. औरंगजेब बादशहा १७०७ च्या फेब्रवारीमध्यें मृत्यू पावल्यानंतर उदितसिंगानें स्वदेशास परत जाण्याचा विचार केला. त्यासमयीं उदितसिंगाकडून गड आपल्या ताब्यांत घेण्याचें कारस्थान जंजिऱ्याच्या शिद्दीनें सुरू केलें. परंतु मराठ्यांनींही कृष्णाजी भास्कर याचेमार्फत बोलणें करून गड मराठ्यांचे हवालीं करण्यास त्याचें मन वळविलें. यावेळीं उदितसिंगचे हाताखालीं विनायक सरदेसाई मामले प्रभानवल्ली, गणोबा नायक सरदेसाई, + चिमणाजी बल्लाळ देशाधिकारी वगैरे जुने कामगार होते. त्यानींही उदितसिंगाचें मन वळवून त्याची रवानगी केली आणि विशेष प्रयासाशिवाय युक्तीनें विशाळगड पुन्हां मराठी राज्यांत सामील केला. कृष्णाजी भास्कर पंडित व सरदेसाई यांनीं ही जी मोठी महत्त्वाची कामगिरी केली त्याबद्दल पुढे इ. स. १७१२ मध्यें शिवछत्रपतीनीं कृष्णाजी भास्कर पंडित यास मौजे कलबस्ते तर्फ संगमेश्वर हा गांव वंशपरंपरेनें इनाम देऊन

---

× Ferista's history by Scott Vol. II Page 109 and Eliot Vol. VII page 372–73.

+ सुप्रसिद्ध रियासतकार रा. ब. सरदेसाई यांचे पूर्वज.

त्यांच्या श्रमाचें योग्य चीज केलें. ÷

सरदेसाई यांनांही बरींच इनामें करून दिलीं. =

विशाळगड परत कसा हस्तगत झाला याबद्दल ता. १२–४–१७०७ रोजीं करवीरकर शिवाजी महाराज यांनीं गणोबा नायक सरदेसाई यांना आज्ञापत्र लिहिलें आहे, त्यांत या प्रसंगाची सविस्तर हकीगत लिहिली आहे. विशाळगड हस्तगत झाल्यावर थोडक्यांच दिवसांत खुद्द छत्रपतींच्या पत्रांत ही हकीगत लिहिली असल्यानें तिचें महत्त्व किती आहे हें सांगावयास नकोच.

> " मुख्य तांम्र निधन पावल्यावरी रा। उदितसिंग यांणी स्वदेशास जावयाचा विचार केला ते प्रसंगीं शामलानें विशाळगड आपले स्वाधीन करणें म्हणून राजकारण लाविले हे तुम्हांस कललियावरी तुम्ही आपले मुतालिक कृष्णाजी भास्कर यास लेहोन उदितसिंगास उपदेश करऊन ते गोष्टी राहविली व त्यासहि आपला नायब तेथें ठेऊन किला कृष्णाजी भास्कर यांचे स्वाधीन करून जावें ये गोष्टीचे दृढीकरण रा. कृष्णाजी परशराम यास सांगोन केले म्हणून मा।र निलेनी लिहिले व तुम्हाकडील गोपाल अनंत व उदितसिंगाकडील प्रचित राऊ हुजुर आले व कृष्णाजी परशराम यांनी बालाजी लिंगोजीस पाठविले त्याणी विनंति केली त्यावरून हि कलो आले येसियास तुम्ही स्वामीचे यकनिष्ठ सेवक पहिले पासून निष्ठेनें सेवा करीत आले आहा तुम्हापासून स्वामी कार्यास अंतर बहुधा होते की काये शामलाचा पराक्रम स्थलावरी होऊ न दिल्हा उदितसिंगानें नायब ठेऊन किला कृष्णाजी भास्कर याचे स्वाधीन करावासा करार दाद केला हें अतिउत्तम केले तुम्हाकडील

÷ काव्येतिहास संग्रह पत्रें व यादी पत्र नं. ४०९ पान ३६७.

= सरदेसाई घराण्याचा इतिहास ले० ६५, ६७, ६९, ७०, ७१, ७६, ७७ वगैरे.

कृष्णाजी भास्कर ते जागा आहेत तें बरे शहाणे माणूस आहे तरीच हा प्रसंग घडून आला ये गोष्टीवरून स्वामी संतोषी होऊन त्यास अभयेपूर्वक समाधान पत्र व वरकड वतनदारास अभयपत्रें सादर केली आहेत उदितसिंग यास हि समाधानपत्र पाठविलें आहे. तरी तुम्ही जाल्या निर्वाहाप्रमाणें विचार होऊन त्याचे जाणे होये कार्य सिधीस पावे तुमचे सर्वांचा मुजरा होये. येसी गोष्टी करणें स्वामीस तुमचें चालविणें अगत्य आहे त्यास राजश्री परशरामपंडित प्रतिनिधि त्या प्रांते पाठविले आहेत तुम्ही त्यांचे आज्ञेप्रों स्वामीसेवा करणे ते तुमच्या ऊर्जिताचा निश्चय करून हुजुर लिहितील तदनुसार स्वामी तुमचे उर्जित करून चालवितील येविसी समाधान असो देणें जाणिजे लेखनालंकार " (मावळणकर सरदेसाई घराण्याचा इतिहास पूर्वार्ध प्रभावळी दप्तर ले. ६८)

यानंतर मात्र ताराबाई राणीसाहेबांनीं करवीरची राजधानी पन्हाळगडावर केल्यामुळें करवीरकरांचा निवास तिकडेच होऊं लागला. परशुरामपंत प्रातिनिधींनीं आपलें घरदारच विशाळगडावर केलें असल्यानें ते बहुधा गडावरच रहात असत. परंतु ही स्थिति जेमतेम एखादें वर्षच टिकली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल बादशहांनीं मराठीराज्यांत दुही लावण्याचे हेतूनें शाहूमहाराजांची १७०७ च्या एप्रिल महिन्यांत बंदींतून सुटका केली.

शाहूमहाराजांनीं दक्षिणेंत येऊन मराठा सरदारांना सामील होण्याबद्दल आज्ञापत्रें लिहिलीं. तथापि करवीरकरांनीं त्यांचें स्वामित्व अमान्य करून त्यांच्या पदाधिकारास विरोध केला.

झुलपिकारखानास शाहूनें मदत चांगली केली. यामुळें शाहूवर त्याची चांगली मर्जी बसून त्यानें शाहूस दक्षिणेच्या सरदेशमुखीची सनद देण्याबद्दल दिल्लीस लिहून पातशहाची मंजुरी आणविली. परंतु सनद देण्याच्या वेळीं ताराबाईच्या वकिलांनीं पातशहाच्या वजिरास असें कळविलें कीं, 'ताराबाईचा पुत्र हा मराठ्यांचा मुख्य धनी आहे

यास्तव सरदेशमुखीची सनद त्याच्या नांवें द्यावी.' तेव्हां त्यानें असें ठरविलें कीं, 'लढाईचे अंतीं जो मुख्य ठरेल त्याच्या नांवें सनद देण्यांत येईल.' यामुळें शाहू व ताराबाई यांच्यामध्यें लढाईचा प्रसंग आला.

शाहू महाराजांनीं चंदन वंदन किल्ल्यावर व ताराबाईनें कोल्हापूर प्रांतीं फौज जमा केली आणि इ. स. १७०८ सालीं दसरा होतांच फौजेसह शाहूमहाराज कोल्हापुराकडे कूच करते झाले. मार्गांत वसंतगड घेऊन पन्हाळा व विशाळगड हे दोन बळकट किल्ले घेण्यासाठीं ते पन्हाळ्याकडे आले, तेव्हां ताराबाई शिवाजी व संभाजी यांसह रांगण्यास गेली. शाहू महाराजांनीं पन्हाळा व पावनगड घेतले; आणि कोल्हापूर प्रांतांत अमल बसवून रांगण्याकडे कूच केलें. त्यावेळीं ताराबाई मालवणास गेली. पुढें पर्जन्यकाळ आल्यानें मोहीम तहकूब ठेवून शाहूमहाराज पन्हाळ्यास छावणीस आले.* कोल्हापूर प्रांतांतील मोठ्या किल्ल्यांपैकीं आतां फक्त विशाळगड किल्ला घेण्याचा राहिला. त्यावेळीं किल्ल्यावर पंडित, सरदेसाई, ओर्पे वगैरे परशुरामपंताचे जुने अंमलदार होते. त्याना शाहूमहाराजांनीं पन्हाळा व पावनगड हे कोणत्या मार्गांनीं घेतले आणि तेथें कसा बंदोबस्त केला हें कळलें. त्यांनींहि किल्ला शाहूमहाराजांच्या स्वाधीन करण्यांत त्यांचेंच अनुकरण केलें. 'आमचीं कामें आमच्याकडे ठेवल्यास आम्हीं किल्ला महाराजांच्या स्वाधीन करण्यास तयार आहोंत.' असें अंमलदारांनीं बोलणें लावतांच शाहूनें त्यांचें म्हणणें मान्य करून विशाळगड आपल्या ताब्यांत घेतला. आणि खंडो बल्लाळ याचा बंधू निळो बल्लाळ यास अमलदार व बाबजी भांडवलकर यास हवलदार आपल्यातर्फे करून तेथें ठेवलें. ×

अशा रीतीनें विशाळगड सातारकरांच्या अंमलाखालीं गेला. परशुराम

* मोडकांचा कोल्हापूर राज्याचा इतिहास उत्तरार्ध भाग १ पान २७

× भारत वर्ष--पंत प्रतिनिधी बखर पान ४४; साताराच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास भाग १ पान २४०-४१. 'विशाळगड तालुका निळो बल्लाळ यांजकडे होता त्याजकडेच सुभा सांगून तालुका ठेवला' असें चिटणीस आपल्या बखरींत म्हणतात तें बरोबर दिसत नाहीं. प्रतिनिधींच्या बखरींत निळो बल्लाळ याची नंतर नेमणूक

त्रिंबक प्रतिनिधि हे ताराबाईच्या पक्षाचे म्हणून शाहू महाराजांनीं त्यांना परळी किल्ल्यावर बंदीवासांत ठेवले होते. परंतु कोल्हापूर प्रांत सर केल्या-नंतर प्रतिनिधिसारखा राजकार्य धुरंधर आपल्या पक्षास मिळाला पाहिजे अशी महाराजांना आवश्यकता वाटूं लागल्यानें त्यांनीं बोरगांवकर चिट-णीस यास परशुरामपंताकडे सामोपचाराचें बोलणें करण्यास पाठविलें. पंतांनीं सांगितलें कीं, "आमचे सर्व अपराध क्षमा करून आमचें पद आम्हांस द्यावें. व विशाळगड तालुका आम्हांस द्यावा" म्हणून अट घातली. * प्रतिनिधि पद देण्याची अट विशेष अवघड नव्हती. परंतु विशाळगड तालुका व सुभा नुकताच निळो बल्लाल याजकडे देण्यांत आला होता तो त्याजकडून इतक्यांत काढल्यास निळो बल्लाळ तर नाखूष होईलच परंतु खंडो बल्लाळहि नाराज होण्याचा संभव होता. यावेळीं त्या दोघानांहि नाखूष करणें शहाणपणाचें नव्हतें; असा कांहीं पेंच शाहूमहा-राजांस पडला होता. यासंबंधीं बोलणें खंडो बल्लाळ याचेमार्फत चाललें असल्यानें त्यालाही पंचाईतच पडली. सरते शेवटीं निळो बल्लाळ यांस बहिरव मोरेश्वर पिंगळे मुख्य प्रधान यांचा मुतालिकीचा कारभार सांगून आणि विशाळगड किल्ला व तालुक्याबद्दल दुसरा किल्ला देऊन त्यांची समजूत केली; आणि विशाळगड तालुका इ. स. १७१०–१७११ त परशुराम पंताना देऊन त्यांना प्रतिनिधिपदाचीं वस्त्रें दिलीं. + निळो बल्लाळाला

केल्याचें नमूद आहे. तसेंच ग्रँट डफ् म्हणतो कीं, Panhala was invested, the siege pressed with vigour and the Havildar, who commanded, offered to surrender on condition of being confirmed in his station. This proposal was readily accepted to and Vishalgad was surrundered by the agent of Parasharam Trimbak on the same terms.

* पंत प्रतिनिधि बखर पान ४५ थो, शाहूमहाराजांची बखर–चिटणीस. पान २५.

\+ "राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी यांकडे छ ६ जिलकाद सन इहिदे जिल्हे राजश्री गदाधर प्रल्हाद याकडे ते दूर करून दिलो:—किल्ले हाय- किल्ले विशाळगड..." शाहूमहाराजांची रोजनिशी पान ५४. पं. प्रतिनिधी बखरींत ही हकीकत इ. स. १७१३ मध्यें घडली असें लिहिलें आहे तें अर्थात् बरोबर नाहीं.

कोणचा तरी सुभा पाहिजे होता विशाळगडच पाहिजे होता असें नाहीं. परशुरामपंतांचे त्या ठिकाणीं पुष्कळ वर्षें ठाणें असून त्यांनीं आपलें घर-दार तेथेंच केलें होतें. विशाळगड तालुका त्यांच्या वहिवाटीस पुष्कळ वर्षें असल्यानें आपलें पूर्वीचें ठाणें आपल्या घराण्याच्या ताब्यांत कायमचें असावें म्हणून परशुरामपंतानीं विशाळगड तालुक्याची अट मुख्यत्वेंकरून घातली व शाहूमहाराजांनीं ती पूर्ण केली.

परशुरामपंत सातारकरांचे ताबेदार झाल्यानें विशाळगडचा सरंजाम आपल्याकडे ठेवणें त्यांना गैरसोईचें होतें म्हणून तो सरंजाम आपले वडील पुत्र कृष्णाजी परशुराम यांचे नांवें करून दिला. यावेळेपासून (इ. स. १७१०।११) करवीरचे प्रतिनिधी आणि साताराचे प्रतिनिधी अशा दोन शाखा झाल्या. करवीरकर व सातारकर यांचेमध्यें पुढें इ. स. १७३० मध्यें समेट होऊन वारणेच्या पलीकडील प्रदेशावरील करवीरकरांचें स्वामित्व मान्य झालें. परंतु दरम्यानच्या काळांत दोघांचींही राजपत्रें व आज्ञापत्रें महाराष्ट्रांत चालूं लागलीं. म्हणजे इ. स. १७१० सालापासून प्रतिनिधी घराण्याच्या दोन शाखा होऊन दोन्ही घराण्यास कोल्हापूर व सातारा प्रांतांत प्रवेश मिळाला, आणि दोन संस्थानें निर्माण झालीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें यापूर्वी परशुरामपंतांचा निवास विशाळगडावर होता आणि प्रतिनिधीपद त्यांचेकडे होतें तरी सरंजाम या नात्यानें त्यांचे आधिपत्याला मान्यता याच वेळीं प्रथम मिळाली आणि ती शाहूमहाराजांनीं दिली असें म्हणावें लागतें.

परशुरामपंतांनीं कृष्णाजीपंतांना प्रतिनिधीपद दिलें त्यावेळीं मोरो शाम-राज यांना त्यांचे कारभारी नेमून दिले. शाहूचें आज्ञापत्र घेऊन कृष्णाजी-पंत विशाळगडास गेले आणि त्यानीं निळो बल्लाळाकडून गड व तालुका घेतला. याप्रमाणें आपला सरंजाम मिळतांच ते ताराबाईच्या पक्षास मिळाले. ÷

÷ कृष्णाजीपंतांनीं विशाळगड कसा मिळविला याबद्दल पंतप्रतिनिधी बखरींत वेगळी हकिगत दिली आहे. त्यांत ' विशाळगड निळो बल्लाळ यास शाहूमहाराजांनीं दिल्याचें

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



अशा रीतिनें विशाळगड प्रांत कोल्हापूरच्या आधिपत्याखालीं अनायासें गेल्यामुळें शाहूमहाराजांस फारच क्रोध आला. परशुरामपंताची फूस असल्याशिवाय कृष्णाजीपंत अशा कृत्यास प्रवृत्त होणार नाहीं अशी समज होऊन त्यांनीं परशुरामपंतास पुन: अटक करून त्यांचे डोळे काढण्याची आज्ञा केली. तेव्हां खंडो बल्लाळ यांनीं रदबदली करून या अघोर कृत्यापासून त्यांना परावृत्त केलें. तेव्हां शाहूमहाराजांनीं परशुरामपंतास पुनः अटकेंत ठेऊन शके १६३३ ( इ. स. १७१२ ) मध्यें नारो प्रल्हाद यांना प्रतिनिधी पद दिलें;§ आणि त्याच वेळीं परशुरामपंताकडून विशाळगड हवाला करण्याचा कद्बा लिहून घेऊन त्यांचे मुतालिक यमाजीपंत व गमाजीपंत म्हणून साताऱ्यांत होते त्याना फौज देऊन विशाळगडावर

---

समजलें तेव्हां ते मुदरगडावर होते. तेथून पन्हाळ्यास येऊन ताराबाईकडून प्रतिनिधिपदाचीं वस्त्रें घेऊन पिराचे नवसाकरितां म्हणून पांचशे लोक बरोबर घेऊन गडावर आले आणि निळो बल्लाळ यास दूर करून आपला अंमल बसविला, वगैरे हकिगत लिहिली आहे. सातारचे प्रतिनिधी घराण्याचे इतिहासांतही त्याचप्रमाणें लिहलें आहे. परंतु " तालुका मिळवून संभाजीराजे याजकडे दिला." असें म्हटलें आहे ( भाग १ पान २६२ ). यावेळीं म्हणजे १७१०-११ मध्यें शिवाजी राजपदावर असल्यानें ही हकीगत विश्वसनीय वाटत नाहीं. कृष्णाजीपंत पूर्वीपासून ताराबाईच्या पक्षाचा असता तर त्याला प्रतिनिधीपद व सरंजाम परशुरामपंतानें दिला या गोष्टीस शाहूनें मुळींच संमति दिली नसती आणि निळो बल्लाळानेंही सहजासहजीं गड त्याचे हवालीं केला नसता. उलट कृष्णाजीपंत शाहूच्या पक्षाचा असता तर ताराबाईकडून त्याला प्रतिनिधीपद मिळणेंही शक्य नव्हतें. यामुळें ही हकीकत विश्वसनीय वाटत नाहीं. तसेंच पुढें शाहूमहाराजांनीं परशुरामपंतास पुनः अटकेंत ठेवलें ते कृष्णाजीपंतानें विशाळगड घेतला म्हणून नव्हे तर तो ताराबाईच्या पक्षास मिळाला म्हणून ! यावरून कृष्णाजीपंतास विशाळगडाचा कबजा शाहूमहाराजांच्या आज्ञापत्रावरूनच मिळाल्याचें उघड दिसत आहे. ग्रँटडफही असेंच म्हणतो. ( "परशुरामपंतास प्रतिनिधीपद देऊं केलें असतां तें त्यानें न घेतां आपल्या मुलास कृष्णराव यास दिलें. तो करवीर प्रांतीं जाऊन विशाळगड घेऊन ताराबाईच्या पक्षास मिळाला." )

§ अष्टप्रधानांचा इतिहास—भिडे—पान १२५.

रवाना केले. त्यांनीं विशाळगडाचे घेऱ्यांत येऊन माचाळ, प्रभानवल्ली आणि गजापुरास वेढा घातला व गडावर तोफाही मारल्या. त्याचे गोळे पश्चिम दरवाज्यास लागले; परंतु किल्ला हस्तगत झाला नाहीं. मुतालीक वेढा घालून बसले. *

यानंतर परशुरामपंतांचे द्वितीय चिरंजीव श्रीपतराव यांनीं कृष्णराव खटावकर याचेवरील मोहिमेंत बाळाजी विश्वनाथ यांस अप्रतीम सहाय्य केल्यानें शाहू महाराजांची मर्जी पुन्हां सुप्रसन्न होऊन विचारलें कीं "तुम्हांस काय पाहिजे तें मागावें, तेव्हां त्यांनीं असें सांगितलें कीं आमची प्रतिनिधि आम्हास मिळावी. विशाळगडचा किल्ला कोल्हापूर राजधानींतील. तो मुलुखसुद्धां तिकडील प्रतिनिधि कृष्णाजीपंत यांजकडे चालावे असें मागितलें." + त्याप्रमाणें परशुरामपंतांना मुक्त करून इ. स. १७१३ मध्यें पेशवेपदावर त्यांची स्थापना केली. इकडे कृष्णाजीपंत विशाळगड किल्ला लढवीतच होता. तिकडे गडाचा वेढा उठविण्याविषयीं मुतालीक यास मनाई केली आणि वेढा उठविला. पुढें राज्याभिषेक शक ४० वैशाख शुा ५ ( ८–४–१७१४ ) चें आज्ञापत्र देऊन प्रतिनिधि पदावर परशुरामपंताची स्थापना केली. = याच सुमारास करवीरचे अधिपति शिवाजी महाराज आणि त्यांच्या मातोश्री ताराबाईसाहेब यांना राजाराम महाराजांचे द्वितीय पुत्र संभाजीराजे यांनीं अटकेंत ठेवून आपण सिंहासनावर रूढ झाले. ×

---

* पंतप्रतिनिधी बखर पान ४५.

+ पंतप्रतिनिधि बखर पान ४६.

= पेशव्यांची शकावली—राजवाडे—पान १९–२०.

× हे शिवाजी महाराज इ. स. १७१२ मध्यें काळ्या फोड्याचे आजारानें वारल्याचा उल्लेख बऱ्याच बखरींतून आहे. परंतु कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजचे प्रोफेसर डॉ० पवार एम्. ए., एलएल्. बी., पी. एच. डी., बार अॅट लॉ. यांना उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून त्यावेळीं शिवाजी महाराज मृत्यू पावले नसून कांही

करवीरकर आणि सातारकर यांचे दरम्यान पूर्वीपासून वैमनस्य होतेंच; त्यांत मोंगलाचा सुभेदार चेया कुलीखान व निजामउल्मुल्क हे संभाजी व शाहू यांचें एक्य होऊन मराठे आपणास भारी होऊं नयेत म्हणून शाहू-विरुद्ध संभाजीस मोठ्या धूर्तपणें उठावणी देत. अशा चकमकींत सातारकरांचा नेहमींच विजय होई. परंतु त्यांनीं संभाजीविरूद्ध जास्त कडक इलाज कधींच योजले नाहींत. पन्हाळा, रांगणा वगैरे प्रांत करवीरकरांकडे होते. " बंधूच आहेत आग्रह करून कशास घ्यावेत म्हणून राखिले"=

परंतु उदाजी चव्हाणाचे मदतीनें सातारकरास जास्तच उपद्रव होऊं लागला तेव्हां शाहू महाराजांनीं इ. स. १७२९ त पन्हाळ्यावर स्वारी केली. आणि त्याच प्रसंगीं संभाजी आंग्रे यास विशाळगडाखालीं चौक्या बसविण्यास हुकूम दिला. " संभाजी आंग्रे यास पत्र जे–तुम्ही विशाळगडाखाले चौकी बसविली आहे म्हणून वर्तमान आईकोन स्वामी संतोषी जाहले. चौकी जबरदस्त बसवून गडावर दाणा एकंदर जाऊं न देणें " इ. स. १७३०–३१.§ चौक्या बसवून नाकेबंदी केल्यानंतर विशाळ-गड घेण्याच्या कामगिरीवर श्रीनिवासराव प्रतिनिधींची योजना करून त्यांना फौजेसह पाठविलें. + यावेळीं गडाचा कारभार कृष्णाजी परशुराम यांचेकडे होता दोघां बंधूंमध्यें लढाई होण्याचा विलक्षण योगायोग उपस्थित झाला, परंतु सुदैवानें लढाईचा प्रत्यक्ष प्रसंग आला नाहीं. संभाजीला सर्व बाजूनीं अपयश आल्यानें त्यानें शाहूमहाराजाकडे बाळाजी प्रभू पारसनीस यांचे मार्फत तहाचें बोलणें सुरूं केलें. याप्रमाणें तहाची वाटाघाट

---

कारस्थानानें संभाजी महाराजांनीं त्याना पदच्युत करून राज्य मिळविलें असें दिसून येतें. याबद्दल डॉ. पवार लौकरच प्रसिद्ध करणार असलेल्या " कोल्हापुरच्या इतिहासाचीं साधनें " या ग्रंथांत सविस्तर माहिती मिळेल.

= शाहूमहाराज बखर —चिटणीस पान २०

§ शाहू महाराजांचीं बखर—रकाना ४७.

+ शाहू महाराजांची रोजनिशी पान १८ रकाना ४८.

सुरूं झाल्यावर विशाळगडावर हल्ला करण्याचें कारणही उरलें नाहीं म्हणून शाहूमहाराजांनीं श्रीनिवासराव प्रतिनिधीस पत्र पाठवून विशाळगडावरून परत बोलाविलें आणि स्वारी तहकूब केली. यानंतर शाहू महाराज व संभाजीराजे यांचे दरम्यान वाटाघाटी होऊन ता. २५ माहे मे सन १७३० रोजीं सुप्रसिद्ध वारणेचा तह होऊन कोल्हापूरच्या स्वतंत्र राज्यास मान्यता मिळाली.

विशाळगडचे अधिपति कृष्णाजी परशुराम हे इ. स. १७४१ मध्यें कैलासवासी झाल्यावर त्यांचे पुत्र गंगाधरराव यांना राज्याधिकार झाला. करवीरकर आणि सातारकर यांचे दरम्यानचा बेबनाव संपल्यानें आणि यापुढें राजकारणाचें केंद्र सातारा व पुणें येथें असल्यानें विशाळगडावरील प्रतिनिधींच्या अमलास परकीय सत्तेकडून उपद्रव झाला नाहीं. मात्र इ. स. १७४८ नंतर कोंकणांतील सरदार आंग्रे यांनीं उचल खाऊन करवीरकर, सातारकर आणि प्रतिनिधी यांच्या मुलखास उपद्रव देण्यास सुरवात केली.

कुलाबकर आंग्रयांचें कोंकणांत मोठें वजन होतें. मानाजी व संभाजी या दोन आंग्रेबंधूंना निरनिराळे प्रांत व किताब देऊन त्यांचें भांडण शाहूमहाराजांचे कारकीर्दीत बाजीराव पेशव्यांनीं तोडलें होतें. परंतु पुढें संभाजीचे मृत्यूनंतर तुळाजी आंग्रे यास कारभार मिळाल्यावर तो पेशव्याबरोबर उद्दामपणें वागूं लागला. त्यावेळीं विशाळगडावर गंगाधर कृष्ण यांचा कारभार सुरूं होता. तुळाजीनें त्यांचे मुलखांतही बराच उपद्रव सुरूं केला. तेव्हां गंगाधरपंत प्रतिनिधी यांनीं सावंतवाडीकर, पंत अमात्य व आपली फौज गोळा करून त्यास चांगलीच तंबी दिली. पुढें १७५१ सालीं गंगाधरपंत कैलासवासी झाल्यावर त्यांचे बंधू अमृतराव यांना राज्याधिकार झाला. त्यासमयीं इ. स. १७५२–५३मध्यें तुळाजी आंग्रे यानें पुन्हां त्यांचे मुलखास उपद्रव सुरूं केला. त्यासमयीं विशाळगडाहून रवळो महादेव सबनीस व बापूजी उद्धव कारखाननीस असे मोठे सरदार नेमून दोन हजार जमावानिशीं तुळाजीचें पारिपत्य करण्यास रवाना केले. परंतु तुळाजीनें त्यांना दाद दिली नाहीं, आणि सैन्यानिशीं येऊन जानेवारी

१७५३ मध्यें विशाळगडास वेढा घातला. प्रभानवल्ली व साखरपा या दोन्हीं बाजूस मोर्चे देऊन आसपासचा मुलूख उध्वस्त केला.× गडावरील सैन्याचा निभाव लागेना तेव्हां अमृतराव प्रतिनिधींनीं ही बातमी साताऱ्चे प्रतिनिधि जगज्जीवनराव यांना व छत्रपतींना नारो रायाजी गोडे § यांचे समवेत पत्र देऊन कळविली. अमृतराव हे जगज्जीवनरावाचे सख्खे पुतणे असल्यानें त्यांनीं लागलीच फौजा जमा करून विशाळगडास जाण्याची तयारी केली. आणि छत्रपतींनींही यमाजीपंत, उदाजी चव्हाण यांना प्रतिनिधींच्या मदतीला जाण्याबद्दल आज्ञापत्रें लिहिलीं * आणि त्याच प्रमाणें " तुळाजी आंग्रे यानें घेऱ्याचा विध्वंस केला आणि किल्ल्याखालीं राहिला आहे तरी तुम्ही सामील होऊन किल्ले मजकूरच्या घेरियांतून वेढा काढून लाऊन देणें " म्हणून मजकुराचीं पत्रें कृष्णाजी पंडित अमात्य, अमृतराव पंडित, रामचंद्र सावंत भोसले, जयराम सावंत भोसले आणि कानोजी शिर्के यांना छत्रपतींनीं पाठविलीं. खुद्द तुळाजी आंग्रे यासही पत्र पाठवून पत्रदर्शनी घेऱ्यांतून निघून जाणेस आज्ञा केली.+

शाहूमहाराजांच्या आज्ञेस अनुसरून जगजीवनराव सैन्य घेऊन विशाळगडास आले आणि कोंकणांत उतरून आंग्रे याच्या फौजेवर हल्ला चढविला. आंग्रे यांची फौज नामो हरम होऊन पळूं लागली. तेव्हां उभयतां प्रतिनिधींनीं पाठलाग करून त्यांचा पुरा मोड केला. तुळाजीचा पूर्ण पराभव झाल्यानें त्यानें आपले वकील बाबाजी विश्वासराव यांचे मार्फत तहाचें बोलणें सुरूं केलें. ही मोहीम सुमारें चार पांच महिने चालली आणि एप्रिल १७५३ मध्यें तुळाजीचा पाडाव झाला. ही

---

× पे. दप्तर खंड ८, पत्र नं. ८८.

§ भांडारकर प्राच्यसंशोधन मंदिराचे विद्वान क्युरेटर प्रो. पी. के. गोडे यांचे पूर्वज.

* शाहूमहाराज रोजनिशी रकाना २२९

+ शाहू महाराजांची रोजनिशी रकाना २३६.

हकिगत समजल्यावर सातारकर छत्रपतींनीं जगजीवनराव प्रतिनिधींना पुढीलप्रमाणें पत्र पाठवून त्यांची मोठी प्रशंसा केली.

" राजश्री जगजीवन पंडीत प्रतिनिधी यांसी पत्र जे—

तुम्ही विनंति पत्र पाठविलें. प्रविष्ठ होऊन अभिप्राय श्रवण होऊन साहेबास संतोष जाहला. किल्ले विशाळगडचा उतराली यासी आज्ञेप्रमाणें येऊन राजश्री तुळाजी आंग्रे याचें पारिपत्य यथास्थित केलें; प्रस्तुत मशारनिल्हेकडून बाबाजी विश्वासराव मध्यस्तीत आले आहेत; तह रद्द झालियानंतर हुजूर दर्शनास अविलंबें येतो म्हणून कित्येक विस्तारें लिहिलें, अशास तुम्ही कार्यकर्ते धुरंधर, साहेबांच्या हितावह कराल. फौजेची बेगमी होऊन धणीयाचे आज्ञेत सेवक यथास्थित वर्तत आणि साहेबांचा दरमहा हुजूर मोईनप्रमाणें पोहोंचे ते गोष्टी कराल, हा साहेबांस भरंवसा आहे....कोंकणांत ब्राह्मण रयतेस उपद्रव होत आहे, वतनदार परागंदा झाले आहेत, यो गोष्टी तहांत आणून यथास्थित नांदणूक होऊन कोंकण सुख पावे तो अर्थ करणें. राजश्री भगवंतराव पंडित अमात्य याचा व आंग्रे याचा हर्षामर्ष वाढला आहे व चिरंजीव करवासीयेही किल्ले गगनगड याच्या घेरांवर घांट येथें उपद्रव होऊन किल्ले मजकुरची खराबी केली आहे......छ २९ जमादिलावल सलास खमसैन मया व अलफ " ( इ. स. १७५२–५३ ) ×

या प्रसंगीं तुळाजीबरोबर तात्पुरता तह झाला तरी त्याची रग पुरती जिरली नाहीं. प्रतिनिधींचें सैन्य या भागांतून परत जातांच त्यानें कोकणांतील मुलुखास पुन्हां उपद्रव करण्यास सुरवात केली. यामुळें पुढें पेशव्यांनीं इंग्रजांची मदत घेऊन इ. स. १७५६ मध्यें त्याचा कायमचा बंदोबस्त केला.

× शाहूमहाराजांची रोजनिशी रकाना २४०.

अमृतराव प्रतिनिधींची कारकीर्द विशाळगडावर १७५१ ते १७६२ पर्यंत झाली. हल्लीं गडावर असलेलें अमृतेश्वराचें देवालय त्यांनींच बांधलें आहे. त्यांचे मृत्युनंतर कृष्णराव १७६३ ते ६८ आणि आबाजी कृष्ण १७६८ ते १७९३ याप्रमाणें कारकीर्दी झाल्या. यांचे कारकिर्दींत प्रतिनिधींना बऱ्याच वेळां करवीरकरांचे वतीनें लढण्याचा प्रसंग आला परंतु कोणत्याही युद्धाची झळ प्रत्यक्ष विशाळगडापर्यंत पोहोंचली नाहीं.

आबाजी कृष्ण यांचे कारकिर्दींत गडावर हवालदार झाले तेः—

१ खेत्रोजी दळवी करवीरकर छत्रपतीकडून होता. परंतु त्याची वर्तणूक चांगली नसल्यानें त्यास घालवून दिलें.

१ दरम्यान तीन वर्षे गडावर हवालदार नव्हता. तें काम रवळो महादेव सबनीस हेच करीत होते.

१ त्यानंतर खंडेराव पडवळ बावड्याहून आले. त्यांनीं २ वर्षें हवालदारी केली.

१ पुढें खंडेराव यास सरनोबती देऊन हवाल्याचें काम खंडोजी घाटगे यांस नऊ वर्षे सांगितलें. तो मयत झालेवर त्याचा पुत्र नारोजी घाटगे याजकडे दोन वर्षे हवालदारी होती. त्यानंतर पुनः खंडोजीस पांच वर्षे हवाला सांगितला.

आबाजी कृष्ण यांचे नंतर आनंदराव १७९३ ते १८०६, भगवंतराव १८०६ ते १८१९ आणि माधवराव १८२० ते १८३२ असे प्रतिनिधी झाले. हल्लीं गडावर असलेलें भगवंतेश्वराचें देवालय भगवंतराव प्रतिनिधींनीं इ. स. १८१६ च्या सुमारास बांधलें आहे.

इ. स. १८२६ सालीं करवीरचे छत्रपती शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज यांची स्वारी विशाळगड पहाण्याचे हेतूनें गडाकडे आली. बुवासाहेब महाराजांचा कारभार जुलमी असून त्यांच्या लहरी स्वभावाला कोण केव्हां बळी पडेल याचा नेम नसे. तशांत छत्रपतींनीं गडावर येण्याचा आपला हेतूहि प्रतिनिधींना अगोदर कळविला नव्हता. फेब्रुवारी महिन्यांत महाराजांची स्वारी गडाखालीं गजापुरास येऊन पोहोंचली. त्यांच्या आगमनाच्या हेतूबद्दल प्रतिनिधींना शंका येऊन त्यांनीं महाराजांना गडावर

येण्यास प्रतिबंध केला आणि तोफा डागल्या. तोफेचा गोळा महाराजांच्या हत्तीजवळून गेला, परंतु सुदैवानें त्याना इजा झाली नाहीं. करवीरकरानींहि गडाखालील चौक्या जाळून सशस्त्र प्रतिकार केला. उभयतांमध्यें थोडी तोफांची सरबत्ती होऊन छत्रपतींची स्वारी गडावरून परत फिरली. वाटेंत मलकापुरास कांहीं दिवस मुक्काम करून प्रतिनिधी यांचा तेथील वाडा जाळून स्वारी परत करवीरास गेली, आणि अपराध करणारे इसमास पकडून आणण्याकरितां गायकवाड यांना रवाना केलें. त्यांनीं गडावर चौकशी करून विठ्ठल आप्पाजी सबनीस यांनीं तोफा डागल्याचें आढळून आल्यानें त्यांना अटक करून करवीरास नेलें. गुन्हा भयंकर स्वरूपाचा असल्यानें विशेष चौकशी न होता विठ्ठल अप्पाजी यांचा शिरच्छेद व्हावयाचा, परंतु करवीरच्या गुरुमहाराजांच्या कन्या आणि आनंदराव प्रतिनिधि यांच्या सुशील पत्नी ताई महाराज ऊर्फ जानकीबाई यांनीं आपले वडिलांचे मार्फत रदबदली करून महाराजांनीं विठ्ठल आप्पाजी यांचें म्हणणें समक्ष ऐकून घेऊन योग्य तें शासन करावें अशी विनंति केली.

त्याप्रमाणें करवीर येथें श्रीअंबाबाईच्या चौकांत महाराजांचे समोर चौकशी झाली. त्यावेळीं विठ्ठल अप्पाजीनीं असें सांगितलें कीं, " किल्ल्याचे धनी छत्रपतीच आहेत. किल्ल्याचें संरक्षण करण्याची जबाबदारी आमचेवर आहे. महाराजांची अगोदर वर्दी नसलेनें गडावर गलीम चालून आला अशा समजुतीनें गोळागोळी करणें भाग झालें. महाराज येणार अशी वर्दी अगोदर मिळते तर योग्य सत्कार करून गडावर नेणेंची तजवीज केली असती. छत्रपतींचे आज्ञेप्रमाणें संरक्षणाकरितांच हें कृत्य केलें आहे. गुन्हा वाटत असल्यास महाराजांनीं शासन करण्यास हरकत नाहीं. " हें ऐकून महाराजांचा राग शांत झाला, आणि त्यांनीं विठ्ठल आप्पाजी यांना क्षमा करून परत जाण्यास अनुज्ञा दिली.

ही हकीकत पुढें कंपनी सरकारचे कानावर घालण्यांत आल्यावर त्यांनीं याबद्दल चौकशी करून छत्रपती महाराजांना या कृत्याबद्दल ठपका दिला. त्यासंबंधीं कंपनी सरकारकडून इ. स. १८३२ मध्यें बुवासाहेब महाराजांना यादी पाठविली तीः—

"श्रीमन्माहाराज छत्रपतीसाहेब दाम अलताफहूं

नियाजमन्द मेस्तर थामस हरवी बेबरसाहेब बहादूर सर कलेक्टर व पोलटक्याल यजंट सुभा धारवाड वगैरे नियाजहसूल आंके नियाजमंदाची खैरयत रोष न होऊन हमेशा अलतफनामा सादर करीत आले पाहिजे. दरिविला. महाराज छत्रपती साहेबाची स्वारी भारी जमियत निसी मुत्तसिल विशालगड येथें मोकाम आहे. ठाणा मलकापुरीं इलाखा माधवराव साहेब प्रतिनिधी यांचा गांवठाणा घेतला. महाराजाची स्वारी गडास जाऊ लागली तेव्हां दुतर्फा गोलागोली जाहली. व विशालगडकर यांच्या चौक्या जालल्या. येणेंप्रों सम आरात आल्यावरून इलतिमास करणेंत येत आहे कीं कंपनी सरकारासी व महाराज छत्रपती साहेबास तहनामा जाहला. त्यांतील २ कलमांत आपले मुलखांतील व मुलका बाहेरले लोक हवाल जाला होतील तितकी फौज ठेवणार नाहीं. हरदू सरकाच्या मुलकेचे आबादी व आरामीबाबे सरकार इंग्रज बहादुर सल्हा देतील त्याप्रों वहिवाट ठेवण्यांत येईल असे आहे. ऐशास प्रतिनिधी विशालगडकर हे कदीम संस्थानिक अबरूदार याजवरी कांहीं गैरवाजवी दस्तदराजी जाहल्या त्याणी व दिगर सरंजामीदारी वगैरे मुतफिक होऊन काय तंटा चालवितील व त्यांजकडून काय नुकसान येइल हें आतां समजणार नाहीं. प्रतिनिधी मोसूफ यासी कांहीं खटला आल्यास लढाईचा मोकदमा न करिता अपेशांत किंवा कंपिनी सरकारचे विद्यमानें फैसल करून घेणें बेहत्तर आहे. सरकारमार्फत फैसल करून घेणेचे खाहिष असलेस त्यांजकडून महाराजांची नुकसानी व जलल होणार नाहीं व प्रतिनिधी मोसूफ यांजवर कांहीं गैर अमल दरपेश

> होणार नाहीं खु ( शब्द लागत नाहीं ) नियाजमंदास महाराज छत्रपती साहेबांचे दौलतराव तरकी बहीष आहे. सबब ता॥ सल्हा इलतिमास केली आहे. जियादा उमर व दौलत कामरांनीं मुदाम मुस्तदाम बाद ”


यानंतर विशाळगडकर व करवीरकर यांचेमध्यें दिलजमाई होऊन त्यांचे संबंध पूर्ववत् सलोख्याचे झाले.

माधवराव प्रतिनिधी इ. स. १८३२ मध्यें कैलासवासी झाल्यानंतर त्यांची मातोश्री राधाबाई यांनीं नारोपंत हिवरेकर यांचे पुत्र बाबाजी यांस इ. स. १८३३ च्या मे महिन्यांत दत्तक घेऊन त्यांचें नांव अमृतराव असें ठेविलें. त्यांची प्रतिनिधीपदावर स्थापना करण्याकरितां महाराजांची स्वारी पुनः गडावर ५००० सरंजामानिशीं आली. याप्रसंगीं छत्रपतींना योग्य असा त्यांचा सत्कार करण्यांत आला. महाराजांनींही गडावरील मानकरी व दरकदार वगैरे नायक, सरदार, शिपाई यांस शेलापागोटीं, शालजोड्या, बनाती वगैरे सुमारें १५।१६ हजाराचें कापड वाटलें. छत्रपतींचा मुक्काम गडावर सात दिवस होता.

आबाजी कृष्ण प्रतिनिधी यांचेनंतर गडावर हवालदार झाले तेः—आनंदराव प्रतिनिधींनीं खंडेराव पडवळ यांचे पुत्र भगवंतराव यास हवालदार नेमले तें काम त्यांनीं २८ वर्षें केलें. ते मयत झालेवर रघुनाथराव पडवळ यांची नेमणूक माधवराव भगवंतराव यांचे कारकीर्दीत झाली. बंडाईपर्यंत म्हणजे इ. स. १८४४ पर्यंत ते हवालदार होते. त्यांचेवर बंडाचा आरोप आल्यानें त्यांना अटक झाली व पुढें ते पुण्याच्या तुरुंगांत मृत्यु पावले. त्यांचे वंशज हल्लीं मलकापुरांत असतात. बंडाईनंतर गडाची तटबंदी ढासळून टाकण्यांत आली व प्रतिनिधींचें ठाणेंही गडावरून मलकापुरास आल्यानें त्यानंतर गडावर हवालदारांची नेमणूक बंद झाली.

प्राचीन काळीं राज्याचें संरक्षण मुख्यतः किल्ल्यामुळेंच होत असल्यानें कोणत्याही राजवटींत किल्ल्याचा बंदोबस्त योग्य ठेवण्याकडे राजकर्त्यांची दृष्टी असे. किल्ल्यांची नेहमीं डागडुजी करून तेथील शिबंदी सर्वदा सज्ज ठेवावी लागे. संरक्षणाकरितां ठेवलेल्या लोकांना गडकरी असें

विशाळगड



गडाच्या प्रचंड कड्याचें एक मनोरम दृश्य.



गडाचें एक दृश्य.
चोर दरवाजा आणि ढासळलेली तटबंदी स्पष्ट दिसत आहे.



गडाच्या अजस्त्र कड्याचा एक भाग.

म्हणत. त्यांना सक्त मेहनतीचें काम पडत असल्यामुळें मेहनताना म्हणून सढळ हातानें इनामें दिलीं होतीं. आणि याशिवाय नक्त मुशाहिराहि देण्यांत येई. लढाईनंतर त्यांना बक्षिसें मिळत तीं निराळींच. या लोकांचें महत्त्व जाणून राज्यकारभारांतही त्यांना पुष्कळच सवलती मिळत. यामुळें इंग्रजांचा अंमल प्रस्थापित झाल्यावर लढाया बंद पडल्या आणि या वर्गाचेंहि महत्त्व कमी झालें. करवीर प्रांताची राज्यव्यवस्था सुधारून राज्यकारभाराला सोयीस्कर असे विभाग पाडण्यांत येऊन ते मामले-दारांच्या ताब्यांत देण्यांत आले. गडकऱ्यांच्या नेमणुका कमी झाल्या. त्यांची बक्षिसें व लुटालूट बंद झाली; इनामाबद्दल सक्तीनें नोकऱ्या कराव्या लागल्या. या सर्वच कारणांमुळें हा वर्ग असंतुष्ट होऊन त्यांच्यांत बंडाई सुरू झाली. इंग्रजी सत्तेमुळें आपलें वैभव कमी झालें असें वाटून त्यांचा रोख मुख्यतः इंग्रज अधिकाऱ्यांविरुद्ध होता. या सुमारास म्हणजे इ. स. १८४३ सालीं करवीरचा राज्यकारभार पाहण्यास इंग्रजांचे तर्फे दाजी कृष्ण पंडित यांची मुख्य कारभारी म्हणून नेमणूक झाल्यानें गडकऱ्यांमधील असंतोष पराकाष्ठेला पोंचला; आणि अखेरीस उघडपणें बंड पुकारून सामानगड व भुदरगड येथील गड-कऱ्यांनीं किल्ल्यांचे दरवाजे बंद केले. बंडाचा फैलाव साऱ्याच किल्ल्यांवर झाला. विशाळगडही त्यांतून बचावला नाहीं. गडानजिक साखरपे या गांवीं चौकी होती. ती गडकऱ्यांनीं जाळली. बंडाच्या बंदोबस्तास स्थानिक संरक्षक दल अपुरें पडल्यानें बाहेरून मदत मागवावी लागली. आणि शेवटीं बेळगांव व रत्नागिरी येथील इंग्रजी लष्कर आणि तोफखाना यांच्या सहाय्यानें जनरल डेल्मॉल्ट, कर्नल औट्रॅम, कर्नल ओहॅन्स, कर्नल मॅलीस वगैरे लष्करी अधिकाऱ्यांनीं सर्व किल्ले कबजांत घेतले. त्याच वेळीं विशाळगडहि त्यांनीं ताब्यांत घेतला; आणि बंडखोर लोकांना इतःपर त्याचा आश्रय घेतां येऊं नये म्हणून गडाची अभेद्य तटबंदी सुरुंग व तोफा डागून ढासळून पाडली. =

---

= या बंडाला गडकऱ्यांची पुंडाई असें मुत्सद्यांनीं नांव ठेवलें तरी निःपक्षपाती

गडाचा विध्वंस करीपर्यंत पंतप्रतिनिधींचें ठाणें गडावरच असे. त्यावेळीं गडावर १२०० पायदळ, १०० घोडेस्वार आणि १८ तोफा असा तेथें संरजाम होता. परंतु १८४४ नंतर तेथील निवास धोक्याचा, गैरसोयीचा आणि अनवश्यक झाल्यामुळें इ. स. १८५० मध्यें कृष्णराव प्रतिनिधीनीं आपल्या संरजामासह मलकापुरास ठाणें नेलें. ऽ यानंतर आतां पावेतों प्रतिनिधींच्या घराण्यांतील कोणीही विशाळगडास भेट दिली नाहीं. ज्या गडानें एकाकाळीं इतकें मोठें वैभव उपभोगलें त्या गडाचें सांप्रतच्या अवस्थेंतील दृश्य पाहून भावनांचा उद्रेक सहन होणार नाहीं याच भावनेनें गडावर त्यांचें आगमन होत नसावें. दांत व नखें काढलेल्या केसरीच्या शरीरांतून जणूं प्राणही निघून गेला. ८०० वर्षें राज्योपभोग उपभोगलेला हा गड गेलीं १०० वर्षें आपल्या गतवैभवाचें दुःखित आणि उदास अंतःकरणानें स्मरण करीत एखाद्या कर्तबगार परंतु वयस्क, भाग्यवान परंतु दरिद्री पितामहाप्रमाणें पंचमहाभूतांचे तीव्र आघात सहन करीत उभा आहे.

---

दृष्टीनें विचार करणारांस ही १८५७ सालच्या क्रांतियुद्धाची छोटीशी आवृत्तीच भासेल, नाहींतर महाराजांचे बंधू श्रीमंत चिमासाहेब यांचा संबंध बंडाशीं येण्याचें कारण नव्हतें. परंतु त्याचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हें.

ऽ मलकापूर हें विशाळगड जहागिरीचें सांप्रतचें मुख्य ठिकाण आहे. या गांवाचें वर्णन एडवर्ड मूर नांवाच्या इंग्रज गृहस्थानें इ स. १७९४ सालीं लंडन येथें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत दिलें आहे. हें वर्णन कॅप्टन लिटल याच्या नेतृत्वाखालीं गोरें सैन्य रत्नागिरीहून निघून परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या मदतीस टिपू सुलतानावरील मोहिमेस जाते वेळचें आहे.

" पलटणीनें ता. १६ डिसेंबर सन १७९० रोजीं विश्रांति घेऊन दुसरे दिवशीं बारा मैलांवरील मलकापूर या गांवाकडे कूच केलें. हें एक मध्यम प्रतीचें व दाट-वस्तीचें गांव आहे. येथें गावठी कापडाचे माग असून दर आठवड्यास नानाविध मालाचा बाजार भरतो. विशेषतः हें अंबाघाटावरील नजिकचें महत्वाचें ठिकाण अस-

नगर वाचनालय, नाशिक

असा या गडाचा रोमांचकारी इतिहास आहे. यावरून दोन गोष्टी ठळकपणें नजरेस येतात. योगायोग म्हणा अथवा नैसर्गिक अनुकूलता म्हणा परंतु या गडावर जेव्हां जेव्हां यवनांनीं आक्रमण केलें त्या त्या वेळीं यावनी रक्ताचा पुरा मोबदला घेतल्यावांचून हा गड त्यांच्या आधीन झाला नाहीं. मात्र हिंदू राजांनीं हल्ला करतांच अल्पायासांतच तो त्यांच्या स्वाधीन झाला आहे. या गडाचें दुसरें वैशिष्ठ्य म्हणजे याच्या इतका प्राचीन आणि उज्ज्वल व घडामोडीच्या परंपरेचा किल्ला केवळ महाराष्ट्रांतच काय परंतु उभ्या भारतवर्षांतहि एखादा दुसराच आढळेल.

विशाळगडच्या वास्तुदेवते, माझा तुला सादर प्रणाम असो.

---

त्यानें तळकोंकणांत तयार होणारा बराच माल येथें येतो. गांव एका नदीजवळ सुपीक स्थळीं व्यवस्थित वसलें असून या ठिकाणीं मानवी मदतीशिवाय निसर्गदेवता मुक्त-हस्तानें आपल्या देणगीची खैरात करीत असते.” ( श्री. पी. के. गोडे यांच्या कृपेनें. )

# किल्ले विशाळगड

## भाग दुसरा

### वर्णन

# किल्ले विशाळगड

## भाग दुसरा

### वर्णन

विशाळगड सांप्रत कोल्हापूर संस्थानचे मांडलीक श्रीमंत राजश्री आबासाहेब पंतप्रतिनिधि यांचे ताब्यांत आहे. ही जहागीर स्थापन झाल्यापासून इ. स. १८४९ पर्यंत जहागिरीचें मुख्य ठाणें गडावरच असल्यानें जहागिरीस ' विशाळगड जहागीर ' असेंच नांव प्रचारांत आलें. तें अद्याप कायम आहे. गडाला जाण्यास दोन मार्ग आहेत. कोल्हापुराहून रत्नागिरीकडे जातांना २९ मैलांवर मलकापूर आहे. येथून थेट पश्चिमेकडे सुमारें १८ मैलावर गड आहे. ही वाट मोटारचे प्रवासास फारशी चांगली नाहीं. याच रत्नागिरी मार्गावर मलकापुराहून पुढें १० मैलांवर आंबा नांवाचे गांव सह्याद्रिच्या माथ्यावर आहे तेथूनही गडास जाण्यास गाडीमार्ग आहे. हे अंतर सुमारें १२ मैलाचे आहे. हा रस्ता चांगला असून मोटारींची रहदारी याच मार्गानें सुरू असते. आंबा ते विशाळगड हा प्रवास सह्याद्रीच्या माथ्यावरून असल्यानें वाटेंत दाट जंगल आहे. तेथील वनश्री केवळ अवर्णनीय आहे. आंब्यापासून सुमारें पांच मैलावर रस्त्याचे बाजूस एक मधुर पाण्याचा झरा आहे. त्याला

बारमाही पाणी असते. भर उन्हाळ्यांत देखील तेथील शीतल पाणी केवळ अमृताप्रमाणें मधुर असतें. झऱ्याला ' भिवतळी ' असें नांव आहे. तेथून पुढें सुमारें ३ मैल डोंगर उतरून गेल्यावर ' केमरुणवाडी ' नांवाची वाडी लागते. या वाडीचे पूर्वेस सुमारे दोन मैलांवर डोंगरांचे दरम्यान जवळ जवळ अर्धा पाऊण मैल लांबीची खिंड आहे. इ. स. १६६० मध्यें शिवाजी महाराज पन्हाळ्याहून विशाळगडास येत असतां ज्या ठिकाणीं बाजी देशपांडे यानें फाजलखान आणि शिद्दी जोहार यांचे प्रचंड सैन्य थोपऊन धरून अपूर्व पराक्रमानें ज्या खिंडीचे नांव इतिहासांत अजरामर करून ठेवलें तीच ही हिंदुस्थानची थर्मापली ! हीच ती पावनखिंड ! !

येथून पुढें जवळच गजापूर नांवाचें गांव आहे. तेथून गडाकडे जातांना उजव्या हातास एक डोंगराची रांग लागते त्या रांगेंत एका ठिकाणास ' दिवाण वाडा ' असें म्हणतात. औरंगजेब बादशहाची स्वारी झाल्यावेळीं त्याच्या दिवाणाची छावणी या ठिकाणीं होती. यावरून दिवाणवाडा असे या ठिकाणास नांव पडलें, तें अद्याप कायम आहे. हल्लीं तेथें धनगरांच्या चार झोपड्या आहेत ! गजापूर येथें वैश्य लोकांची बरीच वस्ती आहे. पूर्वी गडावर ठाणें असतांना येथे मोठी बाजार पेठ होती. गांवाचे मठ व पेठ असे दोन भाग आहेत. त्यांचे दरम्याने एक मोठें मैदान आहे. त्यास ' बादशहाचा माळ ' असें म्हणतात. इ. स. १७०२ मध्ये औरंगजेब बादशहानें विशाळगडास वेढा घातल्यावेळीं त्याचे प्रचंड सैन्याची येथे छावणी होती. त्यावरून ' बादशहाचा माळ ' असें नांव पडलें. नजीकच मोंगल सैन्याकरितां बांधलेल्या बऱ्याच विहिरी, झरे वगैरे पाण्याचे पुरवठे आहेत. तसेंच येथें मुसलमानांची वस्ती दोन ठिकाणीं आहे. ती बहामनी राजांचे कारकिर्दीपासून असावी. येथून पुढें वाटेंत एक टेकडी लागते त्यावर चढून जाताच समोर विशाळगडचा प्रचंड किल्ला प्रथमच दृष्टीस पडतो. सृष्टिदेवतेचें हें प्रचंड स्वरूप पाहून गडाच्या प्राचीन इतिहासाशीं अनभिज्ञ असणाऱ्यांचें देखील मन भांबावून जातें आणि मराठ्यांच्या इतिहासाचा परिचय अल्प प्रमाणांत

असणारांचें मनापुढें तर मराठेशाहीचें गतवैभव क्षणमात्र चमकून त्यांच्या मनांत उदास विचार आल्याशिवाय रहात नाहींत. वाटेंत गोणीमूठ आणि घोणस्लीचें रान अशी दोन ठिकाणें ओलंडतांच गडाचा पायथा लागतो. वर जाणेस पूर्वी बांधीव पायऱ्यांची वाट होती. परंतु पायऱ्यांचे दगड ठिकठिकाणीं निखळून गेल्यानें ती पूर्वीप्रमाणें राहिलेली नाहीं. गडावर चढून जाण्यास सुमारें पाव तास लागतो. वर चढून जातांच तेथील शीतल हवा, मधुर पाणी आणि सभोंवतालचें मनोहर दृश्य यांच्या योगानें प्रवासाचा शीण क्षणार्धांत नाहींसा होतो. वरील हवा फारच शीतल असून भर उन्हाळयांत देखील उष्णतामान ९० अंशावर क्वचितच जातें. पावसाळयांत मात्र वरूण देवता येथें अनिर्बंध विहार करीत असते. पाऊस प्रत्येक वर्षी २५० पासून ३०० इंच पर्यंत पडतो. आणि धुकें तर इतकें असतें कीं एक हात अंतरावरील पदार्थ दिसणें मुष्कील !

गडावरील प्राचीन इमारती बहुतेक साऱ्या पडलेल्या आहेत. तथापि त्यांचे वर्णन पुढें दिलें आहे:—

सोबतच्या नकाशांत गडाची तटबंदी जाड रेषेनें दर्शविली आहे. ० अशा खुणा बुरुजाबद्दलच्या आहेत. बहुतेक बुरुज पडलेले असून तटबंदीहि ठिकठिकाणीं ढांसळलेली आहे.

## १ मारुतीचें टेक—

हें गडाच्या दक्षिणटोंकास आहे. तेथें एक मारुतीचें लहान देवालय आहे. जवळच एक भुयार असून ती खलबतखान्याचीं जागा होती असें सांगतात.

## २ बोडणीचा माळ.

## ३ पाताळनगरी—

ही एक लहान दरी आहे. हें गडावरील सर्वांत खोलगट ठिकाण असल्यानें त्याला पाताळनगरी असें नांव पडलें असावें.


## ४ श्री अमृतेश्वर—

हें शंकराचें देवालय आहे. हें अमृतराव प्रतिनिधि (१७५१ ते १७६२) यांनीं बांधलें. पायरीवर खालील लेख आहे.

॥ श्री निवास ॥
॥ दास चर ॥
॥ ण रज ॥

पुढील अक्षरें पुसट झाल्यानें समजत नाहींत. देवालय अत्यंत रम्य ठिकाणीं बांधण्यांत आलें आहे. आजूबाजूस गर्द झाडी असून समोर एक सुंदर पाण्याचा झरा आहे. यांत कायम पाणी असते. झऱ्याखालीं एक चिरेबंदी दगडाचा हौद बांधला असून त्यावर लहान लहान कुंडें खोदलीं आहेत. त्यांचा उपयोग पूर्वीं संध्या करण्याकडे होत असे. गडावरील सर्वांत रम्य आणि शांत असें हें ठिकाण आहे.

विशाळगड—


३८
२
३
१
४
३४
५
३५
६
७
द.
गजापूरशिवाय घेऱ्यांतील बाकीचीं गांवें संगमेश्वर तालुक्यांपैकीं आहेत.
गजापूर.

## ५ डिकमाळ.

## ६ गंजीचा माळ—

येथें पूर्वी गवताच्या गंज्या रचीत असत.

## ७ रणमंडळ—

गडाची चढण संपल्यानंतर वरील सपाटीला एखाद्या लहान टेकडी सारखाच मोठा चौथरा आहे. त्याला रणमंडळ असें म्हणतात. भोज राजानें भूपाल तळें बांधतेवेळीं त्यांतून काढलेल्या मातीनें हा चौथरा झाला आहे असें म्हणतात. गडाच्या मुख्य प्रवेशद्वारानजीक ही टेकडी असल्यानें गडावरील प्रत्येक युद्धांत या ठिकाणीं मोठी घनचक्कर व हातघाईची होई. त्यामुळें या जागेस रणमंडळ असे नांव पडलें आहे. गडावरील हें सर्वांत उंच स्थान असल्यानें येथून गडाचा देखावा उत्तम दिसतोच पण खालील कोंकण-पट्टीचें दृश्य समुद्रापर्यंत मोठें मनोहर आणि अद्भुत असें दृश्यमान होतें. विशेषतः सायंकाळीं अस्तमानाचें दृश्य अत्यंत मनोहर दिसतें. सूर्यबिंब हळू हळू क्षितिजाखालीं जात असतां समुद्राच्या पृष्ठभागावर किरणांचें परिवर्तन होऊन सूर्यबिंबाचे विविध आकार पहात असतांना देहभान हरपतें.

## ८ मुंढा दरवाजा--

याला चोर दरवाजा अथवा टेहळणी दरवाजा असेंही म्हणतात. या दरवाजांतून पुढें जाण्यास वाट नाहीं. परंतु येथून गडाखालील प्रदेशावर टेहळणी करतां येतें. त्याचे नजीकच एक बुरूज असून तेथून गडाचे वाटेवर बरोबर मारा करतां येतो. या ठिकाणीं अद्यापही एक जुनी मोडकी तोफ पडली आहे.

## ९ हजरत पीर मलिकरहाणचा दर्गा.

विशाळगडावरील हें एक प्रमुख ठिकाण आहे. मलिक रेहान नांवाच्या साधुपुरुषाचें हे स्मारक असावें. दर्ग्याची इमारत बरीच जुनी असून तिची

बांधणावळही जुन्या पद्धतीची होती. राजापूर येथील एक धर्मनिष्ठ व्यापारी शेट फोंडुशेट बक्कर यांनीं विशाळगड संस्थानकडे एक मोठी देणगी दिल्यानें इ. स. १९३९ मध्यें जुन्या इमारतीचा जिर्णोद्धार करून हल्लीची सुंदर इमारत त्या ठिकाणीं बांधण्यांत आली आहे. इमारतीसभोंवती प्रशस्त प्राकार आहे. त्यांत पश्चिमेकडील बाजूस एक मशीद असून बाकी चोहीं-कडे थडगीं आहेत. दर्ग्यासमोरील दोन तीन थडगी दर्ग्याचें मुजावरांच्या पूर्व-जांची आहेत. प्राकारालगत कमानीचा प्रवेशदरवाजा आहे. त्यावर मध्यभागीं एक फारसी भाषेंतील शिलालेख बसविण्यांत आला आहे. त्यांतील आशयः—

> ‘ धर्माचा आधार आणि सत्पंथियांचें भूषण असा मलिक रैहान यानें मशिदीची सेवा अबदुल रहीम याच्या पुत्रांकडे प्राचीनपासून सोपविली होती. उदात्ततेचे आणि उच्च गुणांचें आश्रयस्थान असलेला अप्पाजीपंत... आणि खेळण्यावरील इतर विश्वासूक अधिकारी यांनीं या बाबतींत चौकशी केल्यावर अबदुल रहीमच्या पुत्रांचें मागणें योग्य असल्याचें दिसून आल्यावरून त्यांचेकडे वारसा चाल-विणेंत आला. कासिमचा मुलगा मखदूमखान यानेंही आपलें म्हणणें पुढें मांडलें होते. परंतु तें अविश्वसनीय ठरलें. तारीख ... माहे रमजान सन ११७८ हिजरी. ” *

दर्ग्याच्या मुजावरी संबंधानें लागलेला वाद पंचांचेमार्फत तोडण्यांत आला त्याबद्दल हा उल्लेख आहे.

दर्ग्याच्या आंतील बाजूस एक खोली असून त्यांत मलीक रैहानची कबर आहे. दर्ग्याचे वहिवाटदार मुजावर दोन आहेत. त्यांचेमध्यें दरसाल फेरानें कामाची पाळी येते. काम करणारे मुजावराखेरीज इतर कोणासही आंतील कबरीजवळ प्रवेश करण्यास सक्त बंदी असते. खोलीस एक लहानसें दार असून त्यांतूनच सर्वांना दर्शन घ्यावें लागतें.

---

* मूळ फारशी लेखाचें भाषांतर फर्ग्युसन कॉलेज मधील फारशी भाषेचें अध्यापक प्रो. वर्मा M. A., M. F., A. F. यांनीं करून दिलें आहे.

या दाराच्या दोन्ही बाजूस भिंतींत दोन आरबी लिपींतील फारसी शिलालेख बसविले आहेत. प्रो. वर्मा यांनीं या शिलालेखांचा अभ्यास करून त्यावर लिहिलेला निबंध मुंबई युनिव्हर्सिटीचे जर्नल व्हॉ. २ भाग १ (जुलै १९३३) मध्यें प्रसिद्ध केला आहे. तत्पूर्वी मेजर ग्रॅहम यांच्या Statistical Report on the principality of Kolhapur (1854) आणि Gazetteer of the Bombay presidency volume XXIV Kolhapur (1886) या ग्रंथांतही त्यांचे इंग्रजी भाषांतर दिलें आहे. परंतु प्रो. वर्मा यांनीं त्या भाषांतरांतील दोष दाखवून त्या ग्रंथकारांचा शिलालेखाच्या तारखेबद्दल कसा आणि कां गैरसमज झाला होता हें साधार दाखवून दिलें आहे. डावीकडील शिलालेख १९″ × १२″ या आकाराचा असून त्याचा अर्थ:

ओळ १ " जगांतील सर्व कार्य धैर्यानें साधतें.
,, २ हा ' दौलत बुरूज ' सौंदर्यांत पुरा केला आहे.
,, ३ तुला जर त्याची तारीख जाणण्याची इच्छा असेल
,, ४ तर ती " दौलत बुरुजांत आहे. "

याशिवाय बाजूला पुढील अक्षरें आहेत " परमेश्वर अविनाशी आहे. सर्व वस्तूंचा नाश होतो " मेजर ग्रॅहम यानें यावरून या शिलालेखाची तारीख हिजरी सन ६४५ म्हणजे इ. स. १२४७ ही ठरविली आहे. गॅझेटियरमध्यें याबद्दल शंका प्रदर्शित करण्यात आली आहे परंतु त्याचे निराकरण करण्यांत आलें नाहीं. प्रो. वर्मा यांनीं या लेखाची तारीख ९८१ हिजरी म्हणजे इ. स. १५७३–७४ अशी ठरविली आहे.

उजवीकडील लेखाची शिला २९ "× ९½ " या आकाराची असून त्यावरील लेखाचा अर्थ:

ओळ १ — जगांतील सर्व काम धैर्यानें साधतां येतें.
,, २ — नशिबवान इब्राहिमशहाच्या आज्ञेनें हा बांधण्यांत आला.
,, ३ — तुला जर त्याची तारीख जाणण्याची इच्छा असेल
,, ४ — तर ती " दौलत बुरुजांत " आहे.

बाजूला ' हे दयानिधे , त्याचें स्मरण करा ' अशी अक्षरें असून ' हिजरी सन ९९६ ' ( इ. स. १५८८–८९ ) असें लिहिलें आहे.

लेखांतील अर्थावरून या शिला ' दौलत ' नांवाच्या बुरुजावरील आहेत हें उघड आहे. बुरुज पडल्यानंतर तेथील शिला दर्ग्यांत आणून ठेवल्या असाव्यात आणि पुढें दर्ग्यांतील भिंत बांधतांना त्यातील अर्थ न समजून त्या येथें बसविल्या आहेत असें दिसतें. त्यांतील निर्देशावरून विजापुरचा बादशहा इब्राहिम अदिलशहा ( १५८० ते १६२६ ) याच्या कारकिर्दीत हा दौलत बुरूज बांधला असल्याचें दिसतें.

गडावरील कोणत्याही बुरुजाला दौलत बुरूज असें नांव असल्याचें समजून येत नाहीं. परंतु येथून नजीक असलेल्या पन्हाळा किल्ल्यावर या नांवाचा बुरूज होता. इ. स. १८२५ च्या सुमारास करवीरचे छत्रपति बुवासाहेब महाराज यांची स्वारी पन्हाळा किल्ल्यावर असतांना-या बुरुजाखालीं मुसलमानी कारकिर्दीत बरेच द्रव्य पुरून ठेवलें असल्याचें त्यांना लोकांनीं सांगितलें. त्यावरून बुवासाहेब महाराजांनीं तो बुरूज तळापर्यंत उकरला परंतु अर्थात् त्यांना द्रव्याचा ठेवा मुळींच मिळाला नाहीं. अशी हकीगत मोडकांनीं आपल्या करवीर प्रांताचा इतिहास भाग २ पान १५ यावर लिहिली आहे. कदाचित् त्याच बुरुजावरील शिलालेख कोणी अज्ञ माणसानें येथें आणले असणेंही असंभवनीय नाहीं.

ग्रॅहॅम आणि गॅझेटियर या ग्रंथांत या शिलालेखांचें स्थान दिलेलें नाहीं. दर्ग्याच्या भिंतीवर फारशी शिलालेख असल्याचें त्यांत नमूद आहे परंतु त्याचा अर्थ या दोन्हीं ग्रंथांत पुढीलप्रमाणें दिला आहेः—

> " हा गड भोज नामक मराठा राजाच्या ताब्यांत होता. मी, मलिकरैहान यानें यावर सहा वेळ हल्ले केले परंतु पराजय झाला. सातव्या हल्ल्यांत मी गड काबीज केला. शूर हो म्हणजे तुझी भरभराट होईल."

ग्रॅहॅमनें आपल्या ग्रंथांत हा शिलालेख इ. स १२३४ मधील असल्याचें लिहिलें आहे. पंतप्रतिनिधी बखरींत दौलत बुरुजाचा अगर त्यावरील शिलालेखाचा मुळींच उल्लेख नाहीं. दर्ग्यांतील भिंतीवर दोन बाजूस फारशी

हरपा असल्याचे त्यांत नमूद आहे. एकाचा अर्थ वर दिल्याप्रमाणें मलिकरैहान संबधीं असून दुसऱ्याचा अर्थ पुढील प्रमाणें दिला आहे.

> "मलिकरानखानसाहेब एकसष्ट वर्षे किल्लेखेळणेची किल्लेदारी केली आणि विशाळगड करके नाम रखे खोडा अगर बेडी आपले हयातमे तोडे. तेथें और बाद वाफत-केभी हुकूम कीं, येथें मुरापवदोंका खोडा बेडी तोडेगा. एकसष्ट वर्षे किल्लेदारी करून मयत झाले. खोडाबेडी हयात असता तुटत असे व हल्ली कोणी नवस केला असता खोडाबेडी अद्यापी त्या पीराचे दरग्यामध्ये तुटते."

हे दोन शिलालेख दर्ग्याचे भिंतींत असल्याचें लिहिले आहे. परंतु प्रत्यक्ष त्या ठिकाणचे शिलालेख मलिकरैहान संबंधानें नसून दौलत बुरुजा-संबंधी आहेत आणि मलिकरैहान संबंधाचे लेख कोठें आहेत याचा पत्ताच नाहीं!!

हा मलिकरैहान कोण होता आणि तो केव्हां झाला हा मोठा वादग्रस्त विषय झाला आहे.

मलिकरैहान संबंधी जे शिलालेख असल्याचे समजले जाते त्यावरून त्यानें इ. स. १२४७ च्या सुमारास गडावर हल्ला करून तो भोजराजकडून हस्तगत केला असा भास होतो. परंतु इ. स. १२०८-१० चे सुमारासच भोजराजाचा पराभव होऊन हा सर्व प्रांत देवगिरीच्या सिंघण राजानें जिंकला असल्याचें अनेक शिलालेखांवरून दिसत असल्यानें मलिकरैहान यानें त्याचेंवर मोहीम करणें असंभवनीय आहे. मलिकरैहान हा यादवांचा सरदार असल्याचेंही दिसत नाहीं. कारण इ. स. १२५० च्या सुमारास दक्षिणेंत मुळीं मुसलमानांचा प्रवेशच झाला नव्हता. मुसलमानांची प्रथम स्वारी इ. स. १२९४ मध्यें देवगिरीवर झाली आणि त्यानंतर १०।१५ वर्षांनीं ते महाराष्ट्रांत आले. शिवाय आद्य मुसलमानी इतिहासकार फेरिस्ता यानें बहामनी वजीर महमद गवान याच्या इ. स. १४६९ मध्यें विशाळगडावर झालेल्या यशस्वी मोहिमेचें वर्णन देतांना याचवेळीं मुसलमानांनीं प्रथम गड काबीज केला असे निश्चितपणें लिहिलें आहे.

( Ferista's History of the Deccan by Scott Vol. I p. 156 आणि Nairn's History of Konkan p. 32. ) यावरून इ. स. १४६९ च्या पूर्वी गडावर मुसलमानी सत्तेचा प्रवेश झाला नसल्यानें शिलालेखावरून दिसून येणारी मलिकरैहानची हकीगत मुळींच विश्वासनीय वाटत नाहीं.

राजापूर येथील हकीमुल्ला अब्दुल गफूर हकीमुल्ला हुसेन नांवाच्या एका इसमानें " सयाने हयात " नांवाचें मलिक रैहानचे संक्षिप्त चरित्र लिहिलें आहे. त्यांत मलिक रैहान याचे पूर्वचरित्रांत तो विजापुरचा बादशहा महंमद अदिलशहा ( १६२६ ते १६५६ ) याचा सरदार असल्याचे सांगून त्यानें बादशहाकरिता केलेल्या पराक्रमांचे वर्णन केलें आहे. महंमदशहाचे पदरीं मलिक रैहान नांवाचा सरदार होता. हे फेरिस्ता, बुसातिनेसलातीन वगैरे ग्रंथांवरून दिसत आहे. परंतु त्यांपैकीं कोणत्याही ग्रंथांत त्यानें खेळण्यावर मोहीम केल्याचा कोठेंच उल्लेख नाहीं. त्याचे कार्यक्षेत्र कर्नाटक, सोलापूर वगैरे कडेच होतें. त्या ग्रंथांतून हा उल्लेख नजर चुकीनें राहिला असें मानले तरी वस्तुस्थितीशी त्याचा मेळ घालतां येत नाहीं. कारण अदिलशाहीच्या स्थापनेपासूनच हा गड त्यांच्या ताब्यांत असल्याचे त्या कालच्या फर्मानावरून दिसून येते. यामुळें गडावर विजापुरकरांनीं मोहीम करण्याची अवश्यकताच संभवत नाहीं. तसेच त्यानें गडावर हल्ला केला असें वादाकरितां मानिलें तर तो प्रसंग इ. स. १६३० नंतर केव्हां तरी झाला असला पाहिजे. परंतु इ. स. १६५९ मध्यें शिवाजी राजांनीं हा गड जिंकला ही इतिहासप्रसिद्ध गोष्ट आहे. असे स्थितींत शिलालेखांत लिहिल्याप्रमाणें त्यानें ६१ वर्षें गडाची किल्लेदारी केली हे कसें संभवनीय आहे ?

त्याचप्रमाणें त्यानें गडाचें नांव विशाळगड असें ठेवल्याचा उल्लेख शिलालेखांत दिसतो. परंतु मलिकरैहान हा मुसलमान असल्यानें तो 'विशाळगड' असें संस्कृत नांव गडास ठेवील अशी कल्पनाही करवत नाहीं. शिवाय गडाचे नांव विशाळगड असें शिवाजीमहाराजांनीं ठेवल्याचे इतर ग्रंथावरून स्पष्ट दिसतें. इ. स. १६६० च्या पूर्वींच्या कोणत्याही मुसलमानी फर्मानांत 'विशाळगड' असें नांव आढळत नाहीं. प्रत्येक ठिकाणीं

' खेळणा ' असाच उल्लेख आढळतो. यावरून शिलालेखांतील नामकरणाचा उल्लेखही अविश्वसनीय ठरतो.

याप्रमाणें मलिकरेहानचें चरित्र ज्या शिलालेखावरून आधारलें जातें ते लेखच मुळीं अस्तित्वांत नाहींत ही पहिली गोष्ट. त्यानंतर त्या लेखांचा जो मतितार्थ उपलब्ध आहे त्यावरून हा वृत्तांत इतिहासाशीं सर्वस्वी विसंगत आहे ही दुसरी गोष्ट. या दोन्हीवरून मलिकरेहानसंबंधीं प्रचलित असलेला वृत्तांत सर्वस्वी अविश्वसनीय असल्याचें दिसून येईल. त्यानें भोजाराजाशीं लढाई केल्याच्या आणि गड जिंकल्याच्या लोककथेस ऐतिहासिक आधार तर नाहींच परंतु ती निर्विवाद ठरलेल्या इतिहासाशीं सर्वस्वी विसंगत अशीच आहे. यावरून मलिकरेहान हा साधूवृत्तीचा कोणी अवलिया असून अदिलशाहीच्या अमलांत त्याच्या दर्ग्याची स्थापना झाली असावी असें वाटतें.

दर्ग्यास प्रतिवर्षी जिल्हेज महिन्याच्या १३ तारखेस मोठा उरूस होतो. त्याला हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांचें लोक जमतात. अलीकडे गडापर्यंत मोटारमार्ग झाला असल्यानें उरुसाला येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उरुस तीन दिवस असतो. पहिले दोन दिवस दर्ग्यांत कुराणपठण वगैरे चालू असतें. तिसऱ्या दिवशीं दर्ग्यापासून सुमारें अर्धा मैल अंतरावर असलेल्या रोजा नांवाच्या ठिकाणीं मोठ्या मिरवणुकीनें चंदन नेण्यांत येतें. आणि तेथें थोडा धार्मिक विधी झाल्यावर उरलेलें चंदन सर्वांना प्रसाद म्हणून वाटण्यांत येतें.

उरुसाचे मुदतींत बेडी घालण्याचा एक प्रमुख कार्यक्रम असतो. हा पीर नवसाला पावतो अशी समजूत असल्यानें पुष्कळ लोक येथें नवस करून फेडण्यास येतात. त्यावेळीं हातांत आणि पायांत कड्यांची सांखळी अडकविण्यांत येते आणि नवसकऱ्यानें दर्ग्याभोंवती प्रदक्षिणा घालतांना पायातील सांखळीच्या कड्या जोडणारा बारीक तारेचा तुकडा मोडून सांखळी ( बेडी ) खुली होतांच नवस पुरा झाला असें समजण्यांत येतें. याखेरीज अपराधाची परीक्षाही बेडी घालून करण्यांत येतें. वहीम असणारास बेडी घालून दर्ग्याभोंवतीं फिरवितात आणि बेडी तुटल्यास त्याला

निरपराधी समजण्यांत येतें. यासंबंधीं अशी दंतकथा आहे कीं, मलिक-रैहान यानें आपल्या बंदिवासांतील कैद्यांना आपल्यासमोर बोलाविलें आणि त्यांना आपल्या गुन्ह्याची कबुली ( Confessions ) देण्यास सांगितलें. ज्यांनीं आपली खरी हकीगत सांगितली त्यांच्या पायांतील बेड्या आपोआप तुटून पडल्या आणि त्यांना मलिकरैहान यानें मुक्त करून सोडून दिलें.

## १० श्री नरसोबाचें देवालय.

विठ्ठल अप्पाजी सबनीस हे प्रतिनिधींचा कारभार पहात असत. त्यांनीं हें देवालय बांधलें. त्यास सुमारें शंभर वर्षे होऊन गेलीं. बांधकाम चाललें असतां खालीं एक मोठा दगड लागला, आणि कांहीं दैवी चमत्कार घडल्यामुळें बांधकाम पुरें झालें नाहीं.

## ११ गौरीचें तळें.

## १२ सतीचें वृंदावन.

इ. स. १७०० मध्यें राजाराम महाराज सिंहगडावर कालवश झाले. त्यासमयीं त्यांच्या तृतीय पत्नी अहिल्याबाई ऊर्फ अंबिकाबाई विशाळगडावर होत्या. त्यांना हें वर्तमान समजतांच महाराजांच्या पागोट्याबरोबर त्या सती गेल्या. सती गेल्या ठिकाणीं एक वृंदावन बांधण्यांत येऊन त्याच्या पूजेअर्चेकरितां सुमारें पन्नास रुपयांची नेमणूक करून देण्यांत आली होती. कालांतरानें वृंदावन नादुरुस्त होऊन पडून गेलें होतें; त्याचा इ. स. १९४० मध्यें करवीरचे अधिपती श्री राजाराम छत्रपती महाराज यांनीं जीर्णोद्धार करून त्या जागीं हल्लींची नवीन टुमदार छत्री बांधली आहे. वृंदावनावर पुढील प्रमाणें लेख बसविण्यांत आला आहे.

### " आदर्श समाधी

कै. पहिले श्रीराजाराम छत्रपती रायगडीं कालवश झाल्या-
नंतर त्यांच्या महासाध्वी पत्नी श्री अहिल्याबाई राणीसाहेब

यांनीं त्यांचे पगडीसमवेत ता. ५ मार्च सन १७०० इ. रोजीं या ठिकाणीं सहगमन केलें. यांचे चिरस्मरणार्थ हल्लीचे करवीराधिपति ले. क. सर श्रीराजाराम छत्रपति महाराजासाहेब जी. सी. आय्. ई., जी. सी. एस्. आय्. यांनीं ही समाधी बांधवून जीर्णोद्धार केला. तारीख १ माहे ५ सन १९४० शिवराज शक २६६–६७"

समाधी बांधल्यानंतर खर्चाबद्दल नेमणूक पूर्वीप्रमाणें पुन्हां सुरू झाली आहे.

## १३ निमजगा—

मुसलमानांची नमाज पडण्याची जागा. हल्लीं पडलेली आहे.

## १४ वेताळ टेकडी—

येथें पूर्वी वेताळ आहे अशा समजुतीनें पूजा करीत असत.

## १५ बावन सती—-

गडावर सती गेलेल्या बावन स्त्रियांचीं वृंदावनें आहेत.

## १६ तास टेकडी

ही एक उंच टेकडी असून येथें पूर्वी पहाऱ्याची चौकी असे. दिवसमान कळण्याकरितां येथें प्रत्येक तासाला तास अगर घंटा वाजविण्यांत येई. यामुळें सर्व किल्ल्यावर वेळ कळत असे.

## १७ गडसदरचा माळ—

गडसदर म्हणजे गडावरील कचेरीची जागा.

## १८ रोजा—

मलिकरैहानच्या उरुसांत मोठ्या समारंभानें या ठिकाणापर्यंत चंदन आणून तें सर्वांस वाटण्यांत येतें.

## १९ दारूचें कोठार—

हें हल्लीं पडलेलें आहे.

## २० वडाचा माळ.

## २१ कुंवार खांब—

या ठिकाणची माती वाहून गेल्यानें खडकाचे दोन स्तंभ उभे आहेत. लग्नाच्या मिरवणुकींतील नवरानवरीप्रमाणें ते दिसत असल्यानें त्यांना नवरानवरी असेंही म्हणतात.

## २२ माचाळची वाट—

ही माचाळ गांवास जाण्याची वाट आहे. माचाळचें भव्य पठार या अरुंद वाटेनें विशाळगडाला जोडलें गेलें आहे.

## २३ वाघाचा डवरा—

हा एक लहान खड्डा आहे.

## २४ वाघजाइचें देऊळ—

गडावरील गडकऱ्यांचें ग्रामदैवत.

## २५ पासल टांके—

पाण्याचा लहानसा झरा.

## २६ रामेश्वराचें देऊळ—

## २७ सरदेसाई यांचीं परडीं—

रियासतकार रावबहादूर सरदेसाई यांच्या पूर्वजांचें निवासस्थान.

## २८ टकमकीचा कडा—

हा एक उंच तुटलेला कडा असून येथें देहांत शासन मिळालेल्यांचा कडेलोट करण्यांत येई.

## २९ वाडा

हा वाडा प्रतिनिधींचें निवासस्थान होतें. तो प्रथमतः रामचंद्रपंत अमात्य यांनीं सतराव्या शतकाच्या अखेरीस बांधला. कालांतरानें मूळच्या इमारतींत वेळोवेळीं वाढ करण्यांत आली. परंतु वाड्याचे जोतें मूळचेंच कायम आहे. वाड्याचें ठिकाण मोठें चातुर्यानें निवडलें असून गडाचे बाहेरून केलेला तोफांचा मारा वाड्यापर्यंत पोहोचूं शकत नाहीं. पूर्वींची तिमजली इमारत नादुरुस्त झाल्यानें भिंती कायम ठेवून हल्लीची प्रशस्त इमारत नुकतीच इ. स. १९३५ मध्यें बांधण्यांत आली आहे. वाड्याचे सभोंवतीं विहिरी असून पाण्याची उत्तम सोय आहे. पूर्वींचा वाडा याहीपेक्षां मोठा होता. मागील बाजूच्या पडलेल्या भिंतीवरून त्याच्या पूर्वींच्या भव्यपणाची कल्पना येते.

## ३० पागा—

ही पहिले राजाराम छत्रपति यांचे कारकीर्दीत बांधली.

## ३१ अर्धचंद्री विहीर

ही विहीर वाड्याच्या दक्षिण बाजूस आहे. ही रामचंद्रपंत अमात्य यांनीं सतराव्या शतकाच्या अखेरीस हा गड त्यांचे ताब्रीन असतांना व त्यांचे वास्तव्य गडावर असतांना बांधली. हिचा आकार अष्टमीच्या चंद्रबिंबाप्रमाणें असल्यानें तिला अर्धचंद्री हें नांव ठेवण्यांत आलें.

## ३२ श्रीभगवंतेश्वर.

हें शंकराचें देवालय श्री. भगवंतराव प्रतिनिधि (१८०६ ते १८१९) त्यांच्या कारकिर्दीत बांधण्यांत आलें. देवालयाचें बांधकाम चिरेबंदी असून

मजबूत आहे. देवालयाच्या पायरीवर खालील सहा ओळींचा लेख आहे.

श्री
॥ चरणरज भगवंत ॥
॥ राव आबाजी प्र ॥
॥ तीनीधी मुक्काम ॥
॥ कीले विशाळगड ॥
॥ शके १७३८ धाता संवत्स ॥
॥ रे जेष्ठ शुद्ध पंचमी ॥

मिती जेष्ठ शु० पंचमी शके १७३८ धातानाम संवत्सरे इ. स. १८१६

देवाचे मूर्तीसमोर जमिनींत एक दगडी कासव बसविलें आहे. त्यावर खालील लेख आहे.

श्री
॥ श्री गणेश श्री ॥
॥ श्री भवानी शंकर ॥
॥ श्री भगवंतेश्वर माहा ॥
॥ राज प्रसन्न कृपा ॥
॥ निधि नभो लेपा ॥
॥ शु पति ॥

## ३३ ओर्पे–सबनीस यांचे घरवंद

प्रो० दत्तो वामन पोतदार यांच्या पूर्वजांचें निवासस्थान.

## ३४ भूपाल तळे

याची बांधणावळ चांगली व जुनी दगडी आहे. याची लांबी ८० फूट व रुंदी ८० फूट आहे. शिलाहार राजा दुसरा भोज यानें बाराव्या शतकांत याचें बांधकाम केलें. याच्या नांवावरून भोपाळ नांवाच्या कोणी राजानें हे बांधले असा समज प्रचलीत आहे. परंतु भूपाल नांवाचा राजा येथें कोणी झालेला नाही. शिलाहारराजा भोज हा आपणास

' भोज भूपाल ' असें म्हणवीत असे. त्यातील ' भोज ' नांवाचा लोप होऊन ' भूपाल ' एवढेच कायम राहिले व त्याच नांवानें हें तळेंहीं संबोधिले जाऊं लागलें.

## ३५ गोडे यांचें घरवंद—

भांडारकर ओरिएंटल् इन्स्टिट्यूटचे क्युरेटर प्रो. पी. के. गोडे यांच्या पूर्वजांचें निवासस्थान.

## ३६ श्रीरामाचें देवालय.

हें देवालय रामचंद्रपंत अमात्य बावडेकर यांचें वास्तव्य गडावर असतांना त्यांनीं १७ व्या शतकाचे अखेरीस बांधलें. श्रीराम हें त्यांचें कुलदैवत आहे. देऊळ पडलें असल्यानें अलीकडे विशाळगड जहागिरींतून एक लहान घुमटी बांधण्यांत आलेली आहे.

## ३७ दीक्षिताचा माळ—

## ३८ तोफेचें पाणी—

गडावरील तोफेचा गोळा समोरच्या टेकडीस लागून तेथें एक भगदाड पडलें आणि तेथून पाण्याचा प्रवाह सुरूं झाला.

# परिशिष्ट १

## विशाळगडावर अधिपत्य असलेल्या राजघराण्यांच्या वंशावळी

( राज्याधिकार प्राप्त झालेल्यांचीं नांवें दिलीं आहेत )

### शिलाहार वंश

- जतिग
  - नायिवर्मा
    - चंद्रराज
      - जतिग
        - गोंक ( गोंकल, गोकल गोकल्ल, )
          - मरसिंह ( इ. स. १०५८ )
            - गुवाल
            - गांगदेव
            - भोज १ ( इ. स. १०९८)
            - बल्लाळ
            - गंडरादित्य ( इ. स. (११०९, ११३५)
              - विजयादित्य ( इ. स. ११४२, ११५३ )
                - भोज, २ (११७८, १२०९)
        - गुवाल ( गुहाल )
        - कीर्तिराज
        - चंद्रादित्य

## देवगिरीचे यादव

मल्लुगी

१ भिल्लम (शके ११०९–१११३ इ. स. ११८७–११९१

२ जैत्रपाल किंवा जैतुगी (शके १११३–११३२ इ.स. ११९१–१२१०)

३ शिंघण (श. ११३२–११६९ इ. स. १२१०–१२४७)

जैत्रपाल किंवा जैतुगी

४ कृष्ण, कन्हार किंवा कंधार (श. ११६९–११८२; इ. स. १२४७–१२६०)

५ महादेव (श. ११८२–११९३ इ. स. १२६०–१२७१)

६ रामचंद्र किंवा रामदेव (श. ११९३–१२३१ इ. स. १२७१–१३०९)

७ शंकर (श. १२३१–१२३४, इ. स. १३०९–१३१२)

# विजयानगरचा राजवंश.

- संगम
  - हरिहर १ (१३३६)
  - कंप
  - बुक (१३४४)
    - हरिहर २
      - बुक २ (१३९९)
      - देवराय १ (१४०६)
        - वीर विजय (१४१२)
          - देवराय २ (१४१९)
            - मल्लिकार्जुन (१४४९)
              - राजशेखर (१४७८)
              - विरुपाक्ष २ (१४८३)
            - विरुपाक्ष १ (१४६५)
          - प्रतापदेव

## बहामनी राजवंश.

( दुसऱ्या अल्लाउद्दीनपासून. कंसातील अंक राज्यारोहणाचे आहेत. )

अल्लाउद्दीन २ ( इ. स. १४३५ )

हुमायून ( १४५७ )

निजाम ( १४६१ )    महंमद २ ( १४६३ )

महमुद २ ( १४८२ )

वलीउल्ला ( १५२१ )    अहमद २ (१५१८)    अल्लाउद्दीन ३ (१५२०)

कलीमउल्ला ( १५२४ )

## आदिलशाही

- युसफ (१४८९–१५१०)
  - इस्मायल (१५१० ते १५३४)
    - मल्लू (१५३४)
    - इब्राहीम (१५३४ ते १५५७)
      - तह्मास्प्
        - इब्राहिम २ (१५८० ते १६२६)
          - महंमद (१६२६ ते १६५६)
            - अल्ली २ (१६५६ ते १६७२)
              - शिकंदर (१६७२ ते १६८६)
      - अल्ली (१५५७ ते १५८०)

## मराठी राजवंश ( कोल्हापूर )

शिवाजी ( १६७४ ते १६८० )

संभाजी ( १६८० ते ८९ )

शाहू ( सातारा )

राजाराम ( १६८९ ते १७०० )

शिवाजी २ ( करवीर )
( १७०० ते १७१२ )

संभाजी २
( १७१२ ते १७६० )

शिवाजी ३
( १७६० ते १८१२ )

शंभू ( आबासाहेब )
( १८१२ ते १८२१ )

शहाजी
( बुवासाहेब )
( १८२२ ते १८३७ )

शिवाजी ४ ( बाबासाहेब )
( १८३७ ते १८६६ )

शाहू
( चिमासाहेब )

राजाराम २
( १८६६ ते १८७० )

शिवाजी ५
( १८७१ ते १८८३ )

शाहू
( १८९२ ते १९२१ )

राजाराम ३
( १९२१ ते १९४० )

## प्रतिनिधी राजवंश

परशुराम त्र्यंबक

कृष्णाजी ( विशाळगड )    श्रीपतराव वगैरे ( सातारा )

गंगाधर ( १७४१ ते ५० )

अमृतराव ( १७५१ ते ६२ )

कृष्णराव (१७६३ ते ६८)

आबाजी ( १७६८–९३ )

आनंदराव ( १७९३–१८०६ )

भगवंतराव (१८०६–१९)

माधवराव ( १८२०–३२ )

अमृतराव ( १८३३–४४ )

कृष्णराव ( १८६१–१८७१ )

( विद्यमान ) आबाजीपंत ( १८९१ )

समाप्त